# गानहिरा

सौ. शैलजा पंडित
अरूण हळवे

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
आणि मानसन्मान प्रकाशन पुणे

अनुक्रमणिका

# गानहिरा

सौ. शैलजा पंडित
अरुण हळबे

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
आणि मानसन्मान प्रकाशन पुणे

अनुक्रमणिका

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार
१० वे प्रकाशन

॥ पाचवा मानसन्मान ॥
सूत्रधार
चंद्रशेखर कुलकर्णी

गानहिरा

लेखक: सौ. शैलजा पंडित/अरुण हळबे

वेष्टनावरील कविता
जगदीश खेबुडकर

मुखपृष्ठ व ठसे
आईज ॲडव्हर्टायझिंग
डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४
प्रथमावृत्ती मे १९८५

© सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशक
सूर्यकांत देशमुख

सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई ४०००३२

आणि
रवींद्र कुलकर्णी
मानसन्मान प्रकाशन
४/४० 'चंद्रप्रकाश'
कर्वे रोड, पुणे ४११००४

मुद्रक
आनंद लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४, टिळक रोड, पुणे ३०

किंमत २२ रुपये

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


-आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार॰ मालेसंबंधी दोन शब्द ........ ६
निवेदन ........ ८
**आभारी आहे!** ........ १०
गानहिरा हिराबाई बडोदेकर ........ १०
**-संध्याछाया॰** ........ ११
॥ १ ॥ ........ १२
स्वरविलासाचा उंबरा ........ १२
गुरु आपैसा भेटे ........ १२
रियाज ........ १९
लय गवसली ........ २१
॥ २ ॥ ........ २३
सत्त्वपरीक्षा ........ २३
यशोयात्रा ........ २८
रसके भरे ........ ३२
दरबारी किस्से ........ ३४
रंगभूमी ........ ४३
मुलखावेगळे जलसे ........ ४६
अरसिकेषु कवित्व निवेदनम् ........ ४८
देवासाठी गाणे ........ ५१
॥ ३ ॥ ........ ५५
सन्मान ........ ५५
लाभालाभौ जयाजयौ ........ ५८
स्वप्नी जे देखिले.... ........ ५९
श्री सत्यसाइबाबांचा आशीर्वाद ........ ६५
मायेची पाखर ........ ६६
बंध रेशमाचे ........ ६८
अवघाची संसार सुखाचा ........ ७१

**परिशिष्ट** ........ **७३**

चीनच्या दौऱ्याची रोजनिशी ........ **७५**

चिनी गाणी ........ ८६

हिराबाईंचा अल्प परिचय ........ ९६

परिशिष्ट ४ ........ ११६

काही निवडक जाहिराती ........ ११६

अनुक्रमणिका

## 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार' मालेसंबंधी दोन शब्द

इसवी सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. या राज्यात चार घटक होते. इसवीसन १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला. आणि १९४७ मध्ये इंग्रज हिंदुस्थानातून गेले. नागपूरकर भोसल्यांचे राज्य १८५४-५५ ला इंग्रजांच्या पूर्णपणे ताब्यात आले. वऱ्हाड हा आधीचा निजामाचा मुलूख तो इंग्रजांच्या ताब्यात १९०२ मध्ये आला. मराठवाडा तर भारतातून इंग्रज गेल्यावर पोलीस कारवाईनंतर. या चार घटकांपैकी नागपूर आणि वऱ्हाड हे दोन घटक मध्यप्रदेशात आणि मराठवाडा हैदराबाद संस्थानात. १९६० मध्ये हे सर्व घटक एकत्र आले आणि त्यांचे महाराष्ट्र राज्य बनले.

आधुनिक महाराष्ट्राच्या पुनर्जागरणाचे व उभारणीचे प्रयत्न १८१८ नंतर ताबडतोब सुरू झाले. पश्चिम महाराष्ट्रात या जागराणाची सुरुवात झाली, त्याचे लोण हळूहळू इतरत्र पसरले. महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, अशा सर्व क्षेत्रांत महनीय कामगिरी करणारे धुरीण झाले. न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, गोपाळ कृष्ण गोखले, प्रिन्सिपॉल गोपाळ गणेश आगरकर, महर्षी आण्णासाहेब कर्वे, बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे राजकीय व सामाजिक नेते; श्री. विष्णुबुवा ब्रह्मचारी, श्री. राजारामशास्त्री भागवत, पंडिता रमाबाई यांच्यासारखे विचारवंत; विष्णुशास्त्री चिपळूणकर, श्री. हरी नारायण आपटे, केशवसुत, रेव्ह. नारायण वामन टिळक यांच्यासारखे सहित्यिक; श्री. विष्णुदास भावे, श्री. आण्णासाहेब किर्लोस्कर, श्री. गोविंद बल्लाळ देवल, श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्यासारखे नाटककार; खाँसाहेब अब्दुल करीम खाँ, पं. विष्णु दिगंबर पलुसकर, पं. विष्णू नारायण भातखंडे, पं. भास्करबुवा बखले यांच्यासारखे संगीततज्ज्ञ; श्री. केरूनाना छत्रे, लोकमान्य टिळक, श्री. दीक्षित, डॉ. केशव लक्ष्मण दप्तरी यांच्यासारखे गणिती; श्री. भाऊराव कोल्हटकर, श्री. बालगंधर्व, श्री. केशवराव भोसले, श्री. गणपतराव जोशी, श्री. गणपतराव बोडस, मा. दीनानाथ मंगेशकर, श्री. चिंतामणराव कोल्हटकर, श्री. केशवराव दाते यांच्यासारखे अभिनेते; श्री. करमरकर, श्री. र. कृ. फडके, श्री. बाबूराव पेंटर, श्री. सातवळेकर, श्री. धुरंधर, श्री. अलमेलकर यांच्यासारखे शिल्पकार व चित्रकार; श्री. दादासाहेब फाळके, श्री. भालजी पेंढारकर, श्री. व्ही. शांताराम यांच्यासारखे चित्रपटनिर्माते, यांनी महाराष्ट्राच्या वातावरणात चैतन्य निर्माण केले.

महाराष्ट्राच्या शिल्पकारांची ही न संपणारी यादी आहे. "आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार" असे सतत जन्माला येणारे आहेत, त्यामुळे महाराष्ट्राची संस्कृती प्रतिपच्चंद्रलेखेव विकसित होत जाणार आहे.

या सर्व शिल्पकारांची ओळख आजच्या पिढीस व्हावयास पाहिजे. हे सर्वच काम अंगावर घेणे सोपे नाही, तरीही यांपैकी काहींची ओळख करून दिल्यास या कार्याचा शुभारंभ तरी व्हावा. महाराष्ट्र शासनाने आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारांची ओळख करून देण्याची एक योजना आखली आणि ती साहित्य संस्कृती मंडळाच्या हवाली केली, त्यातून कमीत कमी शंभर तरी चरित्रे पुढील पाच सात वर्षांत प्रकाशित व्हावी अशी अपेक्षा आहे.

"गानहिरा" हिराबाई बडोदेकरांविषयीचे प्रस्तुत परिचयवजा पुस्तक हे यापैकीच एक. खरं म्हणजे हिराबाईंचे व्यक्तिमत्त्व डोळ्यांसमोर उभे करणाऱ्या ह्या आठवणी आहेत. सौ. शैलजा पंडित व श्री. अरुण हळबे यांनी गोळा केलेल्या या आठवणींबरोबरच हिराबाईंच्या चीन-दौऱ्याची रोजनिशी, अनेक छायाचित्रे

अनुक्रमणिका

त्यांचे अल्पसे जीवनचरित्र, त्यांनी गाइलेल्या काही लोकप्रिय गाण्यांचे स्वरलेखन, त्यांच्या प्रारंभिक जलशांच्या जाहिराती या सर्व गोष्टींमुळे हिराबाईंच्या कर्तृत्वाचा काळ आपल्या डोळ्यांसमोर उभा राहू शकतो. अशा रीतीने हे पुस्तक रोचक झाले आहे.

या पुस्तकाचे समग्र संपादन श्री. मा. कृ. पारधी यांनी साक्षेपाने केले आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. आमच्या या योजनेत सहभागी झाल्याबद्दल "मानसन्मान प्रकाशन" चे श्री. रवींद्र कुलकर्णी यांनाही धन्यवाद. असेच सहकार्य महाराष्ट्रातील इतर प्रकाशकांनी दिल्यास ही योजना लवकर फलद्रूप होऊ शकेल.

प्रस्तुत "गानहिरा" हे पुस्तक "आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार" या मालेतील दहावे पुष्प म्हणून प्रकाशित होत आहे. लवकरच मागील नऊ व पुढील काही पुष्पे प्रकाशित होतील अशी आशा करू या. ही पुष्पे प्रकाशित करताना कालानुक्रम पाळणे आम्हाला अभिप्रेत नाही. पुस्तके जसजशी तयार होत जातील तसतशी ती प्रसिद्ध करण्याचा मंडळ प्रयत्न करील.

मंत्रालय, मुंबई
४०००३२
२५ मे. १९८५

**डॉ. सुरेंद्र बारलिंगे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

[अनुक्रमणिका](#)

# निवेदन

हे हिराबाईंचे चरित्र नव्हे. हिराबाई मला जशा दिसल्या व समजल्या ते माझ्या मोडक्या तोडक्या भाषेत सांगण्याचा हा प्रयत्न आहे. हिराबाईंच्या भोवतालची आजवरची परिस्थिती, त्यांचे संगीतक्षेत्रातील कर्तृत्व व त्यांचा स्वभाव यांची ढोबळ कल्पना द्यावी एवढाच हे सांगण्यामागे माफक हेतू आहे.

सांगण्याचा भर हिराबाईंविषयीच्या आठवणींवर आहे. ह्या आठवणी माझ्या स्वतःच्या नव्हेत किंवा दुसऱ्या कोणाकडून ऐकलेल्या नव्हेत. हिराबाईंनी स्वतःच सांगितलेल्या आहेत. संकलन फक्त माझे.

बाईंनी ज्या शब्दांत ह्या आठवणी सांगितल्या ते शब्द तेव्हाच हवेत विरून गेले त्यांच्या आशयाशी मात्र प्रामाणिक राहण्याचा मी माझ्या आठवणीने प्रयत्न केला आहे.

ह्या आठवणी योजनापूर्वक गोळा केलेल्या नाहीत. त्यासाठी बाईंची मुलाखत किंवा खास बैठकी, असा प्रकार केला नाही. सहजगत्या बोलण्याच्या ओघात बाईंनी वेळोवेळी जे सांगितले त्यांतून या आठवणींना आकार आला. त्यांना काही सूत्र नव्हते. सूत्रात गोवण्याची खटपट माझी.बाई या गोष्टी आमच्याजवळ बोलल्या त्या अलीकडच्या पाच-दहा वर्षांत. म्हणजे बाईंच्या सर्व शक्ती क्षीण झाल्या असताना ज्या काळाविषयी त्या बोलल्या तो काळ फार दूर गेला असताना त्या आठवणी त्यांच्याही मनात आता धूसर झाल्या असतील; त्यात तेव्हा गुंतलेल्या भावना आता बोथट झाल्या असतील. म्हणूनच ह्या आठवणींत एक निर्विकार तटस्थपणा आला आहे. [त्या कोणाला नीरस वाटल्या तर नवल नाही.] कालाय तस्मै नमः।

तेव्हाचे आता आठवताना बाईंनी तपशिलात काही चूकभूल केली असणे शक्य आहे. त्यात त्यांचे काही पूर्वग्रह, किंवा गैरसमजही असू शकतील. त्यांतील सत्यासत्य मी पडताळले नाही. मला त्याची गरजही वाटत नाही. ती ती घटना बाईंना स्वतःला कशी दिसते व त्यांतून बाईंचे रूप कसे उमटते हे महत्त्वाचे.

ह्या आठवणींमधून फक्त बाईच दिसतात असे नाही. काही आठवणी तर बाईंपेक्षा त्या घटनेतील अन्य व्यक्ती किंवा प्रसंगच अधिक उठून दिसतात. त्या काळातील सामाजिक वातावरण व मानवी स्वभावाचे नमुने म्हणून त्यांना महत्त्व आहे. शिवाय बाईंच्या चरित्राची ती पार्श्वभूमी आहे. बाईंना तो प्रसंग कसा भावला हेही कळते.

हा माझा लेखन—प्रपंच म्हणजे हिराबाईंच्या भोवती आरती ओवाळणे झाले, असे कोणी म्हणाले. विचार करता मलाही वाटते की ते खरे आहे. पण हीच माझी शक्ती व हीच माझी मर्यादा. बाईंच्या सहवासात आल्यापासून गेली दहा—पंधरा वर्षे त्या मला जशा दिसत आल्या त्यातून त्यांच्याविषयी फक्त आदर व ममत्व मनात भरत गेले. त्यांच्या कर्तृत्वाने व सौजन्याने मी भारून गेले. एक कर्मयोगी महिला, आदर्श गृहिणी, व वत्सल गुरू याहून वेगळे त्यांचे रूप मला दिसले नाही: याहून वेगळा भाव माझ्या मनात जागला नाही. मग त्यांची आरती गाण्याखेरीज मी दुसरे काय करू शकणार?

अनुक्रमणिका

बाईंनी आम्हा शिष्यिणींना खूप दिले. नुसते गाणे शिकविले नाही. स्वयंपाकपाणीही शिकवले. चारचौघांत वागायची रीत शिकवली. अडीअडचणीत धीर दिला. आईची माया दिली. म्हणून भरल्या मनाने, कृतज्ञ भावनेने त्यांच्या मोठेपणाचा डंका पिटावेसे वाटते. त्यांचे उतराई होण्याचा हा एक सोपा उपाय मला सापडला.

ज्यांना हिराबाईंच्या चरित्राचे चिकित्सक विवेचन हवे आहे त्यांचे समाधान मी करू शकत नाही. (त्यांच्या माहितीसाठी हिराबाईंचा अल्प परिचय तेवढा शेवटी परिशिष्टात दिला आहे.) परंतु असे विवेचक चरित्र लिहिणाऱ्याला उपयोगी पडेल अशी बरीच नवीन सामग्री या माझ्या हिरा–गुण–गानात मिळू शकेल. तेवढ्यावर मला समाधान आहे.

**सौ. शैलजा पंडित.**

अनुक्रमणिका

# आभारी आहे!

गानहिरा हिराबाई बडोदेकर
म्हणजे मराठी मुलखाचं शालीन गाणं,
देशाचं गाणं.

लेखकद्वयानी गोळा केलेल्या आठवणींचा हा खजिना आपल्यासाठी खुला केला आहे.

ह्या आठवणींच्या बरोबरच हिराबाईंच्या चीन-दौऱ्याची रोजनिशी, त्यांच्या काही लोकप्रिय गाण्यांचे स्वरलेखन, साठवणीतील दुर्मीळ छायाचित्रं, तसंच त्यांच्या जलशांच्या निवडक जाहिराती हा भागही महत्त्वाचा. त्यांचीही जरूरी आहे. ही माहिती गोळा करीत असताना अनेकांची मदत झाली. त्यामध्ये बडोदेकर कुटुंबीय, उषाताई मुजुमदार आणि हिराबाईंचा शिष्यवर्ग यांचा सहभाग मोलाचा. निवडक जाहिरातींसाठी शासकीय ग्रंथालय, पुणे यांचे सहकार्य. सर्वश्री वामनराव देशपांडे, जी. एन. जोशी, पंडित भीमसेन जोशी यांच्या उपयुक्त सूचना.

श्री. मा. कृ. पारधी यांचे डोळस संपादन, 'आईज ॲडव्हरटायझिंग' पुणे यांनी केलेलं देखणं मुखपृष्ठ, कल्पना मुद्रणालयाचे श्री. आनंद लाटकर यांनी केलेली पुस्तकाची कल्पक सजावट, मुद्रणालयातील त्यांच्या सहकाऱ्यांनी अल्प वेळेत करून दिलेली सुबक छपाई.

साहित्य संस्कृती मंडळाने 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार' या योजनेखाली या पुस्तकांच्या प्रकाशनात केलेला सक्रिय सहभाग!

या सर्वांचा आभारी आहे.

**रवींद्र कुलकर्णी**

**॥ मानसन्मान प्रकाशन, पुणे॥**

अनुक्रमणिका



‘संध्याछाया’

# अनुक्रमणिका

## ॥ १ ॥

### स्वरविलासाचा उंबरा

काही माणसे अशी असतात की त्यांच्या सान्निध्यात आपला अहंकार लयाला जातो. 'स्व' गळून पडतो. काही वस्तू आणि वास्तूही अशा असतात की ज्यांचे वर्णन करताना शब्द अपुरे पडतात.

पुण्यात अशी एक वास्तू आहे की जिच्या अंगणात पाऊल ठेवताच उदात्ततेचा स्पर्श होतो. एखाद्या मंदिराच्या गाभाऱ्यात श्रद्धाळू मनाला जी जाणीव होते तीच अनुभूती या वास्तूत येते. एक मंद सुगंध आपल्याला कोठेतरी पलीकडे घेऊन जातो. आपल्या नित्य परिचयाच्या वस्तुस्थितीला पालांडून आपण कशाचा तरी शोध घेऊ लागतो.

एका नक्षीदार मेहेरपीच्या खाली नित्य ताज्या वाटणाऱ्या नाजूक वेलींच्या मखरात एक प्रतिमा विराजमान झालेली आपल्याला दिसते. ही प्रतिमा एका शक्तीची आहे. श्रद्धेने नि सातत्याने या वास्तूंत त्या शक्तीची पूजा बांधली जाते. तिच्यावर स्वरांचा अभिषेक होतो. तिच्याच पायाशी तिच्या उपासकाला जीवनाची लय गवसली आहे.

ही प्रतिमा आहे आशीर्वादासाठी हात उंचावलेल्या श्री साईबाबांची. शिरडीच्या मलंग स्वरूपातल्या अवधूताची.

याच 'स्वरविलास' वास्तूत श्री साईबाबांची कृपादृष्टी लाभलेल्या हिराबाई बडोदेकर राहतात. त्यांच्या साधनेचा विनम्र भाव येथे विसावला आहे. या सर्वांचा सरमिसळ परिणाम या वास्तूला प्राप्त झालेल्या शांत नि शीतल अशा स्थायी भावात आहे.

या एका दालनात कितीतरी वस्तू आहेत. छायाचित्रे आहेत. ती हळूच खुणावतात आणि आपला परिचय करून देतात. किराणा घराण्याचे प्रवर्तक म. खाँ साहेब अब्दुल करीम खाँ यांची रंगीत तस्वीर आपले लक्ष आकृष्ट करून घेते. हिराबाईंच्या मातोश्री ताराबाई यांचे छायाचित्रही येथे आहे. आणखी एक तैलचित्र आहे. कलामहर्षी बाबूराव पेंटर यांच्या गुणी कुंचल्यातून साकारलेले. हिराबाईंचे चित्र. जणू साध्या वेषांतली शारदा देवी.

येथे आणखीन किती म्हणून गोष्टी आहेत. सगळ्या विनम्रपणे आपापल्या ठिकाणी हजेरी देत आहेत. त्या पाहताना आपले कुतूहल जागृत होते. कुतूहल हिराबाईंविषयीचे. कुतूहल भारतीय संगीताला पडलेल्या एका स्वप्नाचे.

### गुरु आपैसा भेटे

हिराबाईंचे शिक्षण ताराबाईंच्या इच्छेप्रमाणे व्यवस्थित सुरू होते. त्यांची शिक्षणात गतीही चांगली होती. पुण्याला हुजूरपागेत त्या शिकत होत्या. त्यांचे इंग्रजी तिसरीपर्यंत शिक्षण झाले. शिक्षणात गती असली तरी रुक्ष पुस्तकांची संगती त्यांना नकोशी वाटत होती. संगीत शिकण्यासाठी त्या आतुर होत्या.

अनुक्रमणिका

त्यातच त्यांचेकडे येणाऱ्या भागवत ज्योतिष्यांनी सुचविल्यावरून ताराबाईंनी संगीताच्या अभ्यासासाठी हिराबाईंना परवानगी दिली. त्यांचे थोरले बंधू सुरेशबाबू माने यांचेजवळ त्या संगीत शिकू लागल्या.

त्या वेळी सुरेश बाबू होते तरी केवढे? जेमतेम सोळा वर्षांचे. आणि शिष्या तीन वर्षांनी धाकटी. सुरेश बाबूंची तयारी कौतुकास्पद होती. अब्दुल करीमखाँ यांच्याजवळ त्यांनी ही कला आत्मसात केली होती.

ही गुरुशिष्यांची छोटी जोडी दृष्ट लागण्यासारखी होती. शिकविताना दुड्डाचार्य गुरु आणि शिकविणे संपले म्हणजे जीवाभावाचा भाऊ आणि इतरांच्या नकला करताना खट्याळ सवंगडी. ती दोघे गायक गायिकांच्या नकला करीत. कधी गाण्याची नक्कल, तर कधी हावभावांची. हिराबाई दिसायला शांत असल्या तरी लहानपणी कमी मिस्किल नव्हत्या.

नारायणराव बालगंधर्व हे दोघांचेही आदराचे स्थान. त्यांची मैफील ऐकून आल्यावर सुरेशबाबू पेटी काढून बसत आणि मग दोघे मिळून त्यांना आठवतील त्या त्या जागा गिरवीत बसत. कोणीही तान घेतली म्हणजे त्याची चटकन् सरगम करायची ही सवय त्यांना लहानपणीच जडली.

परवा सरगम संबंधी चर्चा करताना बाई मार्मिक बोलल्या. त्या म्हणाल्या, "अलीकडे अनेक तरुण गायक सरगमचा अतिरेक करतात. असे वाटू लागते की ही गायक मंडळी श्रोत्यांना रागाचं व्याकरण तर शिकवीत नाहीत? सरगम करताना श्रोत्यांची सांगीतिक लय तुटणार नाही ही काळजी गायकांनी घेतली पाहिजे."

सुरेशबाबूंशिवाय महंमद खाँसाहेब यांचे जवळ हिराबाई गाणे शिकू लागल्या. हे महंमदखाँ म्हणजे आग्रेवाले नथ्थनखाँसाहेब यांचे चिरंजीव. मोठ्या तयारीचे. पण त्यांचा योग नव्हता. गुरुशिष्येच्या अल्पशा कुरबुरी नंतर त्यांनी हिराबाईंची शिकवणी सोडून दिली.

यानंतर हिराबाईंनी भास्करबुवा बखले यांचे जवळ शिकावे असे ताराबाईंना वाटू लागले. त्यांनी एकदा वेळ साधून भास्करबुवा बखले आणि केशवराव भोसले यांना हिराबाईंचे गाणे ऐकवले. त्यांना हिराबाईंचा आवाज आवडला. पण त्यांनी गंडा बांधण्याची अट घातली. त्या काळच्या संगीत क्षेत्रातील रिवाजाप्रमाणे त्यात काही चूक नव्हते. गंडाबंधन हा एक संस्कार आहे. तो घडणे शिष्याच्या दृष्टीने हितावह असते. पण त्या विधीला पैसा लागतो. तो त्या वेळी ताराबाईंजवळ नसल्याने तो योग हुकला.

महंमदखाँनी शिकविणे सोडले, तरी सुरेशबाबूंनी पाठ देणे सुरूच होते. नियतीचा योग वेगळा होता. लवकरच हिराबाईंना एका श्रेष्ठ गुरूचा लाभ व्हायचा होता. हिराबाई आपल्या भावंडांसहित बडोद्याला आपल्या मामांकडे गेल्या असताना मामांनी त्यांना इंदूरला होलिकोत्सव पाहायला पाठविले. तेथे हा योग जुळून आला.

अब्दुल वहीदखाँसाहेब हे प्रख्यात गायक त्याच सुमारास तेथे आलेले होते. त्यांचा आणि ताराबाईंच्या कुटुंबियांचा परिचय होता. त्यांना हिराबाईंचे गाणे ऐकविले गेले. ते प्रसन्न झाले. त्यांना जणू 'हिरा' सापडला. त्याला पैलू पाडण्याची कामगिरी करायला ते तयार झाले. ताराबाईंना तेच हवे होते. कारण असा थोर गवई गुरू म्हणून लाभायला भाग्य लागते.

अनुक्रमणिका

अब्दुल वहीदखाँसाहेब घरंदाज संस्कारात वाढले होते. सुरेल सारंगिये हैदरखाँ हे त्यांचे मामा. वहीदखाँचे सुरुवातीचे पाठ त्यांचे जवळ झाल्याने सारंगीवादनाचे गुण खाँसाहेबांच्या गाण्यात उतरले होते. रागाचा क्रमाक्रमाने विस्तार करताना ते या तंत अंगाचा भरपूर प्रयोग करीत असत. एका स्वरावरून दुसऱ्या स्वरावर जाताना सारंगीप्रमाणे मींड घेणे हे त्यांचे खास वैशिष्ट्य मींड व घसीट यांनी नटलेले त्यांचे गाणे मृदु, मुलायम व शांतरसपूर्ण होते. किराणा घराण्याचे एक अवलिये महंत बीनकर बंदेअलीखाँ यांचे हैदरखाँ हे शागीर्द होते. बंदेअलीखाँ म्हणजे कलेचा सागर. असंख्य चिजांचा खजिनदार. हैदरखाँवर त्यांचे निरतिशय प्रेम. त्यांनी आपल्या शिष्यासमोर साऱ्या चिजांचे भांडार खुले केले होते. हैदरखाँनी त्या सर्व चीजा संगतवार एकत्रित केल्या होत्या. त्या डौलदार बांधणीच्या खुबसूरत चीजा वहीदखाँसाहेबांना जशाच्या तशा मिळाल्या होत्या.

अब्दुल करीमखाँ हे अब्दुल वहीदखाँचे दुसरे मामा. हा तर संगीतातील पूर्णचंद्र. त्याच्याकडे जाण्यायेण्यातून वहीदखाँवर अभावितपणे त्यांचेही संस्कार घडले. संगीत क्षेत्रातील दुसरे एक नायक अल्लादियाखाँ हे हैदरखाँचे परम स्नेही. त्यामुळे वहीदखाँना त्यांचाही सहवास लाभला. शिवाय संगीतातील घराण्यांची वेगवेगळी नायक मंडळी वहीदखाँनी जवळून पाहिली होती.

एखादा राग किमान तास दीड तास आळविणे त्यांच्या हातचा मळ होता. आलापी हे त्यांच्या गायकीचे प्रधान अंग. रागांतील एका एका स्वराला प्राधान्य देऊन ते बढत करत असत. त्यांच्या ताना बिकट असत. खटक्याच्या ताना, गमकेच्या ताना, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. जलद लयीत सुद्धा तान दाणेदार स्वच्छ व सुरेल निघत असे. सवंग लोकप्रियतेच्या आहारी ते कधी गेले नाहीत.

खाँसाहेबांचे गुरू म्हणून वैशिष्ट्य असे की ते शिष्याच्या गळ्याची जात आणि गाण्याचा धर्म ओळखून त्याप्रमाणे पाठ देत. बेगम अख्तरी फैजाबादी आणि हिराबाई या दोघीही त्यांच्या शिष्या. या दोघींना खाँसाहेबांनी त्यांच्या गळ्याच्या जातीप्रमाणे आणि त्यांच्या वकूबाप्रमाणे वेगवेगळे शिक्षण दिले. आणि शिकवताना हातचे काही राखून ठेवले नाही.

रामपूरच्या नबाबांकडे बेगम अख्तरीबाई नोकरीला होत्या. त्या नबाबांना एक छंद होता. ते चीजा बांधायचे आणि मोठ्या गवयांना त्या गावयाला द्यायचे. या थोर गवयांकडून आपल्या या चीजांचे सोने होईल आणि आपले नाव अजरामर होईल असे त्यांना वाटत असे. त्यासाठी ते त्या गवयांना भरपूर बिदागी देत. म्हणून अनेक थोर गवई त्यांच्याकडे येत व पैसे घेत.

अख्यतरीबाईंना नेहमी असे वाटे की आपल्या उस्तादजींनी या कामासाठी रामपूरला यावे; आठ दहा हजार रुपये मिळवावेत व पुन्हा संगीताच्या सेवेला लागावे. त्यासाठी खाँसाहेबांना चार पाच चीजाच म्हणाव्या लागल्या असत्या.

एकदा हिम्मत करून अख्तरी बाईंनी गुरुजींसमोर प्रस्ताव मांडला. गुरुजींनी तो शांतपणे ऐकून घेतला. आणि म्हणाले, "बेटा! मी उस्ताद आहे. लोकांना देणे हा उस्तादाचा धर्म असतो. घेण्याचा नाही. मला त्या नबाबाचे शिष्यत्व पत्करायचे नाही. ते स्वीकारण्याच्या मोबदल्यात पैसा मिळतो म्हणून मला हा उद्योग करायचा नाही. आमच्या हैदर खाँसाहेबांसारखा किंवा बंदेअली खाँसाहेबांसारखा जर कोणी

कलावंत असेल तर अजूनही त्याच्या पायाजवळ बसून ज्ञान घ्यावयाची मला शरम वाटणार नाही. पण असे भ्रष्ट काम करून पैसा कमावण्याइतका मी नादान नाही.”

ते पुढे म्हणाले, “तुम जैसी नासमझ औरत मैने कभी नही देखी. मेरे लिये पैसोंकी फिकर कर रही है. क्या मै गरीब हूँ? अरे, मेरे पास जितनी बंदिशे हैं उतनी शायदही किसीके पास होगी. मी अमीर आहे. मी चींजांचा खजीनदार आहे. माझ्या जवळच्या चीजा मी तुझ्यासारख्यांना देतो तरी त्या संपत नाहीत. पुन्हा या प्रपंचाच्या गोष्टी कलेच्या दालनांत आणू नकोस. समझी मै क्या कह रहा हूँ? कलेमुळे कलावंत जगत असला तरी कला ही त्याने विकायची नसते. तिची इज्जत करणे हेच आपले पहिले कर्तव्य. पैसा नंतर.”

असा हा अत्युच्च खयालाचा गुरू हिराबाईंना लाभावा हा नियतीचाच एक भाग आहे.

संगीताच्या शिक्षणात सामान्यपणे सुरुवातीला यमन राग शिकविला जातो. पण वहीदखाँनी प्रथम पटदीप शिकवायला घेतला. कारण सुरेशबाबूंजवळ शिकताना हिराबाईंचा यमन झाला होता. एकदा शिकून झालेला राग पुन्हा शिकायला विद्यार्थी फारसा उत्सुक नसतो.

हिराबाई पटदीप राग शिकल्यावरची एक घटना आहे. गांधर्व संगीत महाविद्यालयाचा वार्षिक उत्सव होता. त्यांत गाण्यासाठी हिराबाईंना बोलावणे आले. त्यांची इच्छा नव्हती पण स्वतः विष्णु दिगंबर पलुस्करांनी आग्रह केला म्हणून त्यांना जावे लागले. तिथे त्या पटदीप गायल्या. श्रोत्यांना हा राग अपरिचित होता. पण त्याच्या आकर्षकतेमुळे आणि नावीन्यामुळे तो सर्वांना आवडला. लोकांसमोर कसे गायचे याचा पहिला धडा हिराबाईंना मिळाला. ते वर्ष १९२१ असावे.

वहीदखाँहेबांजवळ हिराबाईंचे शिक्षण परंपरागत गुरु-शिष्याच्या पद्धतीने चालले होते. बाहेर लोकांत गावयाची घाई आपल्या शिष्येने करू नये असे त्यांचे मत होते. म्हणून हिराबाई गांधर्व महाविद्यालयाच्या संगीत सभेत गायिल्या हे त्यांना रुचले नाही. ते संतापले. बाईंनी विष्णू दिगंबरांच्या नावाचा उल्लेख करून पाहिला. त्या काळी त्यांच्या नावाचा दबदबा होता. पण उपयोग झाला नाही. शेवटी त्यांनी एका अटीवर माफ केले. ती अट म्हणजे, या पुढे कोठेही मला विचारल्याशिवाय गायचे नाही.

वहीदखाँसाहेब आपल्या तबीयतीने शिकवीत होते. हिराबाईंचे लक्ष थोडे जरी विचलित झाले तरी ते एकदम संतापत. पण लगेच दुसऱ्या क्षणी प्रेमाने शिकवायला लागत. शास्त्रांत ते तडजोड साफ अमान्य करीत असत. शास्त्रबाह्य अजिबात खपवून घेत नसत. त्यांच्या शिकविण्यात मेहेनतीवर जसा भर होता तसाच तो तंतोतंतपणावरही. तानेतील प्रत्येक स्वर स्वच्छ, दाणेदार व लयीला बांधून जर आला नाही तर ते किती दिवस तेच ते घोटून घेतील याचा नेम नसायचा. एखाद्या रागाची चीज शिकायला जितका काळ लागे त्याच्या तिप्पट ती चीज गळ्यावर चढायला लागे. या कालावधीत आठ आठ महिनेही गेले आहेत. यात विरंगुळा एवढाच होता की सकाळच्या शिकवणीत व दुपारच्या शिकवणीत राग वेगवेगळे असत.

प्रथम महंमदखाँसाहेब हिराबाईंना शिकवीत होते, ते चीजांमागून चीजा शिकवीत असत. हिराबाईंना त्यात संगीत सापडत नव्हते. त्यांतून थोडी कुरबूर होऊन महंमदखाँनी शिकविणे सोडून दिले होते. वहीदखाँसाहेबांजवळ शास्त्र भरपूर होते. पण मग हिराबाईंना वाटू लागले की आपण काहीसे रेंगाळत

अनुक्रमणिका

आहोत. त्यांना नवीन नवीन शिकायची घाई झाली होती. म्हणून एकदा हळूच त्या उस्तादजींना म्हणाल्या, “माझा मुलतानी आता ठीक बसला आहे. पुढचा राग घेऊ या का?”

वहीदखाँ शांतपणे लोडाला टेकले. घड्याळ काढून बाजूला ठेवले, आणि म्हणाले, “तुला मुलतानी समजला ना? मग म्हणून दाखव.” हिराबाई खूष झाल्या. तबलजींना बोलावले. मग हिराबाईंना समोर बसवून खाँसाहेब म्हणाले, “गा, बेटा. मुलतानी चांगला तासभर तरी गाऊन दाखव. म्हणजे तुझी तयारी झाली असं समजेन.”

वहीदखाँ लोडाला टेकून, डोळे मिटून शांत बसले होते. पण शांतपणाचा हा बनाव होता. कारण लगेच ते म्हणाले, “एखादी तान पुन्हा घेतलीस तर याद राख. राग आळविणं म्हणजे आवर्तन करीत बसणं नाही.” हिराबाई गायला बसल्या खऱ्या, पण पंधरा-वीस मिनिटांतच त्यांची दांडी उडाली. आपली ताकद त्यांना कळून चुकली. त्या ओशाळल्या. त्यांनी गलतीची माफी मागितली. वहीदखाँ रागावले, म्हणाले, “तुझी तयारी काय आहे ते मला माहीत नाही का? बरं झालं की तुलाही ते आता कळलं.” मग ते मवाळले. सावकाशपणे म्हणाले, “अशी घाई करून घरंदाज गाणं येणार नाही. संगीताची आराधना म्हणजे मामुली काम थोडंच आहे? बेटा, हमने वादा किया था. तबियतका गाना सिखानेकी जिम्मेदारी हमने खुदही उठायी थी. हम ऐसा नही छोडेंगे.”

आता त्यांचा आवाज कातर झाला होता. त्यांना हे माहीत होते की हिराबाईंना शिकविण्यात तिचे भले आहे तसेच त्यांच्या स्वतःच्या गायकीचेही चीज व्हायचे आहे. मग ते म्हणाले, “ऐक, गाणं काय असतं ते ऐक. मुलतानी कसा आहे ते ऐक.” मग ते स्वतः गायला लागले खाँसाहेबांचा आवाज सुरेल. त्यांच्या ताना फार परिष्कृत. एकदा घेतलेली जागा पुन्हा येत नव्हती. चढती आलापी तार षड्जावर थांबली म्हणजे श्रवणसुखाची चरम सीमा. खाँसाहेब गायले. हिराबाईंसाठी गायले. हिराबाई समजल्या. त्या ओशाळल्या होत्याच. त्यांनी चूकही कबूल केली होती. आता त्यांना आपण केलेल्या घाईचा पश्चात्ताप होत होता. तो त्या शब्दांनी सांगू शकत नव्हत्या. वहीदखाँनी हिराबाईंच्या चेहऱ्यावरचे भाव जाणले. मग ते मुलायम आवाजात, तंबोऱ्याकडे बोट दाखवून म्हणाले, “तू याची सेवा कर, मग तो तुझी सेवा करील. मेहेनत हा तर गाण्याचा आत्मा आहे. त्याला कंटाळू नकोस. तरच तुझं गाणं लोकांना हवं हवंसं वाटेल.”

स्वरांच्या साधनेत असे मार्गदर्शन हिराबाईंना लाभले होते. त्यांनीही साधनेत कसूर ठेवली नाही. खूप कष्ट उपसले. एक एक स्वर आपलासा करताना त्यांना काळाचे भान राहिले नाही. ती एक तपश्चर्याच होती. याच तपश्चर्येतून संगीत क्षेत्राची विशालता आणि अथांगता त्यांना जाणवू लागली. आणि म्हणूनच त्या संगीतासमोर नतमस्तक झाल्या.

वहीदखाँसाहेब हिराबाईंना शिकवायला मुंबईला आले होते. रोज खूप रियाज होत होता. उस्तादजींनी दाखविलेल्या जागा गळ्यांतून उतरविल्याशिवाय सुटका होत नव्हती.

एकदा हिराबाईंना आकाशवाणीवर गायला जायचे होते. शिकवणीची नेमकी तीच वेळ होती. हिराबाई आईला सांगून गेल्या होत्या की त्या कोठे गेल्या आहेत हे खाँसाहेबांना सांगू नको. इकडे खाँसाहेब घाई करू लागले की, “चला, चंपूताईला बोलवा. तंबोरा घ्या म्हणावं.” शेवटी ताराबाईंना खरे ते सांगावे लागले. मग लगेच दुसरा हुकूम सुटला, “लावा रेडिओ.” रेडिओ सुरू केला. हिराबाई देशी गात होत्या.

अनुक्रमणिका

आवाज जात्याच मधुर. सुरेख लागला होता. तानक्रिया विविध पलट्यांनी नटत होती, स्पष्ट व सुरेल होती. त्यांत बोजडपणा नव्हता. पण गाताना एक फार ढोबळ चूक होत होती. ती चूक हिराबाईंच्या लक्षात आली नव्हती. शेवटी गाणे संपवून हिराबाई घरी निघाल्या.

खाँसाहेब हिराबाईंची वाटच पाहात होते. ते अस्वस्थ झाले होते. शेवटी ते जिन्यात जाऊन उभे राहिले. हिराबाई येत असल्याचे दिसताच खाँसाहेब गरजले, “या. फार मोठ्या गायिका झालात, नाही का तुम्ही?” हे शब्द कानी पडताच हिराबाई अर्ध्या होऊन गेल्या. सारे धैर्य एकवटून म्हणाल्या, “काही चूक झाली का?” खाँसाहेब संतापाने कडाडले, “गलती ख्यालमेभी नही आयी? चलो अंदर. गलती बताता हूँ.” आणि ते लगबगीने मागे फिरले. ते आत आले तसे म्हणाले, “तंबोरा घ्या. करा देशी सुरू”

आता त्यांचा राग मावळला होता. चूक दाखवून ते म्हणाले, “अशा चुका नेहमी घडतात. फक्त ती लक्षात आली पाहिजे. सुधारली पाहिजे. हम बुजुर्ग है किसलिये?”त्यांनी हिराबाईंना गायला लावले. हिराबाईंची भीती पळाली. चूक झाली म्हणून आलेला शरमिंदेपणा गेला. आता चूक लक्षात आली होती. तिला सुधारण्याची जिद्द निर्माण झाली होती. गाणे संपले तेव्हा दुपार उलटली होती. पण वहीदखाँच्या चेहेऱ्यावर पंच-पंच उषःकालची आभा पसरली होती. ही घटना १९४२ ची.

वहीदखाँमध्ये एक वाखाणण्यासारखा गुण होता. तो म्हणजे इतर श्रेष्ठ गवयाविषयी आदर. याचा परिणाम म्हणजे हिराबाईंना गाणे ऐकण्याच्या बाबतीत पथ्य नव्हते. हिराबाईंनी सर्व श्रेष्ठ गायक गायिकांची गाणी ऐकावीत ही त्यांची प्रांजळ इच्छा होती. अल्लादियाखाँच्या शिष्या लक्ष्मीबाई जाधव, विलायत हुसेनखाँ यांच्या पट्टशिष्या इंदिराबाई वाडकर आणि भास्करबुवा बखले यांच्या प्रख्यात शिष्या ताराबाई शिरोडकर यांचे गाणे स्वतः वहीदखाँनी हिराबाईंनी ऐकविले. मग ते म्हणाले, “बेटा बघ. गाणं असं असतं. तूही असंच गावंस अशी माझी इच्छा आहे. प्रयत्न करशील आणि मनात आकांक्षा बाळगशील तर काही कठीण नाही. त्याहीपलीकडची मजल तुला गाठता येईल. त्यांच्या इतपत जर तू गाऊ शकलीस तरच मी तुला बाहेर गाण्याची परवानगी देईन.”

वहीदखाँ हिराबाईंना परोपरीने सांगत होते की जिद्द हवी, महत्त्वाकांक्षा हवी. त्यामुळे हिराबाईंमध्ये एक सूक्ष्म ईर्षा निर्माण झाली. त्या स्वतः ताराबाई शिरोडकरांच्या गाण्यावर मोहित झाल्या होत्या. त्या देवाला आळवीत होत्या की त्या तिघीसारखे गायला मला शक्ती दे, कला दे, प्रेरणा दे. त्यांनी मग प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, विष्णु दिगंबर पलुस्कर आणि भास्करबुवा बखले यांच्यासारख्या मातब्बर मंडळींना हिराबाईंनी ऐकले. नारायणराव बालगंधर्व तर त्यांनी आधाशीपणाने ऐकले. त्यामुळे हिराबाईंच्या गाण्यात तोच तोपणा कधी डोकावला नाही. लहानपणी त्यांनी अब्दुल करीमखाँना ऐकले होते. त्यांच्या गाण्याची छापही हिराबाईंच्या गाण्यावर उमटली. बाईंनी उस्ताद वहीदखाँ यांच्या कलेला पचविले. बखलेबुवा तर स्वतः बाईंच्या प्रगतीची विचारपूस करीत असत. भास्करबुवांचे गाणे म्हणजे एक जीवनानंदाचा योग. हिराबाई हे सारे डोळसपणे समजून घेत होत्या. परकंठप्रवेश करून त्यांनी या साऱ्या कलावंतांना आत्मसात केले व आपले लेणे त्याच्यावर चढवून वेगळेपणही साधले. म्हणूनच हिराबाई दुसऱ्या कोणासारख्या गात नाहीत. त्या आहेत फक्त त्यांच्यासारख्याच. बालगंधर्वाच्या गाण्यावर त्या लुब्ध होत्या तरी त्यांनी बालगंधर्वांची नक्कल कधी केली नाही.

वहीदखाँ सख्त मेहेनतीचा आग्रह धरीत. पण त्यांनी हिराबाईंना आंधळी मेहेनत करू दिली नाही. रियाज करताना नेमकेपणा थोडासुद्धा ढळू दिला नाही. शिकण्यात घाई करू दिली नाही. त्यांच्या गाण्याची तारीफ कधी केली नाही. किंवा ती करणाऱ्याला प्रोत्साहनही कधी दिले नाही. हिराबाई हे सगळे समजून चुकल्या होत्या. शिकताना त्यांचे लक्ष पूर्णपणे गुरुजींकडेच असे. त्यामुळे जे शिकायचे ते त्यांना उस्तादजींनी एकदा दोनदा सांगितले म्हणजे पुरायचे. त्यावर वहीदखाँ इतरांजवळ कौतुकाने म्हणायचे की, "ये बेटी तो गानेकी फोटोग्राफर है. एकदा ऐकले म्हणजे हुबेहुब तसेच्या तसे आपल्या गळ्यातून उतरविते."

स्तुतीने कलाकार वाया जातात असे खाँसाहेबांचे मत होते. म्हणूनच कोणी स्तुती करायला लागले म्हणजे प्रथम ते दादच देत नसत. तरीही तो स्तुतिपाठक न च थांबला तर त्याला स्वच्छ सांगत की, "ये कहनेमे क्या मतलब है? हम पूरा समझते है की हमारी बेटी कहांतक दौड सकती है."

तथापि पुण्याला डॉ. घारपुरे यांचेकडे हिराबाईंच्यावर एक शस्त्रक्रिया होणार होती, तेव्हा खाँसाहेब गदगदून रडले आणि आकाशाकडे पाहून म्हणाले, "या अल्ला, मेरी उमर बेटी को दे दे. उसको तो अभी बहुत काम करना है." याच शस्त्रक्रियेच्या वेळी डॉ. भडकमकरांनी डॉ. घारपुऱ्यांना निरोप पाठविला होता "तार सुरेल आहे. तुटेल. सांभाळून"

हिराबाईंच्या संगीताच्या जडणघडणीत गोहरजानचे नाव विसरता येत नाही. देखण्या रूपाची ही गायिका घोड्यांच्या शर्यतीसाठी पुण्यामुंबईला येत असे. एरवी त्यांचा मुक्काम कलकत्त्याला असे. पुण्याला महंमदभाई नावाच्या गृहस्थांकडे त्या उतरत असत. त्यांनीच हिराबाईंची गोहरजानशी भेट घडवून आणली होती. बुलंद आवाजाच्या या बाई एके काळी अत्यंत लोकप्रिय होत्या.

हिराबाईंवर त्यांची माया जडली. आपल्या जवळच्या ठुमऱ्या, होऱ्या, काही भजने त्यांनी हिराबाईंना शिकविली. 'होरी खेलो मोसे नंदलाला' ही हिराबाईंनी लोकप्रिय केलेली होरी गोहरजाननेच शिकविली होती. तसेच 'राधेकृष्ण बोल मुखसे' हे भजनही गोहरजानचीच देणगी. किंबहुना हिराबाई ज्या ठुमऱ्या बैठकीत गात असत त्यांतील बहुतेक ठुमऱ्या गोहरजाननेच त्यांना शिकविल्या होत्या.

गोहरजानना हिराबाईंचे गाणे अतिशय आवडत असे. हिराबाईंपाशी 'सत्य वदे वचनाला नाथा' हे पद शिकण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु त्या यहूदी बाईंच्या जिभेवर मराठी उच्चार चढणे कठीण होते.

सहवासाने त्या हिराबाईंवर मुलीप्रमाणे प्रेम करू लागल्या होत्या. हिराबाईंच्या मातोश्रींना त्यांचे नेहमी म्हणणे असे की "मुझे ये बेटी गोद लेनी है."

हिराबाई सांगतात की गोहरजानच्या गायकीत खटके मुरक्या हे ढंग नव्हते. पण मींडकाम इतके ढंगदार होते की त्यांची गायकी भरगच्च वाटायची.

वहीदखाँनी हिराबाईंना शास्त्रीय संगीतात तयार केले. नाट्यसंगीतात हिराबाईंना तिघांचे मार्गदर्शन लाभले. बालगंधर्व, सवाई गंधर्व व गोविंदराव टेंबे. तसेच ठुमरीची वाटचाल त्यांनी गोहरजानचे बोट धरून केली.

अनुक्रमणिका

गोहरजानचे नाव निघाले की हिराबाईंना आठवण येते ती घड्याळ जिंकण्याच्या स्पर्धेची.

१९२४–२५ मधील गोष्ट. सालाबादप्रमाणे त्याही वर्षी गोहरजान महंमदभाईकडे उतरल्या होत्या. हिराबाई त्यांना भेटायला गेल्या. महंमद भाईना एक मस्करी सुचली. ते म्हणाले, “आज मी एक स्पर्धा ठेवणार आहे. हिराबाई व गोहरजान दोघींनी गावं. दोघींमध्ये जिचं गाणं उत्तम ठरेल तिला हे घड्याळ बक्षीस.”

हिराबाईंचे वय त्या वेळी वीस एकवीसचं असेल. संगीत शिक्षण अजून चालू होते. त्यांची स्पर्धा एका प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या गायिकेशी? परंतु सर्वच गमती जमतीत चालले होते.

प्रथम हिराबाई गायल्या. तरूण वय व रोजची कसून मेहेनत यामुळे हिराबाईंचे गाणे जमले. स्वतः गोहरजानही कौतुक भरल्या नजरेने आपल्या या मानसकन्येचे गायन ऐकत होती. नंतर गोहरजान स्वतः गायला बसल्या खऱ्या, परंतु आवाजाने त्यांना दगा दिला. खाकरून खोकरून पाहिले. गरम गरम चहा घेऊन पाहिला. पण त्यांचा गळा रुसलेलाच. त्यामुळे त्या मनाप्रमाणे गाऊ शकल्या नाहीत.

घड्याळ हिराबाईंना मिळाले.

गोहरजानना सीताफळे भारी आवडत. त्या दिवशी सकाळी त्यांनी भरपूर सीताफळे खाल्ली होती. त्यामुळे त्यांचा आवाज बसला होता.

## रियाज

हिराबाईंचा संगीत कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन फार वेगळा आहे. जन्मजन्मांतरी करावी लागणारी साधना म्हणून त्या संगीताकडे पाहतात. त्या रियाजाला बसत ते भक्ताच्या श्रद्धेने, स्वर लावत ते योग्याच्या अंतर्मुखतेने. तेथे स्वर हाच त्यांचा परमात्मा असे. त्याच्याच माध्यमांतून त्या नादब्रह्मापर्यंत पोहोचत. श्रद्धा व अंतर्मुखता त्यांना ऋद्धी व सिद्धी प्रमाणे रियाजाच्या खडतर मार्गांवर सोबत करीत.संगीत कला सुद्धा योगसाधनाच आहे. हिराबाईंनी डोळसपणे हे जाणले. म्हणून एक एक गग, एक एक स्वर आपलासा होईपर्यंत त्या त्याला रियाजातून आळवीत असत विनम्र भावाने ही पूजा अखंड करीत. हिराबाई रियाजांतून अशा घडत गेल्या. हिराबाईंच्या संगीतसाधनेत रियाजाला अनन्य महत्त्व आहे.

संगीताचे धडे घ्यायला सुरुवात केल्यापासून संगीत क्षेत्रांतून निवृत्त होईपर्यंत हिराबाईंचा रियाज चुकला नाही. रियाजा बरोबर त्यांचे मननही चालत असे. म्हणून त्यांच्या गायनांत अमोघ व भरीव परिणामकारकता आली.

रियाजांत अनेकदा आपले दोष आपल्या लक्षात येत नाहीत. ते दाखवून देणारे आपुलकीतील असावे लागतात व जाणकारही असावे लागतात. हिराबाईंना असे मार्गदर्शक लाभले होते. ते म्हणजे, त्यांची आई ताराबाई, त्यांचे थोरले बंधू सुरेशबाबू माने आणि गुरू वहीदखाँ. हिराबाई रियाजाला बसल्या की ताराबाई बचकाभर तांदूळ समोर आणून ठेवत. एकदा एक पलटा घेतला की तांदुळाचा दाणा इकडून तिकडे टाकायचा. पुन्हा तोच पलटा. तसाच तांदुळाचा दुसरा दाणा टाकायचा. असा क्रम ते सर्व तांदूळ

अनुक्रमणिका

इकडून तिकडे पडेपर्यंत चाले. मग दुसरा पलटा. यात कुठे थोडा जरी स्वर कमी जास्ती झाला तरी ताराबाई तात्काळ निदर्शनास आणून देत. त्यांचे गुरू वहीदखाँ तर त्यांना नेहमी म्हणत, "तू तंबोऱ्याची सेवा कर. परिश्रमाशिवाय बाकी सब झूट."

या रियाजांत हिराबाईंना कळून चुकले की प्रत्येक स्वरावर आवाज स्थिर राहायला हवा. हे काम मूलभूत असल्यामुळे हिराबाईंनी त्यासाठी फार प्रयास केले व अशा तऱ्हेने एकेका स्वराला सिद्ध करून घेतले.

हिराबाईंच्या मार्गदर्शकांचा कटाक्ष होता की प्रत्येक स्वर तंबोऱ्यात घुसला पाहिजे. जोपर्यंत सप्तकांतला प्रत्येक स्वर साधनेने सिद्ध होत नाही तोपर्यंत परिणामकारकता साधत नाही. समोरच्या श्रोत्यांशी संगीताच्या द्वारा हितगूज साधले जाते. कलाकाराने आपल्या हृदयांतील आनंदलहरी श्रोत्यांच्या हृदयांत संक्रमित करून त्यांच्या भावना हेलावून टाकणे हे कार्य रियाजाने साधते. हिराबाईंनी ही किमया कमावली.

संगीत विश्वात सिद्धपदी आरूढ झालेले अब्दुल करीम खाँसाहेब यांनी हिराबाईंना एक मंत्र दिला होता. सिद्धांच्या सूचना किंवा सिद्धांची सांगी ही मंत्राच्याच योग्यतेची असते. जमनाबाई नावाच्या हिराबाईंच्या एक मानलेल्या मावशी होत्या. त्यांचेबरोबर खाँसाहेबांनी एक निरोप पाठविला होता. या मावशींच्या मधाळ शब्दांच्या मखमली मंजूषेतून खाँसाहेबांची तो मंत्र हिराबाईंपर्यंत येऊन पोहोचला होता. "सुरांकडे सदैव लक्ष असू दे," हा तो मंत्र. हिराबाईंनी तो हृदयसंपुटी सुरक्षित ठेवला. म्हणूनच हिराबाईंचे लक्ष स्वरावरून कधीही ढळले नाही.

संगीताची मैफल केव्हाही संपो. सकाळी उठून मन्द्र सप्तकांतील रियाज झाला नाही असे हिराबाईंच्या जीवनात कधी झालेच नाही. सातत्याने जोपासलेल्या डोळस अनुसंधानामुळे गाण्यात सहजता आली. गाताना त्यांना प्रयास करावे लागले. नाहीत. शारीरिक कसरत करावी लागली नाही. हावभाव नि अंगविक्षेपाची गरज वाटली नाही. ज्या सहजतेने फुलपाखरू एका फुलावरून उडून दुसऱ्या फुलावर जाऊन बसते त्याच सहजतेने हिराबाईंचे स्वर नाजुकपणे विविध रागांतून अवगाहन करू शकले. पारिजाताचे फूल धरतीवर जितके हळूवार उतरावे तितक्या मुलायमपणे त्यांचे स्वर श्रोत्यांच्या हृदयात शिरत असत. त्यांच्या स्वराकृतीत रसिकांना आढळली ती फक्त मृदू नितळ नि कलायुक्त वळणे.

रियाजाने सर्वांत महत्त्वाची जर कोणती गोष्ट घडली असेल तर हिराबाईंना 'स्वधर्म' गवसला. पु. ल. देशपांड्यांसारख्या मर्मज्ञ रसिकाचे मत याबाबत बोलके आहे. ते म्हणाले की, हिराबाईंच्या गाण्याला श्रोते ओरडत नाहीत, स्टँपिंग करीत नाहीत, कारण श्रोत्यांना रिझवायला त्या आपला 'स्वधर्म' सोडून गात नाहीत.

हिराबाईंना 'स्वधर्म' जसा कळत होता तशाच आपल्या मर्यादाही माहीत होत्या. रियाजातून विजिगिषु वृत्ती निर्माण होऊन त्या एक एक मर्यादा ओलांडत गेल्या. आझमबाईंनी त्यांचा हा गुण वाखाणला आहे. त्यांनी म्हटले आहे की, "वार्धक्याची चाहूल लागताच हिराबाईंनी गाणं सोडून दिलं. त्या गात होत्या तेव्हा त्यांचा सूर धुंद करीत असे. त्या सुरांची राणी होत्या."

अनुक्रमणिका

रियाजाची परिणती म्हणूनच की काय, त्यांच्या गळ्यात हमखासपणा आलेला आहे. गुणवत्तेच्या बाबतीत एखादी बैठक कमी जास्त होणे स्वाभाविक आहे. पण बैठक जमलीच नाही असे कधीच घडले नाही. एक एक राग, एक एक तानपलटा, इतका घोटलेला असे की तो त्यांच्या सौजन्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचाच एक घटक व्हावा व आज्ञेप्रमाणे साकार व्हावा.

सुरेलपणा हा हिराबाईंच्या गायनशैलीचा आत्मा. ज्याला सूर गवसला त्याच्या हातात संगीताची गुरुकिल्ली आली. सुरेलपणा आणि रंजकता यांचा संबंध जुळ्या भावंडांप्रमाणे आहे. स्वर-संवाद आवडावा ही मनुष्याची सहज प्रवृत्ती आहे. आपल्या गळ्यातील सूर तंबोऱ्यातील स्वराशी एकजीव करून परिपूर्ण स्वरसंवाद साधावा तो हिराबाईंनीच. तंबोऱ्याशी एकतान झालेला त्यांचा मध्य सप्तकांतील षड्ज इतका मनोहारी असतो की त्याच्या लगावाबरोबरच रसिक मनावर त्या आपले अधिराज्य प्रस्थापित करतात. संगीत सभा आपल्या अंकित करून घेण्याची ही सुरुवात असते. त्या षड्जांतून मग इतक्या सहजतेने स्वर उमटतात की जशी कळी उमलावी. रागांत प्रत्येक स्वराची जी श्रुती अभिप्रेत असेल ती नेमकी पकडणे हा हिराबाईंचा सहज धर्म झालेला आहे.

आपल्या विलोभनीय पंखांचा भरघोस पिसारा मोर जसा पसरवतो तसे एकाच स्वराला नाना रीतीने सजवून चित्तवृत्ती भारून टाकणे हे हिराबाईंचे कसब आहे. एकाच स्वराचे विविधरंगी आणि देदिप्यमान स्वरूप त्या लीलया प्रगट करतात. एखादे झुंबर सहस्त्र ज्योतींनी प्रकाशमान करून फिरवावे तसे त्यांचे गाणे ऐकताना वाटते.

गोडवा हाही एक दैवी गुण हिराबाईंना लाभलेला आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व सौजन्यशील, ऋजू, सुसंस्कृत आणि माधुर्याने विनटलेले असल्यामुळे त्यांच्या कलेची अभिव्यक्ती त्याच दर्जाने मधुर झालेली आहे. जे आहे त्याचा अभिनिवेश नाही. त्यांच्या स्वभावातला संयम त्यांच्या गाण्यातही आहे.

माधुर्याच्या जोरावर हिराबाईंनी सामान्य जनांना मोहून टाकले. रामकृष्णबुवा वझे म्हणाले होते, “हिराबाईंचे गाणे अज्ञांकरता होते नि तज्ज्ञांकरताही. हे गोड गाणे ऐकून रोगी सुद्धा बरा होईल.” त्यांच्या गाण्यात बौद्धिक आनंद तर असतोच पण भावनांशी हितगुज करणारा कलात्मक आनंदही असतो. माधुर्याने हा कलात्मक आनंद द्विगुणित होतो.

## लय गवसली

आपल्या जीवनाचे यश अपयश आपल्या परिश्रमावर तर अवलंबून आहेच; पण योग्य वेळी परिश्रम होण्यालाही तितकेच महत्त्व आहे. याला आपण ‘वेळ साधणे’ म्हणू या. हिराबाईंना ही वेळ नेमकी साधता आली.

हिराबाईंच्या आईची इच्छा होती की आपल्या कन्येने डॉक्टर व्हावे. काळाच्या मानाने ही इच्छा तशी महत्त्वाकांक्षीच होती. बरीच पुढची झेप होती. पण चाकोरीबद्ध होती. काय सांगावे, कदाचित तिथेही हिराबाईंच्या हातून युगप्रवर्तक कार्य घडले असते. पण हिराबाईंनी वेगळीच वाट धरली.

अनुक्रमणिका

आपल्या मनाचा कल जाणणे, आपल्यातील गुण नि त्रुटी यांचा जमाखर्च मांडून त्याप्रमाणे कार्यप्रवृत्त होणे, हे काम सोपे नाही. पण ते हिराबाईंनी साधले. आपला उत्कर्ष कशात आहे, हे त्यांनी अचूक ओळखले आणि त्या संगीताकडे वळल्या.

हिराबाई केवळ कलावतीच झाल्या नाहीत तर त्या किमयागार झाल्या. नुसत्या किमयागार राहिल्या नाहीत तर एक प्रवर्तक झाल्या. त्यांनी नवीन पायंडे पाडले. पाडलेल्या पायंड्यांचे यशापयश काळाने ठरविले. ते पाहायला त्यांना दीर्घ आयुष्य लाभले. आज त्यांच्या कार्याचे त्या जेव्हा सिंहावलोकन करतात तेव्हा स्वातंत्र्यवीरांसारखे त्यांनाही म्हणता येईल—

धन्योऽहं धन्योऽहं कर्तव्यं मे न विद्यते किंचित्।
धन्योऽहं धन्योहं प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम् ॥

हिराबाईंचा उत्कर्ष झाला आणि तो त्यांच्या शुद्ध चारित्र्याने उजळून निघाला. म्हणूनच बैठकींतील गाणे त्यांना माजघरापर्यंत नेता आले. कुलस्त्रीसाठी संगीताचे क्षेत्र निःशंक करता आले. संगीत क्षेत्रालाच त्यांनी शालीनतेचा साज चढवला. अलोट कीर्तीनंतरही त्यांनी आपला मूळचा विनम्र भाव सोडला नाही. आपल्या सार्जिद्यांवर कधी चिडल्या नाहीत. त्यांचे साथीदार केवळ त्यांचेच राहिले. पंचवीस ते तीस वर्षे साथ देणे व साथ घेणे सोपे नाही.

त्यांचे गाणे तर उच्च दर्जाचे होतेच; पण त्यांचे इतर गुणही थोर होते. त्याग, ईश्वरावरची अविचल श्रद्धा, तत्त्वनिष्ठा, व्यवहारांतील सतर्कता व चोखपणा, हजरजबाबीपणा, मिस्किलपणा, असे त्यांचे कितीतरी गुण सांगता येतील.

त्यांचे सारे स्वभाव विशेष त्यांच्या संगीत जीवनात सहज दिसतात. शोधावे लागत नाहीत. ते पाहिले की वाटते, हिराबाईंना जीवनाची लय सापडली आहे.

अनुक्रमणिका

## ॥ २ ॥

**सत्त्वपरीक्षा**

हिराबाईंनी ज्या काळात गायनाच्या क्षेत्रात पदार्पण केले तो काळ संगीताला विपरीत होता. गाणे प्रतिष्ठित माणसाचे काम समजले जात नसे. स्त्रियांच्या बाबतीत तर नाहीच नाही. ती जाणीव हिराबाईंला लहान वयातच झाली. नुसते शारीरिक कष्ट करून भागत नव्हते तर मानसिक क्लेशही सहन करावे लागत होते. त्यांच्या प्रगतीच्या एका पावलागणिक संकटांचे आघात होत होते. त्यांची सत्वपरीक्षा सुरू होती. पण हिराबाई थांबल्या नाहीत. दुःख उगाळीत बसणे हा त्यांचा स्वभाव नाही. मनाने जे ठरविले ते पार पाडण्यासाठी त्या प्रयत्नांची पराकाष्ठा करू लागल्या. लहानशी गोष्ट करायलाही अपार कष्ट पडतात, हे त्यांना अनुभवाला आले. अशा असंख्य अनुभवांतून त्या स्थितप्रज्ञतेकडे झुकल्या. “लाभालाभौ जयाजयौ” त्यांना सारखेच वाटू लागले.

संगीत बैठकींच्या इतिहासात १९२४ हे साल एका वेगळ्याच कारणाने गाजले. या वर्षी एका नवीन प्रथेची सुरुवात झाली. हिराबाईंनी गाण्याचा जलसा तिकीट लावून करायचे ठरविले. या आधी पुरुष गायकांनी आपले शास्त्रीय संगीताचे जलसे तिकिटे लावून केलेले होते. परंतु स्त्रीकलाकार म्हणून हिराबाईंनी घेतलेला हा निर्णय धाडसाचाच होता. पुण्याच्या आर्यभूषण थिएटर मध्ये हा जलसा झाला. पैशाची निकड निभवणे हाच त्यामागे हेतू होता. या तिकिटावरून त्या काळात वादळ उठले गाणाऱ्यांना वाटले की हिराबाईंनी गाणे स्वस्त केले.

हिराबाईंनी जलश्याची भरपूर जाहिरात केली. त्यांचे भाऊ कृष्णराव आणि सुरेश बाबू यांनी जाहिरातींचे फलक घरीच तयार केले. रात्रीच्या अंधारात स्वतः ते गावात महत्त्वाच्या जागी लावले. सर्वात वरचे तिकीट तीन रुपयांचे आणि सगळ्यात खालचा दर फक्त आठ आणे. काही गवयांनी बाईंना ऐकविले की तुम्ही शास्त्रीय संगीताची किंमत फक्त आठ आणे ठरविलीत.

ठरल्या वेळी जलशाला सुरुवात झाली. थिएटरमध्ये एकही स्त्री उपस्थित नव्हती. त्या काळी स्त्रिया संगीत जलशाला जात नसत. पुरुष जात. पण तेही लपत छपत. पुण्यातील पगड्या पागोटी त्या दिवशी थिएटर मध्ये टोप्या घातलेली दिसली. टांगत्या गॅसबत्त्या सभागृहात लावल्या होत्या. चार सहा गॅसबत्त्यांचा प्रकाश तो काय, पण तेव्हा तो खूप वाटला. रंगमंचाची सजावट फारशी नव्हतीच. ध्वनिक्षेपक त्या काळी नव्हते. किंबहुना ध्वनिक्षेपकासमोर गाणे गवयी पसंत करीत नसत. श्रोत्यांनाही यंत्रातून आलेला आवाज नको होता.

बैठकीला सुरुवात झाली. हिराबाई मन लावून त्यांच्या योजलेल्या आकृतिबंधाप्रमाणे गायल्या. बैठकीत हळू हळू रंग भरत गेला. गाणे संपले तेव्हा श्रोते तृप्त दिसत होते.

ही बैठक म्हणजे संगीताच्या वाटचालींतला एक महत्त्वाचा टप्पा. स्त्री कलाकारांना उपजीविकेचा एक राजरोस मार्ग दाखविणारा. श्रोत्यांना हक्काची जागा देणारा. कोणी आमंत्रण द्यायला नको, किंवा उपकार करायला नको.

त्या काळी वर्तमानपत्रांतून गाण्याच्या कार्यक्रमांची चर्चा होत नसे. पण अशा जलशांबद्दल काही दिवसांनी परीक्षणे येऊ लागली. संगीत मैफिलींना वर्तमानपत्रातून दाद मिळण्याचा आरंभ या जलशाने झाला.

हिराबाई एकदा पोमलवाडी या गावी कार्यक्रमासाठी गेल्या. पोमलवाडी हे खेडेवजा गाव कुर्डूवाडीजवळ आहे. त्या वेळी त्या आवघ्या तेरा वर्षाच्या होत्या. बरोबर सुरेशबाबूही होते. ते सुद्धा लहानच. सतरा वर्षांचे. तबल्यासाठी बळवंतराव रुकडीकर तर दत्ताराम पर्वतकर सारंगीसाठी होते. कमलाबाई या धाकट्या भगिनीही बरोबर होत्या. ही सारी मंडळी स्टेशनवर उतरली. आपले सामान आणि वाद्ये उतरविली व इकडे तिकडे नजर टाकू लागली. कार्यक्रम ठरवायला आलेले कोणीही स्टेशनवर दिसत नव्हते. तुम्हाला उतरवून घ्यायला आम्ही स्टेशनवर येऊ असे त्यांनी सांगितले होते. पण कोणी आले नाही. गाव अगदी लहान. सामान न्यायला हमाल नाहीत. टांगा किंवा बैलगाडी नाही. शेवटी सामान डोक्यावर घेतले, आणि मार्गक्रमणा सुरू झाली. गावाला या गोष्टीची चाहूल लागायला वेळ लागला नाही. हळूहळू गावकरी भोवती गोळा झाले. म्हणायला लागले, “कोल्हाटणी दिसताहेत.”

रस्ता विचारत बळवंतराव आणि दत्ताराम पुढे चालत होते. या दोन मुलींचे चालणे त्यांच्यापेक्षा मंद होते. पुढे जाणाऱ्या आणि मागे राहाणाऱ्यांच्या मध्ये एक संपर्क दुवा म्हणून सुरेशबाबू रेंगाळल्यागत या छोट्या मिरवणुकीच्या मध्यभागी होते. लोकांचे बोलणे कमलाबाईंना स्पष्टपणे ऐकू येत होते. त्यांना कोल्हाटणी म्हटल्याचे त्यांनी ऐकले आणि त्या रडायला लागल्या. सुरेशबाबूसुद्धा गोंधळले. पण हिराबाईंनी धीर एकवटला. वडीलकीच्या नात्याने त्या कमळाबाईंची समजूत काढू लागल्या. या समजुतीतून सुरेशबाबू सुद्धा सावरले व एकदाचे मुक्कामाचे ठिकाण आले.

दुर्दैव संपायला अजून अवकाश होता. काही वेळाने जेवणाची वेळ झाली. सणावाराला गडी माणसाला जेवायला पोटभर मिळते. पण या ठिकाणी तीही दानत या संयोजकांत नव्हती. माणशी दोन पोळ्या देऊन त्यांनी त्यांची बोळवण केली. १९१८ सालची ही गोष्ट.

पण हा अपमान सांगायचा कोणाला? जखमेवर फुंकर तरी कोण घालणार? अपमान उगाळीत बसायचा नसतो, तर पचवायचा असतो. हिराहाईंनी असे खूप पचवले आहे.

हिराबाई सतरा अठरा वर्षांच्या असाव्यात. मुंबईला त्या काळी सर्वतोमुखी नाव असलेल्या एका गायिकेने हिराबाईंना सत्यनारायणाच्या तीर्थप्रसादासाठी बोलाविले.

त्या दिवशी बॉम्बे थिएटरमध्ये हिराबाईंच्या गाण्याचा कार्यक्रम होता. तो आटोपल्यावर त्या घरी आल्या नि जेवायला बसल्या. इतक्यात हिराबाईंचे एक साथीदार दत्ताराम पर्वतकर आले आणि त्यांनी हिराबाईंना सत्यनारायणाच्या पूजेची आठवण दिली जेवण आटोपल्यावर लगेच हिराबाई त्या ज्येष्ठ गायिकेकडे गेल्या. त्यांचेबरोबर त्यांचे बंधू कृष्णरावही होते.

तेथे जाऊन पाहतात तो तेथे गाण्याची जय्यत तयारी दिसली. बैठक तयार होती. लोड ठेवलेले होते. उदबत्त्यांच्या सुवासिक वातावरणात एक धुंदी आली होती. हिराबाईंनी त्या गायिकेला विचारले,

अनुक्रमणिका

"गाणं कुणाचं आहे?" त्या म्हणाल्या, "तुमचंच आहे. आम्ही तुमचीच वाट पाहत होतो." तेथे बापूराव पेंढारकर आणि दीनानाथ मंगेशकर कितीतरी आधीपासून आलेले होते. ते सुद्धा वाटच पाहात होते.

हिराबाई म्हणाल्या, "माझं जेवण झालं आहे. आता मी कशी गाणार?" एकतर हिराबाईंना हेही माहीत नव्हते की आज आपल्याला गायचे आहे. बाईंचे वय कोवळे, काय करावे, म्हणून त्या भांबावल्या होत्या. त्या ज्येष्ठ गायिकेची अवज्ञा होऊ नये असे वाटत होते, तर भरल्या पोटी कसे गायचे हा प्रश्न होता. इतक्यात त्या गायिका म्हणाल्या, "तुम्ही घाबरल्या तर नाही?" हा प्रश्न करण्यामागे हिराबाईंचा पाणउतारा करावयाचा त्यांचा हेतू असू शकेल. त्यांचे बोलणे सरळ वाटत नव्हते मात्र खरे.

बापूरावांना आणि दीनानाथांना केवळ तेवढ्याच साठी बोलविले होते. हिराबाईंना मात्र 'गायचे आहे' असे सांगितले नव्हते बापूरावांना हिराबाईंचे गाणे आवडत असे. दीनानाथांना तर आपल्या या मानलेल्या भगिनीचे सतत कुशलच घडावे असे वाटत होते. हिराबाईंना थोडी सुद्धा आधी सूचना न देता गायला सांगणे त्या दोघांनाही आवडले नाही.

दीनानाथ हिराबाईंच्या मदतीला धावून आले. त्यांनी तेथेच बसल्या बसल्या प्रश्नकुंडली मांडली. त्यांचा ज्योतिष शास्त्राचा व्यासंग सगळ्यांच्याच परिचयाचा होता. दीनानाथ एकदम म्हणाले, "हिराबाई, तुम्ही खुशाल गा. 'म' अक्षर निघाले आहे. अहो, तुम्ही जेवलात तरी काय झालं? तुमच्या गळ्यात सूर आहे, तो पोटात अन्न गेल्यामुळे रुसून थोडाच बसणार आहे? गा खुशाल." दीनानाथांना बाईंचा अतिशय कळवळा. एवढ्यात बापूराव दीनानाथांशी काही संगनमत करून हिराबाईंजवळ आले. आणि हळूच त्यांच्या कानाशी पुटपुटले. क्षणाचाही विलंग न लावता हिराबाई बैठकीवर जाऊन बसल्या.

तंबोऱ्याच्या तारा जुळल्या. बाईंनी मालकंस आळवला. जेवण झालेले होते तरी गाण्यात थोडेही न्यून आढळले नाही. त्या जमून गायल्या. बापूराव व दीनानाथ सतत दाद देत होते. गाणे चढत्या श्रेणीने रंगत गेले. हिराबाईंचे कसब पाहून दोघेही भारावून गेले.

बैठक दोन-अडीच तास झाली. बैठक अशी रंगली की इतरही "वाहवा" नि "बहोत अच्छे" ची खैरात करू लागले. पळापळाने रंगत वाढतच होती. शेवटी दीनानाथ व बापूराव उठले आणि त्यांनी बैठक संपल्याचे जाहीर केले.

इचलकरंजी संस्थानच्या महाराजांच्या गुणग्राहकतेबद्दल बराच बोलबाला होता. साहित्य, चित्र, शिल्प, आदी कलांचे ते रसिक होते. संगीत हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. त्यांनी एकदा त्यांच्या खाजगीवाल्यांकडे चौकशी केली की सध्या गायनाच्या क्षेत्रात कोण नवीन आहे? महाराजांनी अनेक जुने कलाकार ऐकले होते. कीर्तनकार पट्टीचा गाणारा असेल तर ते कीर्तन ऐकत असत. एखाद्या दर्ग्यात आलेला सुरेख लय सांभाळणारा बेफिकीर फकीर त्यांना वर्ज्य नव्हता. पंढरीच्या यात्रेला निघालेल्या एखाद्या वारकऱ्याची "विठ्ठला" म्हणून आर्ततेने मारलेली तान त्यांना सुखविल्याशिवाय राहत नसे. महाराजांना नवीन नवीन ऐकण्याचा शौक होता.

कोणी तरी सुचविले की सध्या पुण्याची हिराबाई नावाची मुलगी खूप तयारीने गाते असे ऐकतो. महाराजांनी हिराबाईंना रीतसर बोलावणे पाठविले. बाई आल्या. रात्री बैठकीत मानकरी आपापल्या जागी

स्थानापन्न झाले. वाद्ये सुरात लावून झाली. महाराजांचे आगमन झाले. प्रथेप्रमाणे महाराजांचा योग्य तो आदर झाला. गाणे सुरू करण्यापूर्वी, बाईंनी रीतीप्रमाणे महाराजांची अनुज्ञा मागितली. हीच हिराबाई आणि महाराजांची भेट. वीस-एकवीस वर्षाची कृश मुलगी महाराजांना दिसली आणि त्यांनी मृदू आवाजात विचारले, "बेटा, तू किती वेळ गाऊ शकशील?"महाराजांना वाटले असेल की ही इतक्या लहान वयाची व किरकोळ प्रकृतीची मुलगी गाऊन गाऊन किती गाणार? महाराजांना तिची कीव आली असावी.

हिराबाईंना आपली कोणी कीव करणे मान्य नव्हते. त्या स्वतः आपल्या ताकदीविषयी निःशंक होत्या. आत्मविश्वासाला नम्र बनवून त्या महाराजांना म्हणाल्या, "आपण ऐकाल तितका वेळ मी गाईन."

महाराजांना हे उत्तर आवडले. उत्तराची पद्धती सुद्धा आवडली. उत्तरामागचे सामर्थ्यही जाणवले. आता ते किती खरे नि किती फसवे हे पहायचे होते.

साडेनवला बैठक सुरू झाली. बाई शुद्धकल्याण गाऊ लागल्या. हा राग त्यांचे गुरु वहीदखाँसाहेब यांचा आवडता. हा गळ्यावर चढवायला त्यांनी खूप मेहेनत घेतली होती. या रागाला किराणा घराण्याच्या गायकीत मानाचे स्थान आहे. तसेच हिराबाईंच्या जीवनात या रागाबद्दल एक वेगळा संदर्भ आहे.

गाता गाता तो संदर्भ हिराबाईंच्या दृष्टीसमोर तरळू लागला. प्रथम दर्शनी आरोहात भूपाचा तोंडवळा दाखविणारा हा राग खाँसाहेब शिकवू लागले तेव्हा त्या म्हणाल्या होत्या, "खाँसाहेब, आपला भूप तर झालेला आहे." खाँसाहेब झालेल्या भूपचीच तर पुन्हा तालीम देत नाहीत ना, अशी शंका नवीन राग शिकायला उत्सुक असलेल्या त्यांच्या मनात डोकावली. खाँसाहेबांच्या कल्लेदार मिशांतून हसू ओघळले. ते म्हणाले, "बेटी, आगे तो सुन लो." आणि तार षड्जावरून धैवतावर येताना मींडेने येणारा निषाद व पंचमावरून गंधारावर येताना मींडेने येणारा मध्यम हिराबाईंना मोहवून गेला. अशा पद्धतीची तंत अंगाची मींड तोपर्यंत कुठल्याच रागात त्या शिकल्या नव्हत्या. ती गळ्यावर चढविण्यासाठी खाँसाहेबांनी प्रयत्नांची शिकस्त केली. तसेच देसकारापासून हा राग कसा सांभाळून ठेवावा याचे खाँसाहेबांनी केलेले तात्त्विक विवेचनही त्यांना आठवले. या साऱ्या स्मृती मनात घोळवीत हिराबाई गात होत्या— 'तुम बीन कौन खबरीया.' प्रत्येक पंचमाची व षड्जाची मींड वाहवाची दाद घेत होती. रागाच्या अवरोही चलनाने समर्पित भाव स्वरातून निथळत होता. राग संपला तेव्हा दीड तास होत आला होता.

संपूर्ण स्वतंत्र वैशिष्ट्यांसह हिराबाई गात होत्या. त्यांची विलंबित आलापाची अनुपम पद्धती महाराजांना सुखवून गेली. मधल्या विश्रांतीत महाराजांनी विचारपूस केली व दमली असशील तर आटोपते घ्यायला सांगितले. बाई म्हणाल्या, "छे, मी दमले नाही. पण....." तो शब्द तेथेच तोडून महाराज म्हणाले, "आम्ही अगदी पहाट फुटेपर्यंत बसायला तयार आहोत."

विश्रांतीनंतर बैठक आणखी रंगली. बाईंनी ठेवणीतला मालकंस काढला. भजने व नाट्यगीते आटोपल्यावर भैरवी झाली. तेव्हा साडेतीन वाजून गेले होते.

नागपूरचा उल्लेख झाला म्हणजे हिराबाईंच्या वार्धक्याने क्षीण झालेल्या नजरेत एक चमक येते. नागपूरचा रसिक सहजासहजी कोणाला मान्यता देत नाही. पण एकदा का कलाकाराची परीक्षा झाली म्हणजे नागपूरकरांच्या दिलेर वृत्तीला घरबंध नसतो. तो काळ असा होता की स्त्रियांनी संगीताचे जलसे

करायचे हेच क्रांतीचे पाऊल होते. असा एक जलसा नागपूरला व्हायचा होता. दिवस ठरला. जाहिरात झाली. सभागृह खचाखच भरले. तबल्यावर बळवंतराव रुकडीकर. सारंगीवर बाबुराव कुमठेकर. पण पडदा वर जाताच हिराबाईंच्या कृश आकृतीकडे पाहून कुजबूज सुरू झाली, “अरे ही काय गाणार? आपले पैसे फुकट गेले रे बाप्पा!”लोक पोळ्याच्या मारबतीच्या वेळेला जसे हेल काढून ओरडतात तसे ओरडू लागले. काही लोकांनी हिराबाईंना अगोदरच भीती घातली होती. त्याचा प्रत्यय येऊ लागला.

हिराबाईंना सुरेशबाबूंनी धीर दिला. बळवंतराव रुकडीकर म्हणजे उंचापुरा पहिलवान गडी. एक आधार वाटायचा. शिवाय वयही बरेच अधिक. तितक्या उन्हाळ्या-पावसाळ्यांचे जास्त अनुभव त्यांच्या पदरी होते. त्यांनी तबल्यावर थाप ठेवली म्हणजे तबला झाकून जायचा. ते हिराबाईंना हळूच म्हणाले, “ही तर परीक्षा आहे. शांत राहून गाणं सुरू कर.”

बाईंनी तंबोऱ्यावर बोटे फिरविली. तारा छेडल्या गेल्या. तंबोरा घुमू लागला. तंबोरा असा सुरेल लागला होता की समोरच्या रांगेत बसलेल्या जाणत्या श्रोत्यांना कळून चुकले की आजचे गाणे ‘तय्यार’ आहे.

कुजबूज हळूहळू कमी झाली. अस्ताई संपवून हिराबाई समेवर आल्याबरोबर सर्व सभागृह गर्जून उठले “हां!” दाद तर सुरेख मिळाली. समजूतदारीची नि जाणती. हिराबाईंची भीड चेपली. त्या काहीशा मोकळ्या गाऊ लागल्या.

त्या शंकरा गात होत्या. आलापीच्या अंगाने बढत करत होत्या. सट्‌ट्याच्या ताना फारच स्वच्छ जात होत्या. पण त्यात आतषबाजी नव्हती. शंकरा रागाची प्रकृती काहीशी आक्रमक तरी उदात्त. त्यात हिराबाईंच्या स्वभावाचा स्थायी भाव असलेला शांतरस मिसळला ते मिश्रण इतके मनोहारी झाले की कळत न कळत सर्व श्रोते वाहवा देऊ लागले. तन्मय होऊन गेले. पहिल्या रागांतच हिराबाईंनी सभा जिंकली.

त्यानंतर नागपुरात एकामागून एक असे आठ आणि अवती भोवतीच्या गावांत पाच असे एकूण तेरा जलसे झाले. पुढे जेव्हा जेव्हा त्या नागपुराला गेल्या तेव्हा तेव्हा त्यांना लोकांनी डोक्यावर घेतले.

नागपुरचे हिंदुमहासभेचे अधिवेशन हिराबाईंच्या चांगले लक्षात आहे. त्या अधिवेशनात हिराबाईंचे गायन झाले. बाईंना तो कार्यक्रम निःशुल्क मागण्यात आला होता. बाईंनी सुद्धा तो आनंदाने मानधन न घेता दिला. पण महासभेने मात्र या कार्यक्रमाला तिकीट लावले. लोकांना त्याची कुणकूण लागली. हिराबाईंनी जर कार्यक्रम फुकट दिला आहे तर आमच्यापासून पैसे कां घ्यावेत? असे ते आपसांत बोलू लागले.

हिराबाई गानमंचावर गेल्या. साथीदार अगोदरच येऊन बसले होते. मांडवात फक्त पंधरा-वीस श्रोते होते. पण मांडवाबाहेर गर्दी उसळली होती. इतक्यांत विजेचे दिवे गेले. सगळीकडे अंधार झाला. एकदम गलका सुरू झाला. हिराबाई घाबरल्या. त्या गोंधळात काय घडेल नि काय नाही. तेवढ्यात कोणी तरी रंगमंचावर चढले. त्या माणसाजवळ मंद प्रकाशाचा टॉर्च होता. तो हिराबाईंना म्हणाला, “ताई, तुम्ही घाबरू नका. तुम्ही स्वस्थ बसा.” नंतर तो खाली उतरला. तोच दिवे आले.

[अनुक्रमणिका](#)

तेवढ्यात मांडव श्रोत्यांनी खच्चून भरला होता. दिवे लागताच आरडा नाही की ओरडा नाही. सगळे जणू तिकिटे काढून ऐटीत बसले होते. श्रोतृवर्ग प्रतिष्ठित दिसत होता. मघाशी मांडवात फिरणारे स्वयंसेवक आता दिसेनासे झाले होते. आता मांडवात स्वयंशासन आले होते. सगळीकडे निःशब्द शांतता पसरली होती.

बाईनी त्यांच्या भात्यातील ठेवणींतला पटदीप बाहेर काढला. त्या रागातील 'धन धन बाजू रे' ही आडाचौतालातील चीज मोठ्या डौलाने त्यांनी पेश केली. सहजता हे त्यांचे वैशिष्ट्य. गाण्यातील हमखासपणा हे त्यांच्या तपस्येचे फळ माधुर्याची तर त्यांना ईश्वरदत्त देणगी. पहिल्या अर्ध्या तासात बाईचे गानकलेवरील प्रभुत्व लोकांना कळून चुकले.

'मीराबाई' या नाटकातील 'सखे मी मुरारी वनी पाहिला' या प्रसिद्ध गीताद्वारे हिराबाईनी भीमपलास आळवला. नंतर 'राधेकृष्ण बोल' या भजनाने सभा संमोहित झाली. पहाटे गाणे संपले तेव्हा चार वाजून गेले होते.

**यशोयात्रा**

प्रसिद्धीला काही योग यावे लागतात. असा एक योग हिराबाईच्या जीवनात अकल्पितपणे आला. १९३७ साली भूपेंद्रबाबू घोष यांनी एक संगीत सभा कलकत्त्याला भरवली. त्या काळी 'संगीत सभा' हा शब्द रूढ नव्हता. 'म्युझिक कॉन्फरन्स' म्हणत असत. फार थोड्या ठिकाणी या संगीत-सभा भरत असत. अशीच एक 'ऑल इंडिया म्युझिक कॉन्फरन्स' भूपेंद्रबाबूंनी घेतली होती. तिची सर्व व्यवस्था खन्नाबाबूंकडे होती. त्या वेळी केसरबाई केरकर हिंदुस्थानात सर्वमान्य झालेल्या होत्या. त्यांच्या सूचनेवरून हिराबाईंना या कॉन्फरन्सचे बोलावणे आले.

खन्नाबाबू आणि जद्दनबाई यांनी हिराबाईंचे गाणे ऐकूनच त्यांना निमंत्रण दिले. हिराबाईना साथ करायला त्यांचे नेहमीचे साथीदार कलकत्त्याला गेले. सुरुवातीला हिराबाईनी शंकरा आळवला. एक निरामय शांत असे वातावरण तयार झाले. बाईनी त्यानंतर होरी गायिली. स्वरांचा मान राखून गीतातील शब्द आणि अर्थ त्या विशद करीत होत्या. सामान्य जनतेला आकृष्ट करून शब्द व अर्थ या द्वारे संगीतात गुंतवून ठेवण्याची शक्ती होरीत आहे. त्यात भावांना आवाहन असते. रस-निर्मिती हे त्यातील लक्ष्य असते. होरी हा ललित गायनाचा एक प्रकार. त्यातील लाडिकपणा सांभाळता आला पाहिजे. यात भावनांना आवाहन असल्यामुळे हा प्रकार बंगालमध्ये विशेष आवडीचा. नंतर लोकांनी मागणी केली म्हणून हिराबाईनी 'राधे कृष्ण बोल' हे भजन म्हटले. भजन हा प्रकार सगळ्यांसाठीच मोकळा. सुस्पष्ट शब्द भावानुकूल स्वरात घोळले म्हणजे गाणे समजणारा नि न समजणारा दोघेही मोहित होतात. 'अकेली मत जैयो राधे जमुनाके तीर' ही भैरवी म्हणजे हिराबाईंच्या गाण्याचा कळस.

हिराबाई शांतपणे गात होत्या. बाईंचे वय बत्तीस वर्षांचे म्हणजे लोकेषणेचेच. चमत्काराचे आकर्षण या वयात असते. पण असा प्रकार पुसटही त्यांच्या ठायी नव्हता. बाई गाण्यासाठी गात होत्या. गाणे संपले तेव्हा केसरबाईंनी तोंड भरून कौतुक केले. हिराबाई गाण्यापूर्वी सर्वांना संशय वाटत होता की ही काय गाणार? कृश बांध्याची, लहान चणीची, काळसर वर्णाची आणि सालस वळणाची पोरसवदा स्त्री आपला रुबाब जमविणार कसा? असा प्रश्न सभेच्या संचालकांनाही पडला होता. गाणे ऐकल्यावर तो शिल्लक

राहिला नाही. सामान्य श्रोत्यालाही हिराबाईंनी आपल्या गानकलेने भारून टाकले होते. बाईजवळ गानकला भरीव आणि व्यापक स्वरूपात तर होतीच, पण तिचा समर्पक वापर करण्याची चतुराईही होती. हिराबाई गात म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे शिल्पच साकारत असत.

त्या संगीत सभेनंतर 'अमृत बझार पत्रिके'ने त्यांचे मूल्यमापन करून कलकत्त्याला संगीत रसिकांत एका रात्रीत त्यांना प्रसिद्ध करून टाकले. पत्रिकेने लिहिले होते—

"किराणा घराण्यात अब्दुल करीमखाँसाहेबांच्या कलेशी स्पर्धा करू शकणारी उंची हिराबाईंनी कमावली आहे. एवढेच नव्हे तर खाँसाहेबांना क्वचित चमत्कृती दाखविण्याचा जो मोह होत असे त्यावर हिराबाईंनी विजय मिळविला आहे."

पूर्वी एखाद्या ऐपतदार श्रोत्याला गाणे फार आवडले तर तो गाणाऱ्याला सुवर्णपदक देत असे. अशी किती तरी सुवर्णपदके हिराबाईंना मिळाली. या संगीत संमेलनांमध्ये पहिल्या दर्जाचे बहुतेक गायक-वादक येत त्यामुळे हिराबाईंचे नाव हिंदुस्थानभर व्हायला मदत झाली. बाईंना यानंतर अलाहाबाद कॉन्फरन्सचे बोलावणे आले. तिथेही त्यांनी आपले बावनकशी सोने सिद्ध केले. अशी त्यांची उत्तरेकडील यशोयात्रा कलकत्त्याच्या प्रवेशद्वारातून सुरू झाली.

१९३७ साली कलकत्त्याच्या सांगीतिक क्षेत्रात हिराबाईंनी नाव कमावले त्यामुळे पुढच्याही वर्षी तेथील म्युझिक कॉन्फरन्सचे त्यांना निमंत्रण आले. ही संगीत सभा नाहरबाबूंनी आयोजित केली होती. देशभराचे मोठमोठे कलावंत आले होते. अल्लाउद्दीन खाँ, अली अकबर, रविशंकर, केसरबाई, थिरकवा, ही त्यांतली काही नावे. मुंबईहून रोशनआरा बेगम आणि हिराबाई होत्या. या दोघींचे गाणे एकाच दिवशी व्हावयाचे होते.

रोशनआरा बेगम अगोदर व नंतर हिराबाई असा क्रम लागला. रोशनआरा बेगम गात उत्तमच. त्याही किराणा घराण्याच्याच. अब्दुल करीमखाँ यांच्या शिष्या. त्यांनी प्रथम शंकरा आळवला. सगळ्यांच्या माना डोलू लागल्या. त्यांच्या गाण्यात सहजता होती नि दिमाखही. द्रुत लय सुरू झाली तेव्हा तानांची आतषबाजीही पहायला मिळाली. बाईंची तयारी लपत नव्हती. श्रोते खूष झाले. नंतर 'पियाबीन नाही आवत चैन' ही झिंझोटी रागातील ठुमरी त्यांनी अतिशय कलापूर्ण पेश केली. त्या खाँसाहेबांची सही सही नक्कल करीत होत्या. लोकांना त्याचे कौतुक वाटत होते. शेवटी त्यांनी एकाएकी 'जमुनाके तीर' ही भैरवी सुरू केली त्या वेळी रात्रीचे फक्त अकरा वाजले होते. पुढे हिराबाईंचे गाणे व्हायचे होते.

लोक अस्वस्थ झाले. सैगल आयोजकांपैकी एक होते. ते चिडले. रविशंकरही संतापले. भैरवी संपवून रोशनबाई उठल्या. झालेल्या प्रकाराने लोक टाळ्या द्यायलाच विसरले. नाही म्हणायला उपचार म्हणून दोन चार टाळ्या पडल्या. हिराबाईंनी मात्र रोशनआराबाईंजवळ जाऊन त्यांची प्रशंसा केली.

हिराबाईंच्या प्रशंसेला रोशनबाईंच्या आईने कुर्रेबाज उत्तर दिले. त्या म्हणाल्या, "रोशनका इतना तय्यार गाना सुननेके बाद तुम्हें गाना है. जरा सम्हलके गाना."

अनुक्रमणिका

हिराबाई शांतपणे पण ठामपणे म्हणाल्या, “मी प्रयत्न करते. तेवढेच माझ्या हातात आहे. चांगले होणे न होणे परमेश्वराच्या आधीन.” त्या ठिकाणी सवाई गंधर्वाचे शिष्य फणसळकर उपस्थित होते. ते म्हणतात, “त्या संगीत सभेत रोशनबाईंच्या भैरवीमुळे नाराज वातावरण निर्माण झाले. झाले ते चांगले नाही असे प्रत्येकाला वाटत होते. हिराबाई आता काय करतात ह्याकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. लोक चुळबूळ न करता बसले होते.”

हिराबाईंनी तंबोरा हाती घेतला. साथीदार तयार झाले. बाईंची बोटे तारा झंकारू लागली त्यांनी मारु बिहाग सुरू केला— ‘रसिया हो ना जाय’ रागाच्या मांडणीत भारदस्तपणा होता. बाई मधुन मधून शुद्ध मध्यम फार लोचदार लावत होत्या. तंत अंगाने चाललेली ही बढत इतकी मनोहारी होती की श्रोत्यांच्या दुखावलेल्या मनावर तिने हळुवार फुंकर घातली. लोकांच्या मनातील तणाव घालवण्यासाठीच जणू त्यांनी तो राग निवडला होता. त्यानंतर ‘होरी खेलो मोसे नंदलाल’ ही होरी त्यांनी म्हटली. गाणे रंगले. कानाकोपऱ्यांतून वाहवा मिळू लागली रोशनआरा गाऊन गेल्या हेच लोक विसरले. गाणे रंगत वाढवीत होते; तेवढ्यात आयोजकांतर्फे सैगल रंगमंचावर आले, आणि म्हणाले, “अशी गानसमाधी कोणाची तोडायला नको हे खरे. पण एक गोड काम करायला मी येथे उभा आहे.” हिराबाईंना रसिक श्रोत्यांकडून बारा सुवर्णपदके त्यांनी जाहीर केली. देणाऱ्याचे नांव उच्चारून होताच टाळ्यांचा कडकडाट होत होता. हिराबाईंच्या मातोश्रींना धन्यता वाटली.

शेवटी ‘राधेकृष्ण बोल’चे स्वर्गीय स्वर आसमंतात दरवळले. सभा जिंकली गेली. सभा संपल्यावर लोक रेंगाळत परतू लागले. झालेल्या अविस्मरणीय बैठकीसंबंधी आपापसांत चर्चा करत.

ही गोष्ट आहे जालंदरची. हरिवल्लभ नावाचे फार मोठे संत त्या बाजुला होऊन गेले. त्यांच्या स्मरणार्थ भास्करबुवा बखले ‘हरिवल्लभ-मेळा’ नावाची संगीत सभा भरवीत असत. बहुतेक दर वर्षी मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर या सभेत गायला जात असत.

१९४० पर्येत या सभेत कोणीही स्त्री—कलाकाराने सेवा रुजू केली नव्हती. कारण तिकडे त्या काळी पडदा पद्धत होती.

१९४० मध्ये हिराबाईंचा जालंदर आकाशवाणीवर कार्यक्रम होता. त्या वेळी अश्विनीकुमार नावाचे एक पोलीस अधिकारी जालंदरला होते. एक दिवस ते हिराबाईंना म्हणाले, “बाई, जालंदरात दर वर्षी डिसेंबर महिन्यात आम्ही एक संगीत-मेळा घेतो. परंतु अजूनपर्येत कोणी स्त्री कलाकार येथे गायिली नाही. आपण हे धाडस कराल का?”हिराबाई म्हणाल्या, “आनंदानं गाईन. परंतु माझ्या संरक्षणाची जबाबदारी मात्र आपण घेतली पाहिजे.”

अश्विनीकुमार तयार झाले. अश्विनीकुमारांच्या बरोबर दिलीपचंद्र बेदी व संगीत दिग्दर्शक बाली हे भास्करबुवांचे शिष्य होते. त्यांनीही बाईंना आग्रह केला. पुढल्या वर्षी हिराबाईंनी या संगीत सभेसाठी यावे हे ठरले व तसे जाहीर करण्यात आले.

अनुक्रमणिका

या हरिवल्लभ मेळ्याची आणखी एक प्रथा म्हणजे एका गाणाऱ्या बरोबर दोन दोन तीन तीन तबलजी, पेटीवाले व सारंगीवाले साथीला बसत असत. दोन दोन मिनिटे प्रत्येक जण आपले कौशल्य दाखवीत असे. त्यामुळे गाणे विस्कळीत होत असे.

हिराबाई मेळ्यात गाण्यासाठी जालंदरला पोहोचल्या. त्या वेळी कडक थंडी पडली होती. त्यातच झिमझिम पाऊस पडत होता. तरीही सभेला तोबा गर्दी उसळली होती. पावसात छत्री धरून उघड्यावर लोक बसले होते. फक्त कलाकारांसाठी रंगमंचावर छत घातलेले होते.

बाई रंगमंचावर आल्या. त्यांच्या बरोबर एकच सारंगिया, एकच तबलजी व एकच पेटीवाला पाहून लोक हिरमुसले. त्यांना वाटले, “या काय गाणार? ये कोई तगडा गाना नही है.”

हिराबाईंनी गाण्याला सुरुवात केली. पूर्वाकल्याणची अस्ताई भरली— ‘होवन लागी सांज.’ आणि सभेवर जाणकार श्रोत्यांची भरघोस दाद मिळाली. हिराबाई स्वरांच्या किमयागार आहेत. प्रत्येक स्वर आपापल्या जागी चपखलपणे लागत होता. पूर्वाकल्याणसारख्या आलापीप्रधान रागात हिराबाईंचे स्वरविस्ताराचे कौशल्य पाहून श्रोते दिपले. त्या कधी पंचमाला डावलून पूरियाचा आभास निर्माण करत तर कधी त्याला पुढे करून कल्याण बेमालूमपणे मिसळत.

बाईंनी सभा जिंकली. एकच तबलजी, पेटीवाला व सारंगीया घेऊनही सभा जिंकली. जे बाई गात तेच सारंगिया सारंगीवर व पेटीवाला पेटीवर काढत असल्याने गाणे एकजिनसी झाले.

त्यानंतर या मेळाव्याला जाण्याचा योग बाईंना अनेक वेळा आला.

श्री. बी. आर. देवधरांनी १९४० साली मुंबईला एक संगीतसभा आयोजित केली होती. लॅमिंग्टन रोडवर काँग्रेस हाऊसमध्ये ही संगीत सभा झाली. सुरुवातीला काही गाणी झाली. मग कुमार गंधर्वाचे गाणे झाले. ते त्या वेळी लहान होते. नंतर हिराबाईंचे गाणे व्हायचे होते. अल्लादियाखाँसाहेबांना हिराबाईंचे गाणे ऐकायचे होते. म्हणून ते अगोदरच येऊन बसले होते.

हिराबाईंच्या गाण्याला सुरुवात होणार इतक्यात नथ्थ्यनखाँ आत आले आणि त्यांनी हिराबाईंना हळूच सांगितले की अल्लादियाखाँसाहेब तुमचे गाणे ऐकायला आले आहेत. हे ऐकून हिराबाई किंचित घाबरल्या. त्यांनी देवधरांना बोलावून विचारले. “खरंच खाँसाहेब आले आहेत का?”देवधर म्हणाले, “नाही आले” पण बाईंनी नथ्थयखाँचे नांव सांगताच ते म्हणाले, “खाँसाहेब आलेले आहेत. पण त्यांची मला अशी सक्त ताकीद होती की हिराबाईंना मी आल्याचे सांगू नका. त्यांना मोकळेपणाने गाऊ द्या.”

हिराबाईंना श्रोत्यांमधे खाँसाहेब कोठे दिसेनात. त्यांनी विचारले, “खाँसाहेब आहेत कुठे? त्यांच्याकडे मला घेऊन चला.”

खाँसाहेब विंगेत एका कोपऱ्यात गुपचूप बसले होते. आपले दडपण गाणाऱ्यावर येऊ नये ही त्या मागची भूमिका होती. हिराबाईंनी चरणस्पर्श करून त्यांची इजाजत मागितली. खाँसाहेब म्हणाले, “बेटा,

अनुक्रमणिका

तुझं गाणं ऐकायला तर मी आलो आहे.” हिराबाई धैर्य करून म्हणाल्या, “तर मग आपण समोर येऊन बसावं ना.” खाँसाहेब मग तेथून उठले आणि समोर येऊन बसले.

हिराबाईंनी मारवा सुरू केला. बाईंचा मारवा वेगळाच आहे. तो ऐकल्यावर वाटायला लागते की मारव्यावर लोक जो औदासीन्याचा आरोप करतात तो चूक आहे. कै. वसंतराव देशपांडे म्हणत की हिराबाईंचा मारवा ऐकला म्हणजे औदासीन्य विरून जाते.

हिराबाईंनी झुमऱ्यातली ‘अरे जग बावरे’ ही बंदीश सुरू केली. अस्ताई संपवून त्या समेवर आल्या. त्यावर खाँसाहेब उद्‌गारले, “इसको कहते है कायदा. वहीदखाँसाहेबने तुमको बहुतही अच्छा बताया है. जिओ, बेटा जिओ, खूब गावो.” मग बाईही मोकळेपणी गाऊ लागल्या.गाणे छान रंगले. गाणे संपल्यावर अल्लादियाखाँ आत आले नि म्हणाले, “तुझं गाणं ऐकायला लोक गर्दी कां करतात हे पहायलाच आज मी आलो होतो. मी आज बेहद्द खूष झालो आहे. तुझ्याजवळ ऐकण्यासारखं खूप आहे.” मग पुन्हा प्रसन्नतेने म्हणाले, “बेटा, गाती रहो!”

## रसके भरे

१९४० साली आकाशवाणीच्या कार्यक्रमासाठी हिराबाई लखनौला गेल्या होत्या. त्या वेळी त्या व्ही. जी. जोगांकडे उतरल्या होत्या. लखनौच्या एका सुप्रसिद्ध डॉक्टरांच्याकडे छोटासा जलसा करायचे ठरले. शहरांतले गाणारे, साथ करणारे आणि निवडक रसिक त्या घरगुती सभेला जमा झाले होते. त्यात गिरिजादेवी गाणार होत्या. त्यापूर्वी जोगांच्या व्हायोलिनचा कार्यक्रम व्हावयाचा होता. बैठक ऐकायला जोगांबरोबर हिराबाई गेल्या होत्या. कथ्थक नर्तक शंभू महाराजही आले होते.

शंभू महाराज आले खरे, पण ते तारेत होते. शांभवीचे सेवन केल्याशिवाय ते हलत नसत की काय कोण जाणे. त्यांची देहानंदी टाळी लागली होती. कोण आले नि कोण गेले, याचे त्यांना फारसे भान नव्हते. थोडासा प्रयत्न करून ते येणाऱ्या प्रत्येकाला अभिवादन करून मोकळे होत होते.

जोगांची धनुकली व्हायोलिनच्या तारांवरून अशी काही मुलायम फिरली की श्रोते त्या ध्वनिलहरींवर तरंगू लागले. जोगांचा कार्यक्रम हमखास रंगायचा, तसा तो रंगला. नंतर गिरिजादेवी गायला बसल्या. क्षणात त्यांनी रंग जमवला. जणू गानचंद्रिकाच समोर बसलेली होती. स्मितवदनाने अतिशय हळूवारपणे त्या गाण्यांतून सुचवीत होत्या- ‘पहा तर या स्वरांकडे. हा स्वरांचा नजराणा केवळ तुमच्यासाठी आणला आहे.’ प्रत्येक श्रोत्याला वाटावे की आजचे गाणे हे केवळ आपल्यासाठीच आहे. त्या दिवशीची मैफिल अशी रंगत होती.

बऱ्याच वेळानंतर शंभू महाराजही दिलखुलास दाद देऊ लागले. शांभवीचा अंमल उतरला असावा. गिरिजादेवींचे गाणे संपले. इतक्यात एक सूचना पुढे आली. शंभू महाराजांनी नाचावे म्हणून मंडळी त्यांना आग्रह करू लागली. गिरिजादेवी म्हणाल्या, “बैठकीचा पूर्वरंग तर आम्ही भरला आहे. तुम्हाला पसंद आहे ना? मग आता उत्तररंग तुम्ही पूर्ण करा.”

अनुक्रमणिका

शंभू महाराज तसे चाणाक्ष. म्हणाले, “पूर्वरंगात दोन कलाकार होते. मग उत्तररंगात कां नसावेत? आपणासारख्या जाणकार प्रेक्षकांसमोर नाचण्यात तर मला आनंदच वाटेल, पण हिराबाईंनी सुद्धा गायलं पाहिजे.”

हिराबाईंची गाण्याची तयारी नव्हती. त्या फक्त ऐकायला आल्या होत्या. प्रवासाचा शीण अजून उतरला नव्हता. पण शंभू महाराज हट्टाला पेटले. म्हणाले, “हिराबाई गाणार असतील तरच मी नाचेन.” त्यावर हिराबाई म्हणाल्या, “मग नकोच.” शंभू महाराज गंभीर झाले व म्हणाले, “तुम्हाला माझं नृत्य बघण्याची इच्छा नाही का?” त्यावर जोग हिराबाईंना म्हणाले, “चंपूताई, म्हणा ना.” गिरिजादेवींचाही आग्रह पडला.

एखादा छोटा ख्याल म्हणावा असे हिराबाईंनी ठरविले. पण मुळातला त्यांचा मिस्किलपणा डोकावला. त्या म्हणाल्या, “मी तुम्हा सर्वांच्या इच्छेचा मान राखेन. पण माझी इच्छा आहे की मी जे गाईन त्यावर शंभू महाराजांनी नाचावं.” गिरिजादेवींनी हिराबाईंच्या म्हणण्याला दुजोरा दिला. जोगांनीही शंभू महाराजांना विनंती केली.

शंभू महाराज तयार झाले. हिराबाईंना शंभू महाराजांची झेप माहीत होती. अभिनयविलास आणि स्वर-विलास यांची खेळीमेळीची जुगलबंदी करण्यास दोन तोलामोलाचे कलाकार सिद्ध झाले. हिराबाईंनी तंबोरा सुरात मिळवला. सारंगियाने व तबलजीने आपापली वाद्ये मिळविली.

शंभू महाराज नाचायला उभे राहिले. त्यात कुठलाही अभिनिवेश नव्हता. विचारात हरवलेल्या माणसासारखे ते गंभीर व अंतर्मुख दिसत होते.

हिराबाईंनी आकार लावला. त्या आकारातच त्यांच्या संगीतातील तयारीची ग्वाही होती. मग सुरू झाली भैरवीतील रसीली ठुमरी— ‘रसके भरे तोरे नैन.’ शंभू महाराज खुलले. हिराबाईंची निवड नाचायला योग्य होती. तिच्यात मुद्राभिनयाला भरपूर वाव होता. किंचित् कमरेत झुकून हात कपाळाशी नेऊन शंभू महाराजांनी जणू हिराबाईंच्या निवडीलाच मुजरा केला. या ठुमरीतून त्यांना त्यांच्या कलेचा फुलोरा मर्मज्ञ प्रेक्षकांपुढे साकार करता येणार होता. त्यांच्या अभिनयाला अवसर देत हिराबाई सावकाश गात होत्या— ‘रसके भरे तोरे नैन’. त्यातील अर्थाला, साजेशा विविध स्वररचनांनी नटवून, त्या पेश करीत होत्या. शंभू महाराज आपल्या अभिनयाने त्यातील भाव नाना तऱ्हांनी व्यक्त करत होते. गोंजारून गोंजारून लडिबाळपणे एक एक स्वराकृती तयार होत होती. शंभू महाराजांच्या पदलालित्याने नि मुद्रा भिनयाने प्रत्येक शब्दाला रूप प्राप्त होत होते. येथे भाव ऐकता येत होता व पाहताही येत होता.

एक अविस्मरणीय अनुभूती प्रसादासारखी वाटली गेली. कार्यक्रम संपला तेव्हा सकाळचे सात वाजले होते.

हिराबाई लखनौला आकाशवाणीच्या एका कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. तेव्हा बेगम अख्तर फैजाबादी यांनी त्यांना आपल्या घरी उतरवून घेतले होते. त्या वेळी हिराबाईंचे गुरू वहीदखाँ तेथेच होते. ते अख्तरींबाईंना शिकवीत होते.

अनुक्रमणिका

एका लग्न समारंभात बेगम अख्तरना बोलावणे होते. त्या आपल्याबरोबर हिराबाईंनाही घेऊन गेल्या. संध्याकाळी तेथे मैफील होती. एकीकडे खाणे व एकीकडे गाणे. त्यात प्रथम बेगम अख्तर उत्कृष्ट गायल्या. मैफल रंगात आली. तेव्हा सुप्रसिद्ध नर्तक शंभू महाराज लोकांना बाजूला सारीत सारीत येऊन बसले. भरपूर मद्यपानामुळे त्यांचा तोल जात होता. त्यांच्या जवळ एक छोटीशी बॅग होती. तिच्यात घुंगरू होते. रसिक श्रोतृवर्ग असल्याने त्यांनाही आपली कला पेश करण्याची इच्छा झाली. त्यांनी तसे जाहीर करायलाही सांगितले.

त्या वेळी तिथे त्यांच्या वडिलांच्या वेळचे तबलजी फैय्याज खाँ उपस्थित होते. शंभू महाराजांनी त्यांना आपल्याबरोबर साथ संगत करण्याची विनंती केली. पण ते म्हणाले, “अब तू क्या नाचेगा इतनी पीने के बाद?” शंभू महाराज घुंगरू बांधून उठले. आणि एक मुश्किल तोडा घेऊन सभेवर जे आले ते चित्राप्रमाणे स्थिर उभे राहिले. तेव्हा फैय्याजखांच्या डोळ्यात पाणी तरारले. ते उठले आणि शंभू महाराजांना कडकडून मिठी मारत म्हणाले, “बेटा, तूने पी है, लेकिन तेरी विद्या होशमे है, पाक है.”

अप्रतिम नृत्य झाले. त्या दिवशी लोकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. नृत्य संपले तेव्हा शंभू महाराजांची नजर हिराबाईंकडे वळली. ते त्यांच्यापाशी आले व त्यांना गाण्याकरिता विनंती करू लागले. बाई म्हणाल्या, “माझ्या गुरुजींची मला परवानगी नाही.” पण ते ऐकेनात. त्यांनी हिराबाईंना हाताला धरूनच स्टेजवर नेऊन बसविले. बेगम अख्तर म्हणाल्या, “अब ये छोडनेवाले नही है. शुरू हो जाव.”

सकाळचे सहा वाजले होते. बाईंनी देशकार गायला सुरुवात केली. आधीच्या गाण्यावर मात करायला त्या गात नव्हत्या. अतिशय सहजपणे गाणे चालले होते. आवाज सुरेख लागला होता. त्यांच्या गाण्यातल्या भाव-कोमल स्वरांची आणि कल्पनांची लोभस मांडणी इतकी मुलायम होती की आधीच्या अख्तरीबाईंच्या नजाकती गझला लोक विसरून गेले. नृत्यातला तत्कार आणि मुद्राभिनयही विसरले. नंतर बाईंनी ‘अकेली मत जैयो राधे जमुनाके तीर’ ही भैरवी म्हटली. पहिला सारा रंग पुसून गेला. सर्वत्र वाहवा झाली.

आता घरी जायची पंचाईत. खाँसाहेब रागावणार ही भीती. अख्तरीबाईंना हिराबाई म्हणाल्या, “आता खाँसाहेबांना तुम्हीच सामोऱ्या जा.”

इकडे चार पाच जाणकार अगोदरच वहीदखाँकडे आले आणि म्हणू लागले, “आज अस्सल गाणं ऐकलं. काय अप्रतिम गायल्या त्या. बस पूछोही मत. कोई अल्फाजही नही.” न राहवून खाँसाहेबांनी विचारले, “कोण गायलं?”मंडळींनी सांगितले, “तुमची शिष्या.” तोपर्यंत या दोघी घरी आल्या होत्या. अख्तरीबाई खाँसाहेबांना म्हणाल्या, “हमारी गलती हुई है.” त्यांनी आपले कान पकडून म्हटले, “आपण हिराबाईंना माफ करावे. कराल ना?”खाँसाहेब काहीही बोलले नाही. फक्त स्मित केले. आणि डोळे मिटून डोलू लागले.

### दरबारी किस्से

१९४० साली व्ही. जी. जोग लखनौला होते. त्यांच्या बैठकींत गाणे चालले होते. हिराबाई गात होत्या. सगळे जण तल्लीन झाले होते. बाईंच्या उजव्या बाजूला शमसुद्दीनखाँ तबल्यावर तर डावीकडे

बाबूराव कुमठेकर सारंगीवर हवे ते बोल लीलया काढत होते. समोर सुरेशबाबू होते. तेवढ्यात एक ऐन पंचविशीतला राजस पुरुष बैठकीत येऊन बसला.

गवताच्या पात्यावर उषःकाली दवबिंदू दिसतो. पण तो येताना त्याची चाहूल लागलेली नसते. तसे या तरुणाचे झाले. गाणे थांबले तेव्हाच तो आल्याचे इतरांच्या लक्षात आले. हिराबाईंनी तंबोरा बाजूला सरकविला. हातातल्या रुमालाने कपाळावर जमू पाहणारे धर्मबिंदू टिपले. तसा तो रुबाबदार तरुण बसल्या बसल्या हिराबाईंकडे सरकला. त्याने आपली ओळख करून दिली, “मी जहांगिराबादचा...”

त्याचे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच जोगांनी त्याला थांबविले व बोलायला सुरुवात केली. ते म्हणाले, “हे जहांगिराबादचे नबाब. खास तुम्हालाच भेटायला आले आहेत.” नबाबसाहेब म्हणाले, “आपण आमच्या जहांगिराबादला या. दावत घेऊन मी आलो आहे. तुमचे उद्याचे काम आटोपून आपण निवांतपणे निघू. मी थांबतो. आपण बरोबरच जाऊ.”

नबाबसाहेबांची लखनौंत हवेली होती. तिसऱ्या दिवशी सकाळी ही मंडळी निघाली. दुपारी जहांगिराबाद आले. तेथे जेवणे झाली. नबाबसाहेब जातीने लक्ष घालीत होते. ते म्हणाले, “आता तुम्ही विश्रांती घ्या; थकला असाल. रात्री आपण गाण्याला बसू. मग मात्र रात्र आणि दिवस यांचा हिशोब मांडू नका.”

विश्रांतीची व्यवस्था चोख होती. विश्रांतीनंतर हिराबाई किती वाजले म्हणून अंदाज घेऊ लागल्या तर भिंतीवरचे घड्याळ तीन वाजताच बंद झालेले दिसले. हिराबाईंजवळही घड्याळ नव्हते सुरेशबाबूंजवळ होते. पण ते आणि जोग विश्रांतिकक्षांत नव्हते. त्यांना पहायला हिराबाई बाहेर आल्या तर ते दालन मंद निळ्या उजेडाने प्रसन्न दिसत होते. त्याच्या बाजूचे दालन लाल दिव्यांच्या उजेडात न्हाऊन निघाले होते. पडदे लाल होते. आणि त्या रंगाला शोभणारी सजावट तेथे होती. मोठ मोठ्या तैलचित्रांच्या सोनेरी चौकटी अधिक खुलल्या होत्या. दरबारी कानडा येथे कोणी तरी गायला हवा, असा विचार बाईंच्या मनात येत नाही, तोच पलिकडचा दरवाजा उघडला. तेथून सुरेशबाबू नि व्ही. जी. जोग येत होते. पण ते दालन हिरव्या रंगाने सजलेले दिसले. हिराबाई तिकडे गेल्या. मोरपंखी गालीच्यावर चालताना किंवा हिरव्या मखमली कोचावर बसताना एका वेगळ्याच दुनियेचा स्पर्श होत होता. हिरव्या रंगाच्या किती वेगवेगळ्या छटा तेथे होत्या. पण हे सारे कशासाठी? हे संस्थानिकांचे वेड म्हणावे का? असा संभ्रम त्यांना पडला.

विचार करता करता लक्षात आले की हे संस्थानिकाचे वेड नव्हे. हा तऱ्हेवाईकपणा नव्हे. सूर्यामुळे होणाऱ्या दिवस आणि रात्र या काल-संवेदना घालवण्याचे ते एक तंत्र होते. बाह्य कालाच्या पलिकडे जगण्याचे ते साधन होते. त्या दालनात आलेल्या माणसाला दिवसरात्रीचे भान राहाणार नव्हते. थकलात की विश्रांती घ्या, झोपा. अधूनमधून खाद्यपदार्थांचा आस्वाद घ्या. पुन्हा ताजेतवाने झाल्यावर गायला बसा. रंगीत दालनांनी हे साधले.

सुरुवातीला हिराबाईंना गाण्याची विनंती झाली. त्या पटदीप गायल्या. वातावरण प्रसन्न करणारे होते. श्रोतेही दर्जेदार गायकच. बाईंच्या नंतर सुरेशबाबू गायले. त्यानंतर जेवणे झाली. विनायकबुवा पटवर्धन जेवले नाहीत; कारण लगेच ते गाणार होते. त्यांनीही बैठक रंगवली. प्रत्येक जण सभा गाजवत होता. मग सारंगी झाली. गाण्याची आवर्तने एकामागून एक अव्याहत चालली होती.

अनुक्रमणिका

सूर्याचे उगवणे किंवा मावळणे समजत नव्हते. दिव्यांच्या रंगीत किमयेने तो परिणाम साधला होता. दालनातले घड्याळ बंद होते. म्हणजे मुद्दामच घड्याळे बंद करविली होती.

नंतर बडाखाना झाला. पुन्हा मैफल रंगली. यानंतर सर्व कलाकारांना जहांगिराबादचे दर्शन घडविले गेले. सांगाती नबाबसाहेब होतेच. त्यांनी स्वतः सगळ्यांना लखनौला आणून पोहोचविले. बिदागी दिली. धन्यवाद दिले.

लखनौला ही मंडळी परतली तो चवथा दिवस होता. एखाद्या स्वप्नासारखे ते तीन दिवस न कळत गेले होते.

ही घटना १९४०-४१ सालातली असावी. त्या वेळी किशन महाराज नावाचे निजामचे प्रधान होते. निजामाची हिंदू पत्नीपासून झालेली मुलगी किशन महाराजांच्या मुलाला द्यायचे ठरले. लग्न सोहाळा धूमधडाक्याने झाला. चालीरीती प्रमाणे कार्यक्रमांची रेलचेल होती. खाणे पिणे, नृत्य आणि गायन यांची गर्दी उसळली. तेव्हा हिराबाईंचाही मुक्काम हैदराबादला होता.

किशन महाराजांकडून हिराबाईंना निमंत्रण आले. बाईंनी निमंत्रण स्वीकारले तेव्हा किशन महाराजांना आनंद झाला. त्यांना वाटले की हे आगळे वेगळे खानदानी गाणे निजाम सरकारला मेजवानी ठरणार. किशन महाराजांकडे ज्या दिवशी पानसुपारी होती त्याच दिवशी हिराबाईंनी गायचे होते. या कार्यक्रमाला बरेच कलावंत बोलावले होते. निजाम सरकारांची स्वारी आली. त्यांनी पृच्छा केली की नवीन पण चांगले गाणारे कोण आहेत? किशन महाराजांनी हिराबाईंचे नाव सांगितले. निजाम म्हणाले, "ठीक आहे. पेश करो." किशन महाराजांनी हिराबाईंना गाण्याची सूचना दिली. तबल्यावर शमसुद्दीन, सारंगीवर बाबूराव कुमठेकर आणि हार्मोनियमवर राजाभाऊ कोसके तयार होते. हिराबाई आल्या, नेहमीच्या शालीनतेने बसल्या, आणि त्यांनी तंबोरा उचलला.

हे पाहून निजामाच्या कपाळाला आठ्या पडल्या. त्यांनी किशन महाराजांकडे पाहून विचारले, "ये कैसा गाना है?"तेव्हा किशन महाराज म्हणाले की त्या बसून आणि तंबोरा घेऊन गातील. ह्या प्रकाराने हिराबाईंच्या मनात पाल चुकचुकली पण त्या गायला लागल्या. गाणे जेमतेम सुरू झाले तोच निजाम म्हणाले, "ये क्या बदतमीजी है? ऐसा गाना सुननेकी हमे आदत नही. बंद करो ये गाना."

त्यांच्या या गडगडाटाबरोबर गाणे थांबले. निजाम म्हणते होते की बायकांनी गायचे ते उभे राहून, हावभावांनी नटलेले. "गाना उसीको कहा जाता है. ऐसा ठीक ढंगसे गाना है तो शुरू रख्खो, नही तो बंद करो."

गाणे थांबले होतेच. हिराबाई शांतपणे उठल्या आणि आपल्या जागेवर जाऊन बसल्या. हिराबाई वरून शांत भासल्या तरी आत ज्वालामुखीचा भडका थोपवीत होत्या.

त्यानंतर पंधरा वीस गायिकांच्या गझला पेश केल्या गेल्या. गायिका उभ्याने गायल्या. त्यांचे साजिंदेही उभे होते. हावभावासहित गाणे चालले होते.

अनुक्रमणिका

काही वेळाने गाणे संपले. मैफलीनंतर बिदागी आली. शाही थाट होता. चांदीच्या तबकांत त्या काळातले एक हजार रुपये होते. वरून सुरेख रुमाल झाकलेला होता

इतर गायिकांच्या बरोबर हिराबाईंच्या समोरही विदागी आली. हिराबाई म्हणाल्या, "मी गायले नाही म्हणून मला बिदागी स्वीकारता येणार नाही. मी गाण्याकरता येऊन गाणे न होताच बिदागी स्वीकारणे हा माझा सन्मान तर नव्हेच नव्हे, पण माझ्या विद्येचा हा अवमान आहे. याहीपलिकडे म्हणायचे झाले तर ते एक पाप आहे. आणि हे पाप मी करणार नाही."

तरीही कारभारी मंडळी आपला हेका सोडीनात. असा प्रसंग त्यांनी पूर्वी अनुभवला नव्हता. ती मंडळी पैशाचे महत्त्व पटवू लागली. किशन महाराजांची बिदागी नाकारणे कोणत्या भावात पडेल हे वेगळ्या पद्धतीने सुचवू लागली. समेट करावा असे प्रत्यक्ष तबलानवाज शमसुद्दीनखाँ सुद्धा म्हणू लागले. पण बाईंचा करारी स्वभाव उफाळला. त्या म्हणाल्या, "जिस कलापर मै जिस्मसेभी ज्यादा प्यार करती हूँ उसकी बेइज्जती मैं नही सहूँगी, नही सहूँगी." तार सप्तकांत पोहोचलेल्या आवाजाची धार सगळ्या उपस्थितांना जाणवली. मंडळी अवाक झाली. काय होते आहे हे कळण्याच्या आत एक आवाज सर्वांनी ऐकला. हिराबाईंसमोर धरलेले बिदागीचे ताट भर दरबारांत त्यांनी उधळून दिले होते.

सर्व सभा तटस्थ झाली. बाईंचे साथीदार घाबरले. शमसुद्दीनखाँ म्हणाले, "अब क्या होगा?" कुमठेकर म्हणाले, "संस्थानांमध्ये काय वाटेल ते होऊ शकते." हिराबाई उसळून म्हणाल्या, "फासावर तर देणार नाहीत ना? मग झालं तर. असं मृतवत जगून तरी काय उपयोग?"

हिराबाई उठल्या. साथीदारही उठले आणि बाईंच्या मागोमाग निघाले. भवितव्य काळोखाचे होते त्या काळात संस्थानांत काहीही घडू शकले असते. अशा अनेक गोष्टी ऐकूही येत. इतर लोकही आता हिराबाईंच्या संबंधात काय घडते हे समजून घ्यायला उत्सुक होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी किशन महाराजांनी बिदागी पाठवली. आणि सोबत निरोपही पाठविला की, "काल आपला अपमान झाला याचे मला दुःख आहे. निजामसाहेबांना पक्क्या गाण्याची सवय नाही, म्हणून तसे घडले. मी पाठवीत असलेली रक्कम आपल्या गानविद्येच्या चरणावर ठेवलेला नजराणा आहे. परत पाठवू नये."

संस्थानिकांच्या लहरीच्या अनेक कथा प्रचलित आहेत. त्या भल्याबुऱ्या दोन्ही प्रकारच्या असतात. बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांबद्दल मात्र सर्वत्र एकमुखी गुणगानच ऐकू येई. प्रजेबद्दल प्रेम असणाऱ्या थोड्या संस्थानिकांपैकी ते एक होते. पण तिथेही हिराबाईंची एकदा फजिती झाली.

१९३६ साली सयाजीराव महाराजांच्या राज्यारोहणाचा हीरक महोत्सव होता. त्यानिमित्त सर्व जनतेला फुकट गाणे—वाजवणे व नृत्य बघता यावे म्हणून बडोद्याच्या कमेटी बागेमध्ये तीन मोठे तंबू ठोकले होते. एकात गाणे, एकात वाजवणे व एकात नृत्य. लोकांनी यावे, हवे तितका वेळ थांबावे, मन भरले की जावे. असे तीन दिवस चालू होते.

ऐन वाढदिवसाच्या कार्यक्रमात राणीसाहेबांच्या दरबारात हिराबाईंचे गाणे व महाराजांच्या दरबारांत फैयाजखाँचे गाणे होते.

हिराबाई राणीसाहेबांच्या दरबारांत हजर झाल्या. अजून राणीसाहेब स्थानापन्न झाल्या नव्हत्या. इतक्यात एक संस्थानी कर्मचारी एक चौकोनी मच्छरदाणी घेऊन तेथे आले. हिराबाईंना आश्चर्य वाटले. त्या म्हणाल्या, “ही कशासाठी?” त्यांना सांगितले गेले की “हा बायकांचा दरबार आहे. आपण पुरुष साथीदार बरोबर घेऊन आलात, तेव्हा त्यांनी या मच्छरदाणीच्या आत बसून आपल्याला साथ करावी.”

बाबूराव व शमसुद्दीन मच्छरदाणीत गेले. त्यानंतर पुकारा होऊन राजस्त्रिया आल्या. सर्वत्र स्थिरस्थावर होईतो पंधरा मिनिटे लागली.

मे महिन्याचे दिवस. हवेत फार उकाडा होता. त्यात त्या साथीदारांना बिचाऱ्यांना मच्छरदाणीत कोंडलेले. ते आतून उसासे टाकताहेत. बाबूराव म्हणतात, “चंपूताई, आत बटाटे उकडताहेत हो.” शमसुद्दीन म्हणतात, “बाईजी, जल्दी करो. दम घुट रहा है.”

राणीसाहेबांनी अनुज्ञा दिली व गाणे सुरू झाले. जेमतेम पंधरा मिनिटे गाणे झाले. हिराबाईंना वाटले, “झालं वाटतं. सुटले माझे साथीदार.” पण नाही. त्यांचा गोषा हटला नाही. दरबारचे रीतीरिवाज आड आले. प्रथम राणीसाहेब गेल्या. मग एक एक करून सर्व राजस्त्रिया गेल्या. मग साथीदारांना बाहेर यायची इजाजत मिळाली. त्यांची तोंडे उकाड्याने लालेलाल झालेली. घामाने नुसते निथळत होते.

एकदा बिहारात दरभंग्याला बाईंना राजहट्ट भोवला. दरभंग्याचे राजेसाहेब गाण्याचे शौकीन होते. त्या वर्षी युवराजांचे लग्न होते, म्हणून खास कार्यक्रमासाठी मुंबईहून ओंकारनाथ व हिराबाई या दोघांना आमंत्रण होते.

दोघांचेही गाणे लग्नसमारंभात उत्तम झाले. परंतु एखादीच बैठक ऐकून महाराजांचे समाधान झाले नसावे. त्यांनी हिराबाईंना आणखी राहण्याविषयी आग्रह केला. म्हणाले, “आपका इस तरफ आना बार बार नहीं होता. अभी आयी हो तो तीन चार दिन और रुक जाइये.”

परंतु हिराबाईंचा मुंबई आकाशवाणीवर कार्यक्रम होता. त्यांना परत जाणे आवश्यक होते. त्या म्हणाल्या, “मुझे रेडिओपर गाना है. नही तो मैं रुक जाती. मैं अगर सही वक्तपे ना पहूँची तो जुर्माना होगा.”

हे ऐकून संस्थानिक म्हणाले, “इतनीसी बात है ती रुकही जाइये. आपका जुर्माना हम भर देंगे.”

हिराबाई गंभीर झाल्या. म्हणाल्या, “सवाल पैसोंका नही. जुर्माना भरनेसे मेरा नाम खराब हो जाएगा. दुबारा मुझपर कौन विश्वास करेगा?”

नाही होय करता करता असे ठरले की उद्या सकाळी नऊपर्यंत हिराबाईंनी गावे व जेवण करून अकराच्या गाडीने जावे.

अनुक्रमणिका

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे सकाळी नऊ वाजेपर्यंत हिराबाई गायल्या. जेवण आटोपून दहा वाजता त्या स्टेशनवर आल्या. पाहतात तर स्टेशनवर सामसूम. गाडीची चौकशी केली तेव्हा कळले की ती गाडी सुटून एक तास झाला. स्टेशनवरच्या घड्याळांत पाहिले तर बारा वाजले होते. आत्ता कुठे बाईंना वस्तुस्थितीची जाणीव झाली. राजवाड्यातील घड्याळे त्या रात्रीच दोन तास मागे करण्यात आली होती.

मुंबईला जाणे त्या दिवशी रहित केल्याशिवाय गत्यंतर नव्हते. नंतर मुंबईला पोचल्याबरोबर स्टेशन डायरेक्टर बुखारींची तार मिळाली. तिच्यात ताबडतोब दोनशे रुपये दंड भरण्याबद्दल सूचना होती. बाईंनी दंड भरला. नंतर बाईंनी बुखारींना प्रत्यक्ष भेटून हकीकत सांगितल्यावर दंडाची रक्कम परत मिळाली.

त्या काळातले संस्थानिक सर्वेसर्वा असत. त्यांच्या तऱ्हेवाईकपणापुढे प्रत्यक्ष देवाला सुद्धा हार पत्करावी लागली असती. उपभोग, नशा, शृंगार आणि प्रतिष्ठेच्या अवाजवी कल्पना यांचा खजिना म्हणजे त्या काळचे संस्थानिक. कलांना आश्रय देणारी रसिकताही काही संस्थानिकांजवळ होती संस्थानिक स्वतःच्या अहंकाराला धक्का लागणार नसेल तर इतर गोष्टी मोठ्या मानीत.

१९४१ साली उदयपूरच्या राजपुत्रांचे लग्न होते. सोहळा तीन दिवस चालला होता. समारंभ उदयपूरच्या किल्ल्यावर होता. सारा किल्ला ऐरावतासारखा शृंगारला होता. या ऐरावताची अंबारी म्हणजे राजवाडा. त्याचा झगमगाट विचारायला नको. राजप्रासादाभोवती कारंजी थुई थुई नाचत होती. बगिचे बहरले होते.

दरबार भरण्यापूर्वीचे वातावरण म्हणजे सूर्य उगवण्यापूर्वीचे पूर्व दिशेचे नभोवितान. रंगीबेरंगी. अनेक ताज्या रंगच्छटांनी भरलेले. अनेक संस्थानांचे निमंत्रित राजे नि राजपुत्र आपापल्या इतमामाप्रमाणे येत होते. कोणी रोल्स राईसने आला, कोणी घोड्यावरून आला, तर कोणी पलखीमधून. त्यांच्या निवासाच्या जागेपासून छोटीशी मिरवणूकच दरबारच्या भव्य दालनापर्यंत येत होती. प्रत्येकाचा थाट वेगळा, प्रत्येकाची वाट वेगळी. प्रत्येकाबरोबर दोन दोन ए. डी. सी. होते. शिवाय दिवाण होते.

कार्यक्रमाला सुरुवात झाली. यथाक्रम गाण्याची मैफल झाली. दरबारातलेच गाणे ते. हिराबाई गायिल्या. तासभर त्यांनी राग यमन-कल्याण आळविला. नंतर मीरेचे भजन झाले

हिराबाईंच्या नंतर एका नामवंत गायिकेचे गाणे होते. गाण्यात सहजतेपेक्षा चमत्कृती अधिक असे. काही जागा त्या अशा घेत असत की ऐकणाऱ्याने चकित व्हावे. यात भर म्हणून त्यांना रतीचे लावण्य लाभले होते या बाई गाण्याला बसल्या. तबलजीने दमदार ठेका धरला. सारंगी बिनतक्रार हरकती घेऊ लागली. इतक्यात दरबारांत हालचाल झाली. एक संस्थानिक महाशय उभे राहून काहीतरी बोलले. गाणे थांबले. तो संस्थानिक शारदा नाटकांतला “श्रीमंत” दिसत होता. त्याने हातातल्या अंगठीकडे निर्देश केला आणि म्हणाले, “ही एक लाख मोलाची आहे. ती मी द्यायला तयार आहे. अट एवढीच की माझ्या मांडीवर बसून ‘हमसे ना बोलो राजा’ ही ठुमरी म्हणायची.” असे म्हणत तो विक्षिप्त हावभाव करू लागला. मदिरापानामुळे आपण काय करतो आहोत हे त्याला समजत नव्हते. सगळ्यांचे लक्ष आता त्या गायिकेकडे लागले. तो म्हातारा संस्थानिक मातब्बर असला पाहिजे. कारण तरुण संस्थानिक स्तब्ध होते. कदाचित ती वादळापूर्वीची शांतता असावी. या गायिकेने हिराबाईंना विचारले, “काय करायचं हिराबाई? अंगठी अव्हेरायची की मिळवायची?”

अनुक्रमणिका

हिराबाईंनी चटकन उत्तर दिले, "मला नाही हे पटत." त्या पुढे म्हणाल्या, "अंगठीपेक्षा तुमचे गाणं किती तरी मोलाचं आहे आणि त्याहीपेक्षा तुमचे शील."

हिराबाईंच्या त्या निःसंदिग्ध सल्ल्यामुळे त्या गायिकेला निर्णय घेता आला. त्यांनी नकार दिला.

राजेसाहेबांचा राग अनावर झाला ते गरजले, "एका गाणारीची ही मिजास? मला नाकारते?"

पण गायिका पक्की ठरली. त्या प्रसंगानंतर थोडा वेळ गाऊन ती उठली. राजेसाहेबांना तर त्यांच्या निवासाला केव्हाच नेले होते.

यानंतर हिराबाई आणि त्या बाई पुढच्या कार्यक्रमात तीन दिवस सामीलच झाल्या नाही.

१९४९ सालची गोष्ट. अजून संस्थाने शाबूत होती. तिथला डामडौल, ऐषआराम यांना अजून धक्का लागला नव्हता. इंदूर संस्थानात होळकरांचे पदरी अण्णासाहेब गायकवाड नावाचे एक सरदार होते. ते मोठे मातब्बर आणि होळकर सरकारांच्या विशेष मर्जीतले होते. गाण्याचे शौकीन होते. हिराबाईंचे अभिमानी होते. कलाकारांचे चाहते होते विलायतची सफर करून आलेले होते; त्यामुळे रसिकतेची क्षितिजेही विस्तारलेली होती. गुणज्ञता होती आणि तिला साजेशी खानदानी होती. खानदानीत शब्दांचे सच्चेपणही होते.

हिराबाई त्या बाजूला गेल्या म्हणजे सरदार गायकवाड आत्मीयतेने आपल्याकडे उतरवून घेत. त्यांची खूप सरबराई करीत. हा सन्मान कलेचा आहे वगैरे लांबलचक कल्पना ते बोलून दाखवीत नसत. तसे वागतही नसत. याही वेळेला बाईंचा मुक्काम सरदार गायकवाडांकडे होता.

इंदूरच्या नंदलालपुरा थिएटरात हिराबाईंच्या गाण्याचा जलसा होता. पहिल्या ख्यालाने रंग जमविला. तासादीडतासानंतर नाट्यगीत सुरू झाले. वातावरण भारून टाकण्याची किमया हिराबाईंना साध्य झालेली आहे. हमखासपणा हा त्यांच्या परिश्रमांनी उजळलेला अल्लाउद्दीनचा दिवा आहे. गायकवाड अजून कार्यक्रमात दिसत नव्हते. त्यांची जागा रिकामी होती. गाण्याच्या शौकाबरोबरच त्यांना सोमरसपानाचीही आवड होती. ही माणसे मनस्वी. जे करतील ते अमर्याद. स्वाद घेतील तो आकंठ. म्हणूनच ते अजून आपल्या जागेवर येऊन बसले नव्हते. पिण्याचा कार्यक्रम चालला असावा. पण अण्णासाहेबांना गाण्याला जायची याद होती.

इकडे जलशांत मधली विश्रांती झाली. बाई रंगमंच सोडून आत गेल्या. त्यांचे साथीदारही गेले. काही आमंत्रित त्यांचेबरोबर चहापान करू लागले. तेव्हा अण्णासाहेब नंदलालपुरा थिएटरवर येऊन पोहोचले. ते थेट आत आले. ते एका वेगळ्याच जगात वावरत होते. त्या जगात सर्व आनंदी आनंद असतो. मान, सन्मान, प्रतिष्ठा नि जबाबदाऱ्या ही भौतिक जगातली ओझी त्यांनी फेकून दिली होती. त्या दिवशी मदिरापान जास्तच झाले असावे. ते आले ते थेट बाईंसमोर उभे राहिले. आणि म्हणाले, "आज आम्ही आलो आहोत ते एक आव्हान घेऊन. पहा तुम्हाला या आव्हानाचं शिवधनुष्य पेलतं का."

अनुक्रमणिका

हिराबाई अण्णासाहेबांकडे पाहत होत्या. अण्णासाहेब कसले आव्हान घेऊन आले आहेत याचा अंदाज लागत नव्हता. मग अण्णासाहेब म्हणाले, “हिराबाई, आज भैरवीला पाच वन्समोअर घेऊन दाखवा. आहे हे आव्हान पेलण्याची ताकद?”

हिराबाई हसल्या आणि म्हणाल्या, “त्यात काही अवघड नाही. पण त्याची आवश्यकता ती काय? तो नुसता चमत्कार होईल.”

अण्णासाहेब म्हणाले, “उगाच शब्दच्छल करू नका. आवश्यकताच म्हणता ना, म्हणून सांगतो की जर तुम्ही असे पाच वन्समोअर घेऊन दाखविलेत तरच आम्ही तुम्हाला श्रेष्ठ गायिका मानू.”

आपण काय बोलतो आहोत हे अण्णासाहेबांना समजत होते. हिराबाईंच्या बदलत्या चेहेऱ्याकडे ते पहात होते. पण या अवस्थेत मनुष्य इतरांच्या भावनांचा विचार करायला होशवर थोडाच असतो? अण्णासाहेब पुढे म्हणाले, “चमत्काराशिवाय नमस्कार नसतो. कळली आवश्यकता काय ती?”

हिराबाईंच्या कर्तृत्वाला आव्हान मिळाले. त्या गंभीर झाल्या नाहीत किंवा चिडल्याही नाहीत. फक्त त्या अधिक शांत भासू लागल्या. त्यांच्या बाजूला काही निमंत्रित होते. त्यांना हे बरे वाटले नाही एक म्हणाला, “हे कसले आव्हान? हा तर शुद्ध विचित्रपणा.” दुसरा म्हणाला, “हा मद्यपानाचा कैफ. दुसरं काय? हिराबाईंनी हे आव्हान मनावर घेऊ नये.”

हिराबाईंसारखी लोकोत्तर गायिका आपल्याला जवळून पाहाता यावी म्हणून आणखीही जनसामान्य तेथे जमले होते. त्या हसतात कशा, बोलतात कशा, जवळून दिसतात कशा, हे पहायला मिळेल त्या जागेतून आत डोकावण्याचा ते प्रयत्न करत होते. त्या संभाषणानंतर कोणीही काही बोलले नाही. सगळे सुन्न झाले होते. आव्हान दिले गेले होते. पण ते स्वीकारले किंवा नाही हे स्पष्ट झाले नव्हते. पुढे काय होते हे ऐकायला सगळी सभा उत्सुक झाली होती.

आणि हळूच हिराबाईंचे ओठ विलग झाले. त्या म्हणाल्या, “मला नमस्काराची अभिलाषा नाही. पण आपण म्हणता म्हणून हाही प्रयत्न करून पाहीन.”

अण्णासाहेबांच्या मुद्रेवर खोडसाळ हसू झळकले. विश्रांतीनंतर कार्यक्रम असा बहारीचा झाला की स्वतः अण्णासाहेब डोलू लागले. आव्हानाची गोष्ट ते विसरून गेले. पण शेवटी भैरवी सुरू होताच त्यांना ते आठवले. आता त्यांची नशा बरीच उतरली होती. त्यांना वाटू लागले की, “आपलं चुकलंच. हिराबाईंना आपण उगीच भलत्या भरीस घातलं.” त्यांच्या मनात आले की हळूच हिराबाईंना सांगावे, “तुम्हाला आव्हानातून मोकळे केले आहे. हवं तसं गा.” पण असे मनात आले तरी प्रांजळपणे सांगायला ते सामान्यजन थोडेच होते? सरदारकीची प्रतिष्ठा त्यांना आडवी आली.

‘अकेली मत जैयो राधे जमूनाके तीर’ ही विशेष दीप्तीने तेजाळलेली भैरवी सुरू झाली. लोक तल्लीन झाले. ज्या थोड्या मंडळींनी मध्यांतराला तो प्रसंग ऐकला होता त्यांच्या मनात इतका वेळ हिराबाईंबद्दल काळजी भरली होती. भैरवी सुरू होताच ती मंडळी तनमन हरपून गाणे ऐकू लागली.

अनुक्रमणिका

हिराबाईंचा तार षड्ज लागला मात्र, श्रोतृवर्गाने जोरदार दाद दिली. श्रोतृवृंदाला दिक्कालातीत नेणाऱ्या त्या तार षड्जाने अण्णासाहेबांच्या मनावर मोहिनी घातली. सगळी सभा भैरवीत विरघळली.

...आणि नेमकी त्याच वेळेला अचानक तिहाई आली. भैरवी संपली. लोकांची समाधी भंगली. भैरवी संपली म्हणजे बैठक संपली. पण कोणाचीच उठायची तयारी नव्हती. सर्व श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजराबरोबर वन्समोअरचा घोष चालवला. शांत मंद स्मित हिराबाईंच्या चेहेऱ्यावर उमटले.

पुन्हा भैरवी सुरू झाली. पण तिचा डौल वेगळा. पुन्हा वन्समोअर.

प्रत्येक वेळी भैरवीचे दर्शन इतके मनोरम, इतके परिणामकारक आणि इतके वेगळे होते की श्रोत्यांना पुनःपुन्हा ते ऐकायचा मोह व्हावा. हिराबाईंची प्रज्ञा कशी नवनवोन्मेषशालिनी आहे याचा श्रोत्यांना साक्षात्कार होत होता. जणू ही फक्त भैरवीचीच बैठक होती.

हिराबाईंनी तंबोरा खाली ठेवला. तृप्त मनाने श्रोतृवृंद गानसमाधीतून बाहेर आला. ज्यांनी मध्यांतरातील अण्णासाहेबांचे व हिराबाईंचे बोलणे ऐकले होते ते कुजबुजू लागले, “हिराबाई जिंकल्या.”

जिंकण्याची ईर्षा मनात नसताना हिराबाई जिंकल्या. त्या जिंकल्या नसत्या तर अण्णासाहेब सुद्धा हिरमुसले असते. आपल्या स्वतःच्या पराजयाचे त्यांना दुःख नव्हतेच.

दुसरे दिवशी अण्णासाहेब आणि हिराबाई अण्णासाहेबांच्या दिवाणखान्यात बसले होते. अण्णासाहेब दिलखुषपणे म्हणाले, “हं! काय हिराबाई, काल आपण आम्हाला हरवलंत तर! पण असं हरणं सुद्धा फार मजा देऊन जातं बरं का? आम्ही आपल्याला खरोखरच मोठी गायिका मानलं. पहिल्यापासूनच असलेल्या या आमच्या मतावर काल शिक्कामोर्तब झालं आता बोला, या दिवाणखान्यातली कोणती वस्तू आम्ही आपल्याला तोहफा म्हणून नजर करावी?”

“छे छे! भलतंच काय, अण्णासाहेब! कालची गोष्ट कालच संपली. शिवाय काल आपणही थोडे वेगळ्याच स्थितीत होता. तेव्हा आता त्याची चर्चा कशाला?”नम्रपणे हिराबाई म्हणाल्या.

“अहो, असं कधी झालंय? आमच्या तोंडून गेलेला शब्द म्हणजे शब्द. मग तो नशेतला असो अथवा अन्यथा. बोला, आपल्याला काय हवं आहे? मी काही तुमच्यावर उपकार करीत नाही बरं. तुमचा तो अधिकार आहे. मान आहे. बोला, काय हवं आहे?”

आश्चर्यात बुडालेल्या शिल्पकार फडक्यांची नजर त्यांच्या बहिणीसाठी योग्य तो तोइफा शोधीत भिरभिरत होती. होता होता एका वस्तूवर ती स्थिरावली. काय होते ते? पंचधातूंचा वाघ. होळकर महाराजांना विलायतहून भेट मिळालेला तो वाघ. फडक्यांना वाटले की हिराबाईंच्या स्वरविलासाची इज्जत याच वाघाच्या पुतळ्याने होईल. त्यांनी खाकरून हिराबाईंचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले व त्या वाघाच्या पुतळ्याकडे हळूच अंगुलीनिर्देश केला.

“मी काही तरी मागावे असा आपला जर आग्रहच असेल तर मग तो कोपऱ्यातला वाघ तेवढा द्यावा,” असे हिराबाई नम्रतेने म्हणाल्या.

अण्णासाहेबांनी मान वळवली. कोपऱ्यात मोठ्या डौलाने उभ्या असलेल्या त्या वाघाच्या पुतळ्याकडे पाहिले. आपल्या कलापूर्ण वैभवात हा जंगलचा राजा मोठ्या दिमाखात उभा होता. त्याच्या अंगावर पिवळे जर्द पट्टे होते. प्रत्येक स्नायू स्पष्टपणे डोळ्यात भरत होता. शीर अन् शीर तट्ट फुगलेली होती. शेपटीचे टोक वळविले होते. आक्रमणाची पूर्वतयारी होती ती. त्या पंचधातूंच्या पुतळ्यात जिवंतपणा इतका भरला आहे की क्षणभर आपल्याला भास व्हावा की, आता हा झेप तर घेणार नाही ना? अण्णासाहेबांच्या दिवाणखान्यातल्या अनेक वस्तूंपैकी ती एक वस्तू होती. पण ती जागा रिकामी झाली तर सारा दिवाणखानाच भकास होणार होता.

क्षणभर अण्णासाहेब विचलित झाले. मनात कुठेतरी हेलावले. होळकर महाराजांनी त्यांना तो खास मर्जीने बहाल केला होता. मनात कुठे तरी आठवणींच्या तारा छेडल्या गेल्या. अण्णासाहेब दिलदार होते. सरदारात असावेत ते गुणही त्यांच्यात भरपूर होते. ऐश्वर्य होते. औदार्यही होते. पण एका शिल्पावर असलेल्या प्रेमापोटी ते संभ्रमात पडले. वाघाच्या शिल्पावर त्यांचे मन जडले होते. पण हिराबाईंबद्दल आदर होता. तो कालच्या प्रसंगाने शतगुणित झाला होता. मोहावर आदराने मात केली. कारण नसतानाही अण्णासाहेब खाकरले. गळा मोकळा केला. भारदस्त आवाजात त्यांनी आपल्या चिटणीसाला हाक मारली. मग तो वाघ आवरणांत ठेवून हिराबाईंबरोबर देण्यात आला. आजही तो हिराबाईंच्या विजयाची साक्ष देत त्याच दिमाखात त्यांच्या दिवाणखान्यात उभा आहे.

## रंगभूमी

मराठी रंगभूमीवर एकूण सहा सुभद्रा गाजल्या. तसे ‘सौभद्र’ हे नाटक चिरयौवन लाभलेले. अनेकांनी रंगमंचावर आणले. त्याचे अगणित प्रयोग झाले. खंडोगणती नटांनी सुभद्रा रंगविली. पण विशेष मान मिळाला तो सहा नटांना. पहिले भाऊराव कोल्हटकर, दुसरे बालगंधर्व, तिसरे केशवराव भोसले, चवथे सवाई गंधर्व, पाचवे शंकरराव सरनाईक आणि सहावी हिराबाई. हे कालानुक्रमाने क्रमांक लागले.

हिराबाईंनी १९२९ साली स्वतःची नाटक मंडळी काढली. तिचे नांव ‘नूतन संगीत विद्यालय– नाट्यशाखा’ असे होते. तिचा ‘सौभद्र’चा पहिला प्रयोग ५ सप्टेंबर १९२९ रोजी मुंबईला बॉम्बे थिएटरमध्ये झाला. हिराबाईंची चाहती मंडळी आवर्जून उपस्थित होती. त्यात बाबूराव पेंटर, केशवराव भोळे, वसंत शांताराम देसाई आणि प्रो. ना. सी. फडके हे प्रमुख. प्रयोग उत्तम झाला. कृष्णाच्या भूमिकेत सवाई गंधर्व ही सुद्धा जमेची बाजू होती. पुढे मुंबईला बालगंधर्व आणि मास्टर दीनानाथ यांच्या नाटक कंपन्यांचे या नाटकाचे प्रयोग सुरू असतानाही हिराबाईंचे यश कायम राहिले.

या नंतर हिराबाईंच्या कंपनीने ‘साध्वी मीराबाई’ हे नाटक बसविले. ८-२-१९३० ला या नाटकाचा पहिला प्रयोग झाला. या नाटकानेही हिराबाईंच्या पदरी यशाचे माप टाकले.

साध्वी मीराबाईंच्या पाठोपाठ युगांतर, मानापमान, पुण्यप्रभाव, विद्याहरण, जागती ज्योत, स्त्री पुरुष आणि शिवाजीला शह ही नाटके कंपनीने सादर केली. इंदूर मुक्कामी मानापमान नाटकाला द्रव्यलाभ

चांगला झाला. सौभद्र आणि मीराबाई या दोन नाटकांनी संस्थेला पैसा आणि प्रसिद्धी मिळवून दिली. हिराबाईंच्या नूतन संगीत विद्यालयाच्या नाट्यशाखेने आरंभी 'संशयकल्लोळ' नाटकाचे प्रयोग केले होते; पण त्यात काम करायला हिराबाईंनी नकार दिला होता. गाण्याकडे दुर्लक्ष होऊ नये हा त्यातील हेतू होता. सौभद्र आणि मीराबाई यांच्या अमाप यशानंतरही हिराबाईंना गाण्याचे क्षेत्र सोडून नाटकांत स्थिर व्हावे असे वाटले नाही. त्यांच्या गाण्याच्या बैठकी सुरूच राहिल्या. सौभद्र आणि मीराबाई या नाटकांसारखे यश इतर नाटकांनी दिले नाही. उलट एकामागून एक अपयशाचे धक्केच दिले.

हिराबाईंनी नाटक कंपनी काढली ती मुळात पैसे मिळतील या हेतूने. पण घडले उलटेच. दगदग खूप सोसावी लागली. आणि डोक्यावर कर्जाचा बोजा येऊन पडला. त्या कर्जाची फेड करायची म्हणजे परिश्रम करायचे. त्यासाठी हिराबाई तयार झाल्या. तेव्हा एकूण नाट्य व्यवसायालाच वाईट काळ आला होता. बोलपटांचे युग सुरू झाले होते. हिराबाईंना नाटक कंपनी बंद करावी लागली.

हिराबाईंना नाट्यक्षेत्रात म्हणावे तसे यश मिळाले नाही. याला त्या काळाचा संदर्भ जसा कारणीभूत आहे तसाच प्रेक्षकवर्गाचा हिराबाईंच्या संबंधाने असलेला दृष्टिकोनही आहे. लोक हिराबाईंचे नाटक पहायला येत नसत. त्यांचे गाणे ऐकायला येत असत. याची जाण स्वतः हिराबाईंनाही होती. नाटकाच्या तालमी हव्या तशा होत नाहीत याची खंतही त्यांना होती. हिराबाईंनी उभी केलेली सिंधू नारायणराव बालगंधर्वांनी उभ्या केलेल्या सिंधूशी स्पर्धा करू शकत नव्हती. काहीशा प्रयत्नाने त्यांच्या नाटक कंपनीला बोडसांच्या तालमीचा लाभ झाला. पण तो अल्प काळ हिराबाईंनी वसंत शांताराम देसाईंना पाठविलेले पत्र या दृष्टीने बोलके आहे त्यांत त्या लिहितात, "आमचे एकच प्याला नाटक नारायणरावांच्या इतके वठणे कसे शक्य आहे? तुम्ही त्या दृष्टीने आमच्याकडे पाहू लागलात तर आम्हाला जन्मभर काम करून ते शक्य होणार नाही. त्याचे कारण त्यांची तपश्चर्या. शिवाय वर्षानुवर्षे त्यांच्या तालमी चालायच्या. श्री. खाडिलकरांसारखी माणसे त्यांना नशीबाने मिळत गेली. त्या मानाने आम्हाला कोणी शिकविले आहे?"

कंपनी बंद करून हिराबाईंनी पुन्हा तंबोरा हाती घेतला. "मी कर्जाची पै न पै याच्या भरवशावर फेडीन," असा त्यांनी निर्धार केला नाटकांतून कामे करायची नाहीत असे ठरविले. परंतु १९४४ साली मुंबई साहित्य संघाच्या पहिल्या महोत्सवात त्यांनी सुभद्रेची भूमिका केली. त्या वेळी त्यांना त्यांच्या लोकप्रियतेचा पुन्हा प्रत्यय आला. आणि त्यांनी कंत्राटदारांच्या नाटकांत भूमिका करायला पुन्हा सुरुवात केली.

हिराबाई सौभद्रमध्ये गाजल्या. त्यांच्या सौभद्रला आणि मीराबाईला जे यश मिळाले त्याचे रहस्य वसंत शांताराम देसाई यांनी अचूक सांगितले आहे. ते म्हणतात, "हिराबाईंचे शालीन दर्शन हाच त्यांचा अभिनय होता."

हिराबाईंच्या नाट्य प्रवासांतून एक गोष्ट मोठ्या प्रमाणावर मराठी जीवनाला लाभली आणि ती म्हणजे कुलीन स्त्रियांना या क्षेत्रात वाटचाल करायला एक पायवाट मळविली गेली.

स्त्री भूमिका स्त्रियांनीच कराव्या असे गोविंदराव टेंब्यांसारख्या मुरब्बी नाट्यतज्ज्ञांनाही वाटत होते. पण तो विचार कृतींत उतरविला हिराबाईंनी.

[अनुक्रमणिका](#)

आणखी एक महत्त्वाची गोष्ट हिराबाईंच्या नाट्य व्यवसायांतून सिद्ध झाली. ती म्हणजे हिराबाईंचे रंगभूमीपेक्षा संगीतावर अधिक प्रेम आहे. त्या मुळात गायिका आहेत. नटी नंतर. गाणे हेच त्यांचे जीवन.

हिराबाई कंत्राटदाराच्या नाटकात भूमिका करू लागल्या असतानाची एक विशेष घटना. ते वर्ष १९४५ किंवा ४६ असावे. कोल्हापूर हे कलावंतांचे गाव. तिथे पॅलेस थिएटर मध्ये 'संगीत सौभद्र'चा प्रयोग लावावयाचे ठरले. भूमिका जाहीर झाल्या. अर्जुन– बालगंधर्व, सुभद्रा– हिराबाई, कृष्ण– मास्तर कृष्णराव, रुक्मिणी– कमलाबाई बडोदेकर, नारद– सुरेशबाबू माने. रसिक प्रेक्षकांवर पर्वणीच आली. नाट्यगृहावर झुंबड उसळली. प्रयोगाच्या आधी दोन दिवस तिकिटे संपली. सर्वच नट गाणारे. अनेक दिवसांनंतर असा योग येत होता नाटकाच्या दिवशी संध्याकाळपासून लोक थिएटरवर जमा होऊ लागले. आपापली जागा पकडून बसू लागले. त्यापूर्वी गाजलेल्या सौभद्रातील भूमिका आठवू लागले.

नांदी झाली. तिथूनच रंगदेवतेची प्रसन्नता जाणवू लागली. आकार लावण्याअगोदरच पात्राने घेतलेल्या मोहक प्रवेशाने प्रेक्षक सुखावले. नाटक सुरुवातीपासूनच रंगू लागले. प्रत्येक गायक नट आपली पाळी आली की असे जमून गायचा की अगोदरचा रंग पुसला जावा. आणि त्याच्या वैशिष्ट्यांच्या मनोहारी रंगछटा सुवास लेवून पसरू लागाव्यात आणि त्याला लोकांनी पसंतीचा 'वन्समोअर' द्यावा. हे प्रत्येकाच्याच बाबतीत घडू लागले. प्रत्येक गायक पात्र आपली मैफिलच जणू रंगवू लागले. आपल्या ताब्यात आलेल्या मैफिलीला सोडण्याच्या मनःस्थितीत ते दिसेनात. रसिक प्रेक्षक त्याच गाण्यावर पुनःपुन्हा वन्समोअर देऊ लागले. तीन तीन, चार चार वन्समोअर मिळायला लागले. बालगंधर्व, मास्तर कृष्णराव, सुरेशबाबू, हिराबाई, ही सारीच नटराजाची लाडकी मुले. आज जणू साक्षात् नटराजच या साऱ्यांचे कौतुक पहायला नाट्यगृहात अवतीर्ण झाले होते. प्रत्येक अंक रंगत गेला.

शेवटी हिराबाईंचे 'पुष्पपराग' हे गाणे झाले. लोकांनी प्रेक्षकगृह डोक्यावर घेतले. वन्समोअर मिळाला. पुन्हा गाणे तसेच जमून झाले. हिराबाई गाण्यातील नवनवीन जागा दाखवून गेल्या. दुसऱ्यांदा वन्समोअर मिळाला. तिसऱ्यांदा मिळाला. तरी लोकांचे समाधान होईना. बालगंधर्व सुद्धा गाणे ऐकण्यात इतके तल्लीन झाले होते की आपण अर्जुनाची भूमिका करतो आहोत हेच ते विसरले. लोकांनी तिसरा वन्समोअर दिला मात्र, आता हिराबाई पुन्हा गाणे सुरू करतात की काय, असे वाटून ते एकदम कळवळून ओरडले, "ताई, ताई बस, बस. आता गायचं नाही हं!" त्यांना भीती वाटली की त्यांची ताई दमून जाईल.

अर्जुनाने सुभद्रेला 'ताई' म्हटलेले प्रेक्षकांनी ऐकले मात्र, सगळीकडे हंशा पिकला. हिराबाई म्हणजे सुभद्रा तोंडाला पदर लावून हसू लपविते आहे असे अविस्मरणीय दृश्य लोक पाहू लागले. प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

या प्रयोगाला पृथ्वीराज कपूर आले होते. संगीत नाटक इतके रंगू शकते हे त्यांना प्रथमच अनुभवायला मिळत होते. दुसऱ्या अंकात सुभद्रेला सहा गाणी आहेत. एकाहून एक रंगणारी नि रंगविणारी. शब्द नि सूर यांची नाजूक उधळणच ती. व्यर्थ मी जन्मले, किती किती सांगू, अरसिक किती हा शेला, वद जाऊ कुणाला शरण, ही गाणी हिराबाई दोन दोन तीन तीन वन्समोअर घेऊन गात होत्या. ते ऐकून पृथ्वीराज आश्चर्यचकित झाले. प्रवेश दीड ते दोन तास रंगला. पृथ्वीराजांना बालगंधर्व, मास्तर कृष्णराव नि सुरेशबाबूंचा वकूब माहित होता. पण हिराबाईंचे गाणे त्यांना अद्‌भुत वाटले होते. नाटक संपल्यावर ते धावत हिराबाईंसमोर येऊन उभे राहिले. त्यांनी भारावलेल्या अवस्थेत हिराबाईंचे हात हातात घेतले. पण

शब्द बाहेर पडेनात. ते गहिवरले होते. शेवटी म्हणाले, “उभ्या उभ्या इतका वेळ तुम्ही गाता. थकत नाही का?” ते हिराबाईंची खूप स्तुती करू लागले. बालगंधर्व स्मितवदनाने त्यांचेकडे बघत होते.

हिराबाई म्हणाल्या, “त्यात विशेष ते काय आहे? आम्हाला ती संवयच असते.” पृथ्वीराज म्हणाले, “आमच्या नट्यांना हे दाखविलं पाहिजे. तीन मिनिटांचं गाणं असतं. पण काय सोंग करतात!”मग लगेच सावरून म्हणाले, “जाऊ द्या ते. या आनंदाच्या क्षणी भलत्या गोष्टी कशाला? लेकिन एक है की आपकी तारीफ करने के लिये मुझे नये अल्फाज ही लाने पडेंगे.”

## मुलखावेगळे जलसे

बाईंच्या चाळीशीच्या आसपासची ही घटना. उत्तरेला आणि कलकत्त्याच्या बाजूला त्यांचा बोलबाला होता. दक्षिणेलाही त्या परिचित झाल्या होत्या. बंगलोर मुक्कामी त्यांचा कार्यक्रम होणार म्हणून सगळीकडे चर्चा चालली होती. आणि मग एक गंमत घडली.

जिकडे तिकडे जाहिराती झळकल्या. ‘भारताच्या सुप्रसिद्ध गायिका हिराबाई’ अशा बिरुदावलीने जाहिरातीत मजकूर होता. त्यामुळे खूप गर्दी जमली. पण गाणे सुरू होत नाही तोच कुजबूज होऊ लागली. लोक काय ऐकायला आले होते आणि त्यांना भलतेच ऐकायला मिळत होते. म्हणून ते वैतागले, हिरमुसले. त्यांची फसवणूक झाली होती. कारण हिराबाईंच्या नावाचा आणि प्रसिद्धीचा फायदा एका स्थानिक हिराबाईंने उचलला होता. तिने लोकांना फसविले होते. पण कायद्याने तो गुन्हा ठरत नव्हता. लोक स्वतःवरच चिडले. हळूहळू थिएटर रिकामे झाले.

आठ दहा दिवसांनंतर प्रत्यक्ष हिराबाई बंगलोरला येऊन पोहोचल्या. त्यांना ही हकीकत समजली. त्यांच्या जलशाची तिकिटे अजिबात विकली जाईनात. काय करावे हेही समजेना. तेव्हा त्यांच्या कार्यक्रमांच्या संचालकांनी हिराबाईंना विचारले की कार्यक्रम रद्द करावा का? हिराबाईंना याच्यावर उत्तर सुचेना. पण त्या लगेच सावरल्या. या दौऱ्यात हिराबाईंच्या बरोबर डॉ. जोशी होते. श्री. फडके दौऱ्याचे व्यवस्थापक होते. त्या दोघांच्या सल्ल्याने त्यांनी कार्यक्रम करायचाच असे ठरविले. डॉ. जोशींनी या निर्णयाची फलश्रुती समजावून दिली. त्यांचे म्हणणे असे होते की दहा माणसे आली तरी हरकत नाही. ती दहा माणसेच आपली जाहिरात करायला उपयोगी पडतील. मग जाहिरात करायचे ठरले. कानडी वर्तमानपत्रांतून वस्तुस्थिती लोकांसमोर मांडली. तेव्हा कार्यक्रमाच्या रात्री कशीबशी शे सव्वाशे मंडळी जमा झाली.

हिराबाई रंगमंचावर आल्या. त्यांच्या शालीन दर्शनांतच एक प्रकारचे संमोहन असायचे. जाणकार रसिकांची लहानशी बैठक असावी. तसा तो जलसा झाला. मनमोकळेपणाने आपली कला हिराबाईंनी पेश केली. श्रोते इतके आनंदले की ज्याच्या त्याच्याजवळ त्या गाण्याचे कौतुक करू लागले. ती शंभर माणसे ज्यांच्याजवळ बोलत त्याला आवर्जून सांगत की, बाबा रे हिराबाईंचे गाणे शब्दात कसे व्यक्त करायचे? तुम्ही ते प्रत्यक्ष ऐका या तोंडी प्रचाराचा अपेक्षित परिणाम झाला. हिराबाईंचे गाणे हा सगळीकडे चर्चेचा विषय झाला.

दुसरे दिवशी पुन्हा जलसा होता. त्या दिवशी हँडबिले वाटली नव्हती. नाट्यगृहावर फक्त जलशाची पाटी लावली होती. तरी वेळेपूर्वीच तिकीटे संपली. कार्यक्रम ‘हाऊस फुल’ झाला. यानंतर अनेक खाजगी कार्यक्रम झाले. ओळीने कार्यक्रम होत होते. ही कार्यक्रमांची रांग म्हणजे हिराबाईंची विजययात्राच होती. गर्दी खळत नव्हती.

पालघरला दांडेकर नावाचे एक गृहस्थ होते. ते गाण्याचे फार शौकीन होते. ते स्वतः थोडेबहुत गात असत व उत्तम गाणे ऐकत असत. रहिमतखाँपासून सर्वांची त्यांच्याकडे गाणी झाली होती. फक्त हिराबाईंचे गाणे झाले नव्हते. ते बाईंना भेटले की म्हणत, “आमच्याकडे गायचे आहे, बरं का?”

होता होता १९५६ साल उजाडले आणि पालघरच्या दांडेकर कुटुंबाकडून हिराबाईंना गायनाचे निमंत्रण आले. बाई गेल्या. जेवणखाण झाले. बाईंनी विचारले, “गाणे किती वाजता आहे?” घरांतल्यांनी सांगितले, “बरोबर रात्री नऊ वाजता सुरू करायचं. तोपर्यंत विश्रांती घ्या.”

संध्याकाळी साडेआठ वाजले. पण कुठेच गर्दी गडबड दिसेना. गाणे ऐकायला येणाऱ्या माणसांचीही वर्दळ दिसली नाही. शमसुद्दीनखाँ म्हणाले, “चंपूताई, गाणं दुसरीकडे कुठेतरी असेल.” बाईंनी घरात विचारले की “गाणं कुठे आहे?” घरातली माणसे म्हणाली, “इथेच आहे.” हे काय गूढ आहे हे हिराबाईंना उलगडेना.

पावणे नऊ वाजता घरातील दोन मुले आली व म्हणाली, “चला वरती. वरच्या हॉलमध्ये गाणं आहे.”

सर्व जण वर गेले. पाहतात तर काय, एक भव्य दिवाणखाना. भिंतीशी एका बाजूला गादी घातलेली. त्यावर पांढऱ्या शुभ्र चादरी, लोड, तक्के, गिरद्या. सर्व दिवाणखाना फुलांनी शृंगारलेला. गादीच्या दोन्ही बाजूंना दोन मोठ्या समया तेवत होत्या. सर्व थाट होता, पण श्रोतेच नाहीत. फक्त घरातील सात आठ माणसे येऊन एका कोपऱ्यात बसलेली. एक वयस्क बाई पुढे आल्या व हिराबाईंना म्हणाल्या “या गादीसमोर आपण गायचं. तिच्या समोरच गाण्याची बैठक घातली आहे.”

हिराबाई म्हणाल्या, “मी या गादीसमोर गायीन. पण गादीवर बसून गाणं ऐकणारे कुठे आहेत? गाणं कुणाला ऐकवायचं?”

हे ऐकून घरातली माणसे गडबडली व त्यांनी त्या गादीवर त्या संगीतप्रेमी दांडेकरांचा एक फोटो आणून ठेवला. म्हणाले, “यांना आपलं गाणं ऐकण्याची फार इच्छा होती. ती तशीच राहून गेली. मध्यंतरी त्यांना देवाज्ञा झाली. आज त्यांचं श्राद्ध आहे. म्हणून तुमचं गाणं ठेवलं आहे. तुम्ही असंच समजा की ते स्वतः गादीवर बसून गाणं ऐकत आहेत. आणि उत्तम गा.”

गाणे सुरू झाले. परंतु श्रोते नसल्यामुळे गाणे रंगेना. वाहवा नाही. दाद नाही. गाणे कसे ओकेबोके वाटू लागले. जे काय पाच सात श्रोते घरातले होते ते सुतकी चेहरे करून बाईंच्या पाठीमागे बसलेले. शमसुद्दीन म्हणाले, “बाई रियाज जारी रखो.”

अनुक्रमणिका

बारा वाजल्यावर घरातल्यांनी सांगितले, “आता गाणं पुरे. भैरवी म्हणा.” बाईंनी भैरवी आटोपून सुटकेचा निःश्वास टाकला.

१९२८ साली भारतात आकाशवाणी सुरू झाली. तिथे ध्वनिक्षेपकापुढे बसून गावे लागे. लोकांत या यंत्राबद्दल असा गैरसमज पसरला होता की ते यंत्र गाणाऱ्यांचा आवाज ओढून घेते. आकाशवाणीवर गाण्यासाठी हिराबाईंना आमंत्रण आले तेव्हा त्यांना सुद्धा काही हितचिंतकांनी सांगितले की “बाई तू या भानगडीत पडू नकोस ते यंत्र फार खराब आहे. गायला लागलं की हळूहळू आवाज कोरडा पडत जातो. मग सर्व आवाज ते यंत्र शोषून घेतं.” बाईंना अर्थातच हे म्हणणे पटले नाही. त्या म्हणायच्या, “माइकसमोर गायला बसल्यावर हे लोक इतके बिचकतात की भीतीने त्यांच्या घशाला कोरड पडते. मग आवाज आत ओढला जातो.”

मुंबईच्या आकाशवाणीवर गावोगावचे कलाकार गायला येत. एकदा बाई आकाशवाणी केंद्रावर गेल्या असता एक कलाकार स्टुडिओत चाचणी द्यायला बसला होता. ‘थोडे ऐकू या’ म्हणून बाई थांबल्या. त्या कलाकाराने आपल्या पिशवीतून हार काढला व समोरच्या ध्वनिक्षेपकाला घातला. हळदकुंकू वाहिले व साष्टांग नमस्कार घातला. हा ध्वनिक्षेपक देव प्रसन्न झाला तर आपण चाचणी उत्तीर्ण होऊ असा त्याचा समज होता.

अशा परिस्थितीत हिराबाई आकाशवाणीवर गातात म्हणून त्यांचे लोकांना कौतुक होते. धुळ्याला कुलकर्णी नावाचे एक गृहस्थ होते. त्यांनी नवीन घर बांधले होते. योगायोग असा की त्या सुमारास हिराबाईंचा राष्ट्रीय कार्यक्रम आकाशवाणीवर होता. या कुलकर्ण्यांनी एक रेडिओ घरी आणून ठेवला. निमंत्रण पत्रिका छापून घेतल्या. त्यांत लिहिले होते की सायंकाळी ६ ते ९ वास्तुशांतिनिमित्त स्वागत समारंभ व ९॥ ते ११ हिराबाई बडोदेकरांचा जलसा. त्या काळी घरोघरी रेडिओ सेट नव्हते. त्यामुळे कुणाला वस्तुस्थितीची कल्पना आली नाही.

स्वागत समारंभ पार पडला. सर्व लोक हिराबाईंच्या आगमनाची वाट पाहू लागले. कुलकर्ण्यांनी दिवाणखान्याच्या एका बाजूला पडदा लावून ठेवला होता. लोकांना वाटले की त्याच्या मागे बैठक घातली असणार. साडे नवाचा टोल पडला. कुलकर्ण्यांनी एका बड्या माणसाच्या हस्ते तो पडदा बाजूला सारला. पाहतात तो आत रेडिओ सेट ठेवलेला. कुलकर्ण्यांनी आपल्या हाताने रेडिओला हार घातला व रेडिओ सुरू केला. हिराबाईंचे नाव ऐकताच सर्व श्रोते रोमांचित होऊन गाणे ऐकू लागले. दीड तास चाललेला उत्तम राष्ट्रीय कार्यक्रम ऐकून लोक खूष झाले. कुलकर्ण्यांनाही हिराबाईंचे गाणे केल्याचे श्रेय मिळाले.

## अरसिकेषु कवित्व निवेदनम्

जलशासाठी गावोगाव हिंडताना हिराबाईंना जसा रसिकांच्या गुणग्राहकतेचा अनुभव आला तसाच अरसिकांच्या आसुरी वृत्तीचाही अनुभव आला.

१९२७-२८ साली अकोल्याला बाईंचे दोन कार्यक्रम ठरले होते. त्यासाठी साथीदारांचा संच घेऊन बाई अकोल्याला पोहोचल्या. ठरल्याप्रमाणे पहिला सार्वजनिक कार्यक्रम पार पडला. दुसरा कार्यक्रम

व्हायला तीन चार दिवसांचा अवधी होता. त्या अवधीत अकोल्यातील एका मान्यवर वकीलांनी स्वतःच्या घरी गाण्याची विनंती बाईंना केली. बाईंनी ती मान्य केली.

घरांतल्या छोट्याशा दिवाणखान्यात गाणे झाले. उपस्थित श्रोत्यांची संख्या बरीच होती. त्यांच्यात एक फौजदारसाहेब चार पाच माणसे बरोबर घेऊन श्रोत्यांना तुडवत तुडवत समोर येऊन बसले. आधीच दाटीवाटीने बसलेल्या श्रोत्यांनी त्यांना कसेबसे सामावून घेतले. गाणे उत्तम रंगले. वातावरण प्रसन्न होते. श्रोतृवर्ग खुषीत होता. फौजदारसाहेबही रंगात आले व चिरूट शिलगावून ऐटीत फुंकू लागले. त्याचा उग्र दर्प वातावरणात भरला. गाता गाता हिराबाईंना ठसका लागू लागला. आवाज आवळला जाऊ लागला. रंगाचा बेरंग होऊ लागला. म्हणून बाईंनी हात जोडून फौजदार साहेबांना विनंती केली की, “आपण कृपा करून इथे चिरूट ओढू नका. आवाजाला त्रास होतो.”

बाई एवढे म्हणाल्या मात्र, इतका वेळ खुषीत डोलणारे फौजदारसाहेब भडकले. गवताच्या गंजीवर ठिणगी पडली. त्यांना इतक्या माणसांसमोर हा आपला जाणूनबुजून केलेला उपमर्द वाटला. ते ताडकन उठून चालू लागले. त्यांच्या बरोबर आलेले त्यांचे चारपाच चमचेही त्यांच्या मागोमाग गेले. नंतर गाणे चांगले रंगले.

त्यानंतर दोन दिवसांनी सार्वजनिक कार्यक्रम होता. अपमानित फौजदार रागाने धुमसत होते. त्यांनी पाच-सहा गुंड मंडळी हाताशी धरली व एक कट शिजवला.

हिराबाईंना याची कल्पना नव्हती. गाण्याचा दिवस उजाडला. बाई व साथीदार तयार झाले. बाईंचा रिवाज असा होता की प्रथम राजाभाऊ सर्व वाद्ये घेऊन जलशाच्या ठिकाणी जात असत. मागाहून बाई स्वतः, बळवंतराव रुकडीकर व बाबूराव कुमठेकर जात असत. त्यानुसार राजाभाऊ वाद्ये घेऊन टांग्याने निघाले. एका अंधाऱ्या जागेत पाचसहा माणसे आली व त्यांनी टांगा अडवला. काय होतेय याचा अंदाज यायच्या आतच त्या गुंडांनी तंबोऱ्यांना हात घातला. राजाभाऊ घाबरून ओरडू लागले, “अहो, अहो, हे काय करता? आत्ता आमचा कार्यक्रम आहे ना.” पण एक नाही की दोन नाही. त्यांनी ते तंबोरे जवळच्या झाडावर तडातड आपटून चकणाचूर करून टाकले. तबलाडग्गा फोडला. पेटी आपटून तोडून टाकली. राजाभाऊंना कांपरेच भरले. ते रडत तिथेच बसून राहिले.

इतके बाई जलशाला निघायच्या तयारीत होत्या. इतक्यात दोन माणसे धावत आली व सांगू लागली, “अहो, तुमचे तंबोरे, तबले सर्व गुंडांनी फोडून टाकले. तुमचा तो मुलगा तिथेच रडत बसला आहे.” (राजाभाऊंचे वय त्या वेळी पंधरा सोळा असेल.)

चार पाच माणसे बरोबर घेऊन बाई व त्यांचे दोघे साथीदार घटनास्थळी पोहोचले. दृश्य विदारक होते. तंबोऱ्याचे तुकडे सर्वत्र विखुरलेले. तबले फुटलेले. पेटीचा भाता फाटून गेलेला. व राजाभाऊ कपाळाला हात लावून हमसाहमशी रडत आहे.

शेवटी इकडून तिकडून दुसरी वाद्ये गोळा केली. व कसाबसा कार्यक्रम उरकला. कार्यक्रम अर्थातच चांगला झाला नाही. कुणाचेच मन त्या वेळी ठिकाणावर नव्हते.

बाई काय किंवा कुणीही कलाकार काय, आपल्या हत्याराला प्राणाइतके जपतात. तीच फोडून टाकली तर त्यांचे भावविश्वच उद्ध्वस्त होते. केवळ कर्तव्यबुद्धीने गाऊन बाईंनी जलसा संपवला.

पुढल्या वर्षी त्या अकोल्याला गेल्या तेव्हा त्या फौजदाराला कुठल्या तरी प्रकरणात अटक झाली होती. बाईंच्या मनात नक्कीच आले असणार, "भगवानके घर देर है, अंधेर नहीं."

वणीला एका श्रीमंत खानदानी गृहस्थांकडे गाण्याचे हिराबाईंना आमंत्रण आले होते. त्या गात असताना उदास चेहऱ्याने दूर दूर बसलेले लोक जांभया देऊ लागले. 'राधेकृष्ण बोल' सुरू झाले तेव्हा अर्धवट झोपलेले सर्व उठले व शेजाऱ्यांना उठवत म्हणू लागले, "बाईजी राधेकृश्न म्हनते रे." ते गाणे झाल्यावर लोक पुन्हा पेंगू लागले.

अशाही मंडळींसमोर बाईंना गावे लागत असे. परंतु गाणे लोकाभिमुख करायची बाईंची धडपड असे. बाई छकड्यात बसून ठेचकाळत जात असत. दोन दोन दिवस राहत असत.

१९४९ साली हिराबाई आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेल्या होत्या. पंधरा सोळा जणांचा संच बरोबर होता. प्रमुख कार्यक्रम हिराबाईंच्या गायनाचा व त्याला पूरक म्हणून नृत्य, जादू, वगैरे कार्यक्रम. तिथे आरंभीच हिराबाईंना सांगण्यात आले की शास्त्रीय संगीत इथे विशेष चालत नाही. तुम्हाला जर या दौऱ्यात अर्थप्राप्ती हवी असेल तर सिनेमा संगीत गावे लागेल. यावर हिराबाई म्हणाल्या, "सिनेमा-संगीताबद्दल मला आकस मुळीच नाही. परंतु मी हिंदुस्थानांतून इतक्या दूर जी आली आहे ती शास्त्रीय संगीताचा प्रसार करण्यासाठी. मग त्यात मला पैसा मिळो अथवा न मिळो." खरोखरच ही सफर हिराबाईंना आर्थिक दृष्ट्या तोट्याची ठरली.

मुंबईला पूर्वी अनेक संस्थानिकांचे बंगले होते. लहर लागली म्हणजे ते तेथे येऊन राहत असत. त्या काळी मुंबई हे त्या लोकांचे पॅरीस. अशांपैकीच एक कोट्याचे महाराज होते. हवे तेव्हा कोटा, हवे तेव्हा मुंबई. या महाराजांना गाण्याची समज होती. ते देवभोळे होते. धर्मग्रंथांसमोर ते नम्र होत. धर्मगुरूंची आज्ञा शिरसावंद्य मानीत. पण हे सगळे करायला ते क्वचित शुद्धीवर असत. अवतीभवतीच्या लोकांमुळे त्यांना मद्यपानाचे घातकी व्यसन लागले होते.

एकदा त्यांचे खासगी सचिव हिराबाईंचे गाणे ठरवायला आले. दोन तास गायचे होते. त्यांना उत्तम वादकही हवा होता. बाईंनी रविशंकरांचे नाव सुचविले. ही गोष्ट १९४२ च्या सुमाराची.

बैठक सुरू झाली. महाराजांनी प्रथम हिराबाईंना गायला सांगितले. गाणे सुरू झाले तसे महाराजांचे पिणेही सुरू झाले. पेल्यावर पेले रिचवले जाऊ लागले. काही वेळ ते कसेबसे बसले होते. अर्ध्या पाऊण तासातच त्यांना उचलून न्यावे लागले. थोड्या वेळाने बाई गायच्या थांबल्या. त्या आणि रविशंकर परत निघाले. दोघांनाही बिदागी मिळाली. पण रविशंकर मनातून नाराज झाले होते.

नंतर काही दिवसांनी पुन्हा ते सचिव आले. गाणे व सतारवादन पुन्हा ठरले. हिराबाई व रविशंकर त्या सचिवांना त्या बैठकीबद्दल बोलले. सचिवांनी नमते घेतले व कार्यक्रमाला दोघांनाही घेऊन गेले. या वेळी महाराज रसिकतेने गाणे ऐकू लागले. त्यांच्या दाद देण्यावर रविशंकर मागचा प्रसंग विसरून गेले.

अनुक्रमणिका

पण पुन्हा थोड्या वेळाने तेच घडले. या वेळी महाराणी सरकार आतून आल्या, व म्हणाल्या, "महाराजांना गाणं उत्तम समजतं. त्यांत ते खूप रस घेतात. पण अलीकडे मद्यपानापायी काहीही नकोसं झालं आहे. फक्त गाण्याला वेळ द्यायची तेवढी तयारी असते. म्हणून म्हटलं, तेवढाच वेळ मद्यपानाशिवाय जाईल. याकरिता हा सगळा खटाटोप." महाराणी सरकार हताश झाल्या होत्या.

त्यानंतर पुन्हा तिसऱ्यांदा सचिव आले. पुन्हा अजीजीने त्यांनी राणी सरकारांचा निरोप सांगितला. हिराबाईंनी स्पष्ट नकार दिला. त्या म्हणाल्या, "फुकट पैसे घेणं बरं वाटत नाही. शिवाय आमच्या विद्येची शुचिता कायम राखता येत नाही. जिच्या कृपेवर माझं जीवनच चाललं आहे तिचा मानसन्मान, पावित्र्य मला राखायलाच हवं."

## देवासाठी गाणे

एक दिवस अचानकपणे सरोजिनी नायडू हिराबाईंकडे आल्या. त्यांच्या बरोबर सुहासिनी मुळगावकरांचे वडील शंकरराव देशपांडेही होते. त्या वेळी हिराबाई मुंबईलाच राहात होत्या. ते वर्ष १९४६ सरोजिनी नायडूंचा व हिराबाईंचा घनिष्ट संबंध. त्या म्हणाल्या, "हिराबाई, चलो चलो, जल्दी चलो. आज बुड्ढेको गाना सुनाना है." महात्मा गांधींचे त्या वेळी उपोषण चालू होते. त्यांना विरंगुळा म्हणून हिराबाईंनी गावे असे सरोजिनी नायडूंना वाटत होते. त्यांचा आग्रह आणि महात्माजींसाठी गायचे या दोन्ही गोष्टी अशा होत्या की मन मोहरून जावे. त्यामुळे हिराबाई आढेवेढे न घेता तयार झाल्या. ती मंडळी दुपारी तीन वाजण्याच्या सुमाराला जुहूला महात्माजींच्या निवासावर पोहोचली.

घनश्यामदास बिर्ला तेथेच उभे होते. फाटकातून आत जाणे कठीण होते. कारण त्या दिवशी गांधीजींचे मौन होते. त्यांना कोणाचाही त्रास होऊ नये म्हणून स्वयंसेवकांचा पहारा होता. बिर्ला म्हणाले, "चला हिराबाई, तुमचा तंबोरा धरून मी येतो. म्हणजे मला प्रवेश तरी मिळेल." ही सारी मंडळी सरोजिनी नायडूंबरोबर महात्माजींच्या जवळ गेली. हिराबाईंची गांधीजींशी ओळख करून देण्यात आली.

एखादा तास हिराबाईंनी गावे असे गांधीजींनी लिहून दिले. त्यांना मीरेची भजने ऐकायची होती. म्हणून त्यांनी हिराबाईंना मीराबाईंच्या भजनाचे पुस्तक दिले. पण हिराबाईंना पुस्तकाची गरज नव्हती. मीराबाईंची किती तरी भजने त्यांना पाठ होती. ती त्यांनी तल्लीनतेने म्हटली.

गांधीजी ऐकत होते व चरख्यावर सूत काढीत होते. मधेच ते थांबत व गाणे आवडले आहे याची पावती मान डोलवून देत. त्यांना गाणे नक्कीच आवडले होते. सुमारे तासाभराने गाणे संपले. हिराबाई सरोजिनीदेवींना म्हणाल्या, "मी गाणं म्हटलं आहे. आता महात्माजींनी मला आशीर्वाद द्यावा." गांधीजी प्रसन्न मनःस्थितीत होते. त्यांनी खुणेनेच गाणे सुंदर झाल्याचे सांगितले. त्या वेळचा त्यांच्या चेहेऱ्यावरचा भाव अविस्मरणीय होता. कुतूहलामुळे त्यांच्या भुवया उंचावल्या होत्या. डोळे मोठ्ठे वाटत होते. मग त्यांनी कागदावर लिहून दिले—

"तुम्ही लोकांसाठी खूप गायलात. आता ईश्वरासाठी गात चला. आता परमेश्वराला तुमचे गाणे ऐकवा."

हिराबाईंनी नमस्कार केला आणि त्या उठल्या. या प्रसंगानंतर सदतीस वर्षांनी माझ्या प्रश्नाला उत्तर देताना हिराबाई म्हणाल्या, “गांधीजी राजकारणी वाटतच नसत. ते साधूच वाटायचे. त्यांचं ते वाक्य मला प्रत्येक गाण्याच्या सभेच्या वेळी आठवायचं, ‘आता परमेश्वराला तुमचं गाणं ऐकवा.’ वहीदखाँसाहेबही म्हणायचे, ‘तुमचा आवडता भगवान श्रोत्यांच्या रूपात समोर असतो.’ तेव्हापासून मला वाटायचं की आपली सेवा चोख रुजू झाली पाहिजे. तीच खरी ईश्वरभक्ती आहे.”

जालंदरला कमलाबाई जयस्वाल नावाच्या एक श्रीमंत बाई राहात असत. हिराबाई जालंदरला गेल्या की कमलाबाई त्यांना अगत्याने आपल्याकडे उतरवून घेत असत. या बाईंना मूलबाळ नव्हते. त्या हिराबाईंना म्हणाल्या, “आपण बद्रीकेदारच्या यात्रेला जाऊ या.” हिराबाई मुळात भाविक असल्याने त्यांनी हे मान्य केले.

१९५७ मधे सर्व जण यात्रेला निघाले. त्या काळी बराच प्रवास पायी करावा लागे. जिथे मुक्काम पडेल तेथील देवळात हिराबाई व त्यांची बहीण कमलाबाई गाण्याची हजेरी लावत. व जयस्वाल बाईंना मुलगा व्हावा यासाठी मनोमन प्रार्थना करीत.

सातव्या दिवशी ही मंडळी केदारनाथला पोहोचली. तिथे बर्फ साचले होते. श्वास गुदमरत होता. तेथेही हजेरी लावली व बद्रीनारायणाचा रस्ता धरला.

चार पाच दिवसांनी बद्रीनारायणाला पोहोचल्या बरोबर धूळभेट घ्यायला सर्व जण देवळात गेले. तेथे समजले की येथे देवाच्या दर्शनाला पैसे पडतात. जवळून दर्शन व पूजा करायची असेल तर ५०० रु., थोडे लांबून दर्शन घेतले तर ३०० रु. व आणखी दुरून घेतले तर १०० रु. जयस्वाल बाई सचिंत झाल्या. म्हणाल्या, “मी इतक्या माणसांना बरोबर आणले. पण इतके पैसे मजजवळ नाहीत. काय करावं समजत नाही.”

तेवढ्यात तेथे हिराबाईंना स्वामी पर्वतीकर भेटले. ते दत्तवीणा वाजवितात. संन्यास घेऊन ते तेथेच राहिले होते. बाई त्यांना म्हणाल्या, “आम्ही इतक्या लांब आलो आणि आम्हाला देवाचं दर्शनच मिळत नाही. काय करावं?”

पर्वतीकर म्हणाले, “मी व्यवस्था करतो.” ते आत गेले व त्यांनी व्यवस्थापकांना हिराबाईंचे नाव सांगितले. ते ऐकल्याबरोबर त्यांनी सर्वांना आत येण्याची परवानगी दिली. फक्त अट ही की दुसऱ्या दिवशी हिराबाईंनी भजन गावे. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता बाई भजनाला बसल्या. पर्वतीकर स्वतः पखवाज घेऊन साथीला बसले. भजन अप्रतिम रंगले. भजन संपल्यावर पुजाऱ्याने देवावरची फुले आणून हिराबाईंच्या मस्तकावर आशीर्वाद म्हणून ठेवली. कृतकृत्य वाटले त्यांना. हिराबाईंची पुण्याई अशी सर्वांच्या उपयोगी आली.

यात्रा संपली. पण यात्रेकरूंचे आपसातले स्नेहपाश मात्र दृढ झाले. यात्रेचा उद्देशही सफल झाला. कमलाबाई जयस्वालांना मुलगा झाला.

अनुक्रमणिका

हिराबाईंच्या गाण्याने पुत्रप्राप्ती होण्याचा प्रसंग यापूर्वीही वऱ्हाडात घडला होता. १९३८-३९ साली चांदूर गावी बाईंचे गाणे होते. गाणे ठेवण्याचे प्रयोजन सहज विचारता तिथला कारकून म्हणाला, "आमच्या मालकान्ले लेकरू न्हवतं. तही म्य देवाले नवस केलता. म्हनलं, मालकाले लेकरू झालं त तुले हिराबाईंचं गानं ऐकवीन. आनं मालकाले पोरगं झालं."

देवाला सुद्धा हिराबाईंच्या गाण्याचे आमिष दाखवावे इतके लोकांचे त्यांच्या गाण्यावर प्रेम होते.

मिरज ही किराणा घराण्याची काशी. खाँसाहेब अब्दुल करीमखाँ मिरजेला असतान त्यांना प्लेगची गाठ आली. आशा सुटली. तेव्हा एका फकीराने त्यांना ख्वाजा शमसुद्दीन आणि मीरासाहेब यांच्या दर्ग्यात हजेरी लावायला सुचविले. खाँसाहेबांच्या अंगात ताप होता. गाठ ठणकत होती. बेचैनी वाढत होती.तरीही निष्ठेने ते दर्ग्यात गेले. त्यांनी तंबोरा हाती घेतला व शांतपणे तोडी राग आळवू लागले. विनम्र भावाने ते ख्वाजासाहेबांना आणि मीरासाहेबांना शरण आले होते. त्यांच्या रूपाने स्वरघन वर्षाव करत होता. विलंबित सुरावट घेण्याची त्यांची पद्धती हृद्याला जाऊन भिडत होती. सुरांनी वातावरण धुंद होत होते.

खाँसाहेब भावभक्तीने गात होते. गाण्यात आर्तता ओतप्रोत भरली होती. आज ते जणू शेवटचेच गात होते. पुन्हा योग येतो न येतो. इतक्यात अघटित घडू लागले. प्लेगच्या गाठीचा निचरा होऊ लागला. पण खाँसाहेबांचे लक्ष नव्हते. ते मुळी देवाचेच झाले होते. आता त्या देवाला या भक्ताची काळजी होती. या धरतीवर अजून त्याची गरज आहे हे त्या देवानेच ठरवले.

खाँसाहेब प्लेगमधून बरे झाले. संकट टळले. तेव्हापासून किराणा घराण्याचे गायक नि गायिका या दर्ग्यामधे जाऊन आपली सेवा रुजू करतात. आजही ती परंपरा सुरू आहे.

अशाच एका उत्सवासाठी किराणा घराण्याची मंडळी जमा झाली. गायक होते तशाच गायिकाही होत्या. श्रद्धेने आपली हजेरी लावणे चालले होते. धाकटी मंडळी सुरुवातीला गायिली. मग बुजूर्गांची पाळी आली. दिवेलागणीपासून हे सत्र सुरू होते.

सूर्योदयाची वेळ झाली तेव्हा हिराबाई आपल्या जागेवरून उठल्या. लोकांमधे कुजबूज झाली, "हिराबाई हिराबाई." त्यांच्यासाठी श्रोतृगण तिष्ठत होता. हिराबाई शांत चेहेऱ्याने संथ पावले टाकीत गानमंचावर आल्या. पांढरी सुती साडी त्या नेसल्या होत्या. अंगावर मणीपुरी काळी शाल होती. बाई रात्रभर गाणे ऐकत जागत होत्या. तरीही त्या बसल्या त्या उषःप्रभेची प्रसन्नता घेऊन.

तंबोरे जुळवले. गाणे सुरू करताना त्यांनी स्मित नजरेने श्रोत्यांकडे पाहिले व अभिवादन केले. मग त्यांच्या गळ्यातून 'दरबार धावू पावू' या ख्यालात रामकली साकार होऊ लागली. पूर्वेला सूर्य वर येऊ लागला. सकाळचे सहा वाजत आले होते. उगवत्या सूर्याच्या साक्षीने त्या गात होत्या. त्यांच्या स्वरांची मोहिनी श्रोत्यांवर न कळत पडत होती. आणि मग हिराबाईंच्या तार षड्‌जाने श्रोते समाधीची अवस्था अनुभवू लागले.

रामकली आटोपली पण श्रोते तेथेच रेंगाळत राहिले. भक्तिरसांत ते ओलेचिंब झाले होते. मग जोगियाची सुरावट सुरू झाली. हिराबाईंनी 'वद जाऊ कुणाला शरण' हे पद निवडले. पदाच्या आरंभीच

तार सप्तकांतील ऋषभावर आंदोलित झालेला त्यांचा करुण स्वर आसमंतात भरला. गाणे संपले तरी श्रोत्यांची गानसमाधी उतरेना. भारावलेल्या स्थितीत श्रोते उभे राहिले. कोणी गानमंचाजवळ येऊन गाण्याची प्रशंसा करू लागले. कोणी शब्दांतून तर कोणी मुक्या मनाने.

हिराबाई फक्त मंद स्मित करत होत्या. श्रोत्यांनी केलेल्या कौतुकाची तीच पावती होती. अर्ध शतकापेक्षा जास्त काळ श्रोत्यांकडून बाई कौतुक ऐकत आल्या होत्या.

अनुक्रमणिका

## ॥ ३ ॥

**सन्मान**

हिराबाईंची स्मरणशक्ती अजून तल्लख आहे. पण त्या त्यांना मिळालेल्या मानपत्रांबद्दल, निरनिराळ्या किताबतींबद्दल अथवा पारितोषिकांसंबंधी सांगू शकतीलच असे नाही. याला त्यांचा विनय जसा कारणीभूत असेल तशीच बहुतेक त्या पारितोषिकांची संख्याही जी किंमत या पारितोषिकांची ती तशीच कदरदान रसिक श्रोत्यांच्या मुखातून निघालेल्या उत्स्फूर्त वाहवाची.

प्रसंगाप्रसंगाने या गोष्टी हिराबाईंना आठवतात. त्या वेळी स्वतःला अलिप्त ठेवून ते ते प्रसंग त्या हळूवारपणे सांगतात. त्यांच्या सन्मानपत्रांचेच केवळ एखादे प्रदर्शन करू म्हटले तरी मोठे दालन भरून जाईल. त्यांच्या दिवाणखान्यात आपण पाऊल ठेवताच ही गोष्ट आपल्या नजरेत भरल्याशिवाय राहत नाही.

हिराबाईंची गानसाधना सुरू झाल्यानंतर लगेच त्यांना इंदूरला जाण्याचा योग आला त्या वेळी हिराबाईंचे वय असेल बारा किंवा तेरा वर्षांचे. तोपर्यंत मोजकेच राग त्यांना सुरेशबाबूंकडून शिकता आले होते. पण तेव्हाही त्यांचा तार षड्ज स्वयंसिद्ध होता. मोजकेच राग पण त्यांनी अशा पद्धतीने आत्मसात केले होते की ते बैठकीतही हमखासपणे रंगावे. त्यांचा बंदिस्तपणा नजरेत भरावा. त्या वयात सुद्धा हिराबाईंचा आत्मविश्वास लोकांवर छाप पाडून जात असे. त्यांच्या स्वराला त्यांनी सहजतेची बैठक प्राप्त करून दिली होती. या त्यांच्या गुणांमुळे योग येताच इंदूरच्या मुमताज बेगम या गायिकेकडे त्या गायिल्या. गाणे उत्तम झाले. हिराबाईंच्या गाण्याने बेगम भारावल्या. गाणे संपताच त्या उठल्या, हिराबाईंच्या जवळ गेल्या आणि अस्फुट पुटपुटल्या, "लो, इसे सम्हालो. जानती हूँ कि तुम्हारी इज्जत इससे नही होगी. फिर भी लीजिये." शंभर रुपयांची ती रक्कम होती. हिराबाईंना मिळालेल हे पहिले पारितोषिक.

मुंबईला आल्यावर त्यांनी आपल्या आईला ताराबाईंना हा पराक्रम सांगितला. पण त्यावर ताराबाईंची प्रतिक्रिया उद्‌बोधक होती. त्या फारशा काहीच बोलल्या नाही. कौतुकाने प्रश्नही विचारले नाही. यश कसे मिळवावयाचे आणि ते कसे पचवायचे याचा हिराबाईंना आईकडून मिळालेला हा पाठ होता.

१९२६ साली, म्हणजे हिराबाईंच्या वयाच्या केवळ एकविसाव्या वर्षी, पुण्याच्य किर्स्लोस्कर थिएटरात झालेल्या गायनाच्या जलशात सर चुनीलाल मेहता यांनी हिराबाईंना त्यांच्या कलेची दाद म्हणून 'गानहिरा' ही पदवी दिली.

अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या मदतीकरिता हिराबाईंनी केलेल्या संगीताच्या जलशात टिळकांचे सहकारी दादासाहेब खापर्डे यांनी भाषण केले. त्यात हिराबाईंचे कौतुक करताना उत्स्फूर्तपणे हिराबाईंना 'गान कोकिळा' म्हणून संबोधिले. लोकांनी टाळ्यांचा कडकडाट करून पसंतीची पावती दिली. हे आणखी एक विरुद हिराबाईंच्या नावामागे लागले.

हिराबाईंच्या षष्ठ्यब्दपूर्तीचा फार मोठा सोहळा विलेपार्ले म्युझिक सर्कलने केला. अनेक थोर थोर मंडळी जमली होती. गवई, रसिक श्रोते आणि मान्यवर साहित्यिक. त्या वेळी पु. ल. देशपांडे म्हणाले, "हा

अनुक्रमणिका

क्षण अवर्णनीय आहे. हिराबाईंच्या गळ्यात सूर देऊन देवानेच त्यांचा गौरव केला आहे. आपण कसचा गौरव करणार?”

महाराष्ट्रातल्या प्रमुख वर्तमानपत्रांनी हिराबाईंची थोरवी गाण्यात कृपणता दाखविली नाही. त्यांच्या षट्यब्दपूर्ती समारंभाचे किंवा अमृत महोत्सवाचे वेळी वृत्तपत्रांनी त्यांचा गौरव केला. त्यांचा ८० वा वाढदिवस गेल्या वर्षी पुण्यात जंगी समारंभाने साजरा झाला. त्याचे चित्रीकरणही केले गेले.

पुणे, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद, इंदूर, देवास, धार, कलकत्ता, कानपूर, दिल्ली, आदि अनेक ठिकाणी हिराबाईंचे सत्कार झाले

संगीत नाटक अकादमीने त्यांना २४-१२-६५ रोजी दिल्लीच्या विज्ञान-भवनात राष्ट्रीय पुरस्कार दिला. महाराष्ट्र शासनाने १९६६ मधे चांदीची वीणा, शाल व श्रीफल देऊन सन्मान केला. त्याच वर्षी मराठी नाट्य परिषदेने त्यांना बालगंधर्व सुवर्णपदक बहाल केले.

१९७० च्या प्रजासत्ताक दिवशी हिराबाई‘पद्मभूषण’ झाल्या. १९७४ मधे विष्णुदास भावे सुवर्ण पदकाच्या त्या मानकरी ठरल्या. सूर सिंगार या संस्थेने तीन वेळा त्यांचा निरनिराळ्या निमित्ताने सत्कार केला. दहा हजाराचे भवालका पारितोषिक आणि कलकत्त्याच्या आय. टी. सी. संगीत संशोधन संस्थेचे दहा हजार रुपयांचे पारितोषिक त्यांना मिळाले.

यानंतर त्यांना स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट हा बहुमान मिळाला. असे असताना जेव्हा हिराबाईंना विचारले की यापैकी कोणता सन्मान त्यांना अधिक भावला? तर त्या काळात गेल्यासारख्या त्या हरवतात आणि सांगू लागतात की १५ ऑगस्ट १९४७ या स्वातंत्र्यदिनी त्यांना मुंबई आकाशवाणीने राष्ट्रगीत गायला पाचारण केले. स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत सगळ्यात पहिल्यांदा म्हणायचा योग त्यांनी साधला. या योगाला त्या खरा सन्मान समजतात.

मानसन्मानामागे कधीही न लागणाऱ्या हिराबाई पहिल्या स्वातंत्र्यदिनी राष्ट्रगीत गाण्याची संधी सोडायला मात्र अजिबात तयार नव्हत्या. ही संधी म्हणजे लौकिक सन्मान नसेलही; पण भावनिक होता. ज्याला आपण जीवनातील मानबिंदू समजतो तसा.

त्या दिवशी गाण्याच्या कार्यक्रमाला म्हणून पं. ओंकारनाथ ठाकूर यांनाही मुंबई आकाशवाणीवर बोलाविले होते. त्यांनाही वाटले की आपल्याला राष्ट्रगीत गाण्याची संधी मिळावी. त्यांनी आकाशवाणीच्या केंद्राधिकाऱ्यांना तसे सांगितले.

त्यामुळे केंद्राधिकाऱ्यांसमोर धर्मसंकट उभे झाले. ते हिराबाईंकडे आले. ओंकारनाथ ठाकूर काय म्हणत होते ते त्यांनी हिराबाईंना सांगितले. त्यांना हिराबाईंकडून तडजोड हवी होती. आपली बाजू केंद्राधिकाऱ्यांसमोर मांडताना पं. ओंकारनाथ म्हणाले होते की, “मी वयाने मोठा आहे.” हे त्यांचे म्हणणे केंद्राधिकाऱ्यांनी हिराबाईंजवळ जसेच्या तसे सांगितले.

अनुक्रमणिका

हिराबाई अंतर्मुख झाल्या. पंडितजींना त्या वडीलभावाप्रमाणे मानत होत्या. त्यांची ज्येष्ठता व श्रेष्ठता त्या अवमानीत नव्हत्या. पण हिराबाईंनी साधा प्रश्न केला की, "आकाशवाणीनं मला ज्या कामासाठी बोलावलं आहे ते काम आता माझ्यापासून काढून घ्यावं का? ओंकारनाथजींच्या थोरवीचा मुद्दा आता जो उपस्थित केला जातो त्याचा विचार अगोदरच व्हायला हवा होता. हेड फोन्स लावून गावयाच्या काळात आकाशवाणीसाठी मी गायले. एकोणीसशे अठ्ठावीसपासून, म्हणजे जवळजवळ वीस वर्षे, आकाशवाणीच्या सेवेत मी घालविली आहेत. त्याचा विचार आकाशवाणीला डावलता येण्यासारखा नाही."

हिराबाओई शांतपणे पण पोटतिडकीने बोलत होत्या. केंद्राधिकाऱ्यांना या बोलण्यातून मार्ग सापडला. ते पंडितजींकडे गेले आणि म्हणाले की, "आकाशवाणीवरील सेवाज्येष्ठतेचा विचार केला तर हिराबाईंनाच ही संधी द्यावी लागेल. शिवाय हिराबाईंना ज्या कामासाठी निमंत्रण गेले आहे त्याची बूज राखायला हवी."

आणि भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनी आकाशवाणीवर राष्ट्रगीत म्हणण्याचा मान हिराबाईंना मिळाला. स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज वर चढत असतांना हिराबाईंचे राष्ट्रगीत आकाशवाणीवरून प्रसारित होत होते.

स्वातंत्र्यपूर्व काळात बहुतेक महाराष्ट्रीय गायक आपल्या जलशाचा शेवट 'वंदे मातरम्' नेच करीत असत. या बाबतीत प्रा. अरविंद मंगरुळकरांनी हिराबाईंवरील एका लेखात १९३९ सालची आठवण दिली आहे. एकदा एका संगीताच्या बैठकीनंतर हिराबाई उभ्या राहून वंदेमातरम् म्हणू लागल्या. तिलककामोदात त्यांनी वंदेमातरम् म्हटले. ही चाल वसंत शांताराम देसाई यांनी दिलेली होती. हिराबाईंच्या सुरेल स्वरांनी अंगावर रोमांच उभे राहत होते. वरच्या षड्जाला आवाज भिडला. लोकांच्या तोंडातून धन्योद्गार निघाले. मंगरूळकर म्हणतात की, त्या दिवशी त्यांना राष्ट्रगीताचा अर्थ कळला.

आयुष्यभर मानसन्मानांचा असा वर्षाव होत असताना हिराबाईंच्या मनाला कधी अहंकार शिवला नाही. त्यांची शालीनता कधी चळली नाही. याचे कारण त्यांचे ऋजू अंतःकरण व सोज्वळ चारित्र्य. त्यांचे मन विशाल व उदार होते. त्यांच्या राहणीत साधेपणा होता. बोलण्यात अदब व वागण्यात खानदानी डौल होता. स्वतःच्या गुणांची त्यांना जाणीव होती. वर्षानुवर्ष केलेल्या साधनेमुळे त्यांना आत्मविश्वास आला होता. त्यांनी विद्या कणाकणाने मिळविली. निरनिराळ्या ठिकाणांहून प्राप्त केली. ज्यांच्याकडून त्यांना काही मिळाले त्या सर्व व्यक्तींबद्दल त्यांचे मनात अपरंपार आदर आहे. संगीत परंपरेतील पूर्वसूरींसंबंधी त्यांच्या मनात अचल श्रद्धा आहे. या गुणसमुच्चयाचा परीस स्पर्श त्यांच्या गाण्याला झाला.

हिराबाईंच्या गाण्यासंबंधाने कोणीही बोलू लागला तर तो त्यांच्या तार षड्जाबरोबर त्यांच्या सोज्वळतेचा आवर्जून उल्लेख करतो. त्यांच्या गाण्याबद्दल पु. ल. देशपांडे म्हणतात, "हिराबाई म्हणजे तुळस. ती जिथे असते तिथे सोज्वळता असते." याच सोज्वळतेमुळे त्यांनी कधी कोणावर मात करण्याचा हव्यास धरला नाही. म्हणूनच त्यांना संगीताचा आत्मा सापडला. हिराबाईंच्या स्वभाववैशिष्ट्यांचे रसायन त्यांच्या गाण्यात मिसळून गेले. आणि त्यांचे गाणे ऐकण्याला सोपे व गोड वाटले.

भारतातल्या गेल्या पन्नास वर्षांतल्या अनेक नामवंतांच्या बैठकी ज्याने ऐकल्या आहेत अशा एका मातब्बर रसिकाला मी हिराबाईंच्या गाण्याचे व व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य विचारले. तेव्हा त्यांनी सांगितले,

अनुक्रमणिका

"हिराबाई जब गाती थी तो मालूम होता था की मेरी बहनही गा रही है, या मेरी माँ गा रही है. हम हमारे कानोसे सुनते थे, कानोसेही देखते थे."

**लाभालाभौ जयाजयौ**

विनय व सालसपणा हिराबाईंच्या स्वभावात किती खोलवर रुजला आहे याचा हा प्रसंग.

१९७९ साली हिराबाई कलकत्त्याला होत्या. तेथे इंडियन टोबॅको कंपनीने एक संगीत ॲकॅडमी काढली आहे. तेथे आचार्य पदावर हिराबाईंची नियुक्ती झाली होती. त्या वेळा त्यांचे वय चौऱ्याहत्तर वर्षांचे होते.

या ॲकॅडमीमध्ये एकदा जगविख्यात सतारवादक पं. रविशंकर प्रमुख पाहुणे म्हणून यायचे होते. तेथील व्यवस्थापकांनी रविशंकारांच्या स्वागताचे काम हिराबाईंकडे सोपविले होते. त्याप्रमाणे प्रवेशद्वारात एका टेबलावर हार आणि पुष्पगुच्छ ठेवलेला होता. आणि बाजूला हिराबाई उभ्या होत्या. नियोजित वेळेला पं. रविशंकर आले.

रविशंकर पुढे येताच हिराबाईंची हालचाल झाली. त्यांनी हार हातात घेतला तेव्हा रविशंकर म्हणाले, "आपण येथे उभ्या कशा?"हिराबाई म्हणाल्या, "आज माझ्याकडे हे काम आलं आहे."

त्या हार घालू लागल्या, तेव्हा रविशंकरांनी बाईंचा हात धरून ठेवला. ते म्हणाले, "हारच घालायचा आहे ना? तो नंतर घाला. पहिल्यांदा व्यासपीठाकडे चला."

ते व्यासपीठाकडे निघाले. त्यांनी आपला उजवा हात बाईंच्या पाठीवर ठेवला होता. डाव्या हाताने बाईंचे हारासहित दोन्ही हात धरले होते. चालतांना बाईंची हळूवार विचारपूस करत होते. सुहास्य वदनाने, भिवया उंचावून, ते बाईंचा शब्दन् शब्द ऐकत होते.

व्यासपीठावर चढताना त्यांनी बाईंना मदत केली. आणि व्यासपीठावर येताच चापल्याने बाईंच्या हातातील हार काढून घेतला व तो स्वतः हिराबाईंच्या गळ्यात घातला. एकदा आनंदित मुद्रेने बाईंकडे पाहून, त्यांना खाली वाकून नमस्कार केला. मग ते श्रोत्यांकडे वळून म्हणाले, "हिराबाई तो मेरी बडी बहन है. मै उनका नन्हासा भाई हूं. मै हिराबाईंको माला चढाऊंगा और वह मुझे आशीर्वाद देगी, यही उचित है."

रविशंकर भाषण करताना म्हणाले की "आमचं चुकतं ते येथेच. हिराबाई संस्थेतील पगारदार म्हणून संस्थेनं काय त्यांना कोणतंही काम सांगावं? त्या आचार्य आहेत. संगीत क्षेत्रात त्यांनी अतुलनीय कामगिरी बजावली आहे. त्या कोठेही असोत, आम्हा संगीतक्षेत्रवासीयांना त्या वंदनीयच आहेत."

इतके झाले तरी हिराबाई स्थितप्रज्ञ. त्यांचा चेहेरा शांत होता.दाराजवळ हार घेऊन तिष्ठत उभे ठेवले याचा राग नव्हता किंवा पंडितजींच्या कडून झालेल्या सन्मानाने त्या हुरळून गेल्या नव्हत्या.

राग, लोभ, मान, अपमान, यांच्या पलिकडे आता त्या पोहोचल्या आहेत.

अनुक्रमणिका

**स्वप्नी जे देखिले....**

हिराबाईंना आयुष्यभर न कळत अज्ञाताची ओढ लागलेली दिसते. त्या अज्ञाताच्या खुणा कधी कधी त्यांना जाणवतात. ज्योतिष व स्वप्ने या दोन माध्यमांतून त्या अघटिताशी नाते जोडू पाहतात.

ज्योतिष हा हिराबाईंच्या जीवनात एक अगम्याशी जोडलेला दुवा आहे. वास्तविक त्या व्यवहार उत्तम जाणतात. कृतिशीलतेला महत्त्व देतात. तरीही ज्योतिष शास्त्राची कास मात्र त्या सोडत नाहीत. कदाचित् भविष्यकथनातून त्यांना मार्गदर्शन शोधावयाचे असेल. किंवा आपले कर्तव्य संपल्यावर त्याचे फलित जाणून घ्यावयाची इच्छा असेल. कारण काहीही असो, त्यांचा ज्योतिषाकडे ओढा आहे व त्याचा त्यांना निश्चित फायदा झाला आहे.

त्यांच्या मातोश्री ताराबाईंचाही ज्योतिषावर विश्वास होता. हिराबाईंचे वडील बंधू सुरेशबाबू सुरेख गात. लहान वयातच त्यांची प्रगती कौतुकास्पद ठरली होती. ताराबाईंनी एकदा भागवत ज्योतिष्यांना सुरेशबाबूच्या गाण्यासंबंधाने प्रश्न केला. भागवतांना सुरेशबाबूंपेक्षा हिराबाईंचे भवितव्य अधिक उज्ज्वल दिसत होते. ते म्हणाले, “चंपूचे भविष्य शब्दांपलिकडचे आहे. तिला सांभाळा. मोठी करा. तिचे गाणे जोपासा.” त्या वेळी ती परकरी चंपू त्याच खोलीत एका बाजूला बसून गणिते सोडवीत होती. त्या वेळी हिराबाईंचे वय दहा असेल.

आपल्या मुलीने खूप शिकावे, डॉक्टर व्हावे, असे ताराबाईंना वाटत होते. गाणाऱ्या कलावंतांना मोठे मानले जाण्याचे दिवस अजून उगवायचे होते. पण हिराबाईंना ओढ वाटत होती संगीताची. गणितातली रुक्ष आकडेमोड करताना त्यांना कंटाळा येत होता. ताराबाईंना भागवतांच्या भविष्यामुळे एक वेगळी दिशा दिसली. आणि छोट्या चंपूला सुरेशबाबूंकडून संगीताचे पाठ देण्याचा श्रीगणेशा झाला.

अशा रीतीने हिराबाईंच्या आयुष्याला लहानपणीच ज्योतिषाने कलाटणी दिली. आणि ज्योतिष त्यांच्या मनात कायमचे घर करून बसले. आजही त्यांच्या घरी कोणी गेला नि त्याला ज्योतिष कळते असे जर त्यांच्या लक्षात आले तर त्या आपल्या घरातल्या सगळ्यांच्या कुंडल्या त्याला दाखवितात आणि प्रश्न विचारतात. त्या वेळी हिराबाई थोर गायिका नसते. ती कोणाची आई असते तर कोणाची आजी असते. गायिकेला मिळावयाचे सर्व सन्मान मिळाल्यानंतरही त्यांना जो खास आनंद होत असतो तो त्यांच्या ‘नीशू’ला- निशिकांत नावाच्या एकुलत्या एक नातवाला—तबल्यासाठी मिळालेल्या शिष्यवृत्तीचा.

ज्योतिष्याला त्यांचे हेच प्रश्न असतात. त्यांचे डोळे आता निशिकांतच्या भवितव्याकडे आहेत. हिराबाईंजवळ असलेल्या अनेक वर्षांच्या रोजनिशीमध्ये प्रामुख्याने काही आढळत असेल तर ते घरातील प्रत्येकाचे टिपण.

शिल्पकार फडके हे हिराबाईंचे मुंबईतले शेजारी. बाईंच्या गाण्याचे चाहते व हितचिंतक. तेही ज्योतिष शास्त्राचे व्यासंगी. त्यांनी तर नारायणराव बालगंधर्वांच्या पत्रिकेतील आणि हिराबाईंच्या पत्रिकेतील साम्यस्थळांची चर्चा केली आहे. तसे लेखही लिहिले आहेत.

हिराबाईंना स्वप्ने फार पडतात व त्या त्यांची व्यवस्थित नोंद ठेवतात. बहुतेक स्वप्ने देवतांबद्दल अथवा साधुसंतांबद्दल असतात. दुसरे म्हणजे सत्यसृष्टी व स्वप्नसृष्टी यांची स्वप्नात सांगड घातलेली असते. अनेकदा पुढे घडणाऱ्या घटनेची पूर्वसूचना बाईंना स्वप्नात मिळते. अगदी अलिकडे सुरेशबाबूंची थोरली कन्या नलूताई हुमणे आजाराने अत्यवस्थ असताना हिराबाईंना स्वप्न पडले की त्यांच्या अंगठीतील हिरा सांडला. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी नलूताईचे देहावसान झाले.

'मनी वसे ते स्वप्नी दिसे' असे म्हणतात. हे जर खरे असेल तर हिराबाईंच्या आत्म्याला सतत परमात्म्याचीच ओढ आहे असे म्हणावे लागेल. हे स्वप्नीचे धन लहानपणापासून हिराबाईंना गवसत आले आहे.

हिराबाई जेमतेम दहा वर्षाच्या असताना होळी पहायला म्हणून इंदूरला गेल्या होत्या. दरबार गायिका सकवारबाई यांनी त्या भावंडांची उतरायची व्यवस्था केली होती.

तिथे एक शिवमंदिर होते. नंदलाल थिएटरच्या जवळच. एक दिवस सर्व भावंडांनी मिळून ते मंदिर स्वच्छ केले. सगळे हिराबाईंना म्हणाले, "तू आता पूजा कर." पण हिराबाईंनी पूजा केली नाही. रात्री बाईंना स्वप्न पडले. स्वप्नात खूप मोठा पिवळाजर्द नागोबा दिसला. हिराबाई घाबरून उठल्या. सकाळपर्यंत झोपच लागली नाही. सकाळी एका जाणकाराला स्वप्नाबद्दल विचारले. त्याने सांगितले की सोळा सोमवार करावयाला हवे.

इतक्या लहान वयात सोळा सोमवाराचे कडक व्रत झेपणे कठीण. परंतु हिराबाईंनी हट्ट धरला की मी करणार. त्याप्रमाणे त्यांनी यतास्थित व्रत पूर्ण केले.

उद्यापनानंतर लगेच त्यांना वहीदखाँसाहेबांकडून शिकविण्यासंबंधी सूचना आली. स्वप्न शकुन ठरले आणि हिराबाईंना पैलू पडण्यास आरंभ झाला.

हिराबाईंच्या घरात १९२५ सालापासून एक सोन्याचा छोटासा गणपती आहे. ताराबाईंनी बरीच व्रतवैकल्ये करून त्याची प्राणप्रतिष्ठा केलेली आहे.

१९३३-३४ मध्ये नूतन संगीत विद्यालय—नाट्यशाखा ही हिराबाईंची नाटक कंपनी बंद पडली. कोटकर, वागळे व त्यांचे चिटणीस सावंत यांनी कंपनीवर जप्ती आणली. हिराबाईंची सर्व मालमत्ता त्यात गेली. फक्त काही साड्या व देव त्यांच्याकडे राहिले. सर्व देणेकरी हिराबाईंनी नादारी स्वीकारावी म्हणून हेका धरू लागले. अशा अपमानास्पद परिस्थितीत बिचारे देव आपले पेटीत मुकाट्याने पडून होते. ना पूजा ना पाठ.

एक दिवस रात्री बाईंना स्वप्न पडले. स्वप्नात छोटा सोन्याचा गणपती दिसला. त्याच्या मागे शाडूचा मोठा गणपती होता. सोन्याचा गणपती बारीक आवाजात म्हणत होता, "आम्हाला असं किती दिवस पेटीत डांबून ठेवणार?"

बाई म्हणाल्या, "काय म्हणालात? नीट ऐकायला येत नाही."

अनुक्रमणिका

तेव्हा मागला मोठा शाडूचा गणपती मोठ्यांदा म्हणाला, “म्हटलं, आम्हाला असं पेटीत किती दिवस डांबून ठेवणार? आम्हाला बाहेर काढून पहा, ताबडतोब तुमची परिस्थिती पालटेल.”

बाई जाग्या झाल्या. आईला स्वप्न सांगितले व म्हणाल्या, “कितीही ओढगस्त असली तरी गणपती बसवायचा.”

गणपती बसवला. होते नव्हते ते पैसे खर्च करून पूजापाठ वगैरे व्यवस्थित केले. आश्चर्य म्हणजे, एका पाठोपाठ एक इतकी गाण्याची आमंत्रणे आली की बाईंना श्वास घ्यायला उसंत नाही. पाच वर्षात चाळीस हजार रुपयांचे कर्ज बाईंनी फेडून टाकले.

१९४४-४५ सालातली गोष्ट. तेव्हा बाई मुंबईला राहत होत्या. बाईंच्या घरी गणपती बसला होता. बाईंचा असा शिरस्ता होता की गणपती बसण्याच्या दिवशी व विसर्जनाच्या दिवशी (बाईंच्या घरचा गणपती गौरी बरोबर जातो) त्या बाहेरगावी कार्यक्रम घेत नसत. परंतु त्या साली चुकून त्यांनी विसर्जनाच्या दिवशी बाहेरगावचा कार्यक्रम घेतला. त्यांना वालचंदनगरला गायला जायचे होते.

त्या जाण्यासाठी निघाल्या. परंतु अपशकुन होऊ लागले. उजवा डोळा फडफडू लागला. वाटेत एक ओढा दुथडी भरून वाहत होता. तो पार करणे कठीण झाले. बाई कशाबशा वालचंदनगरला पोहोचल्या.

इकडे घरी बाईंच्या धाकट्या बंधूंनी गणपतीची उत्सवमूर्ती विसर्जनासाठी उचलली त्या वेळी पूजेचा सोन्याचा गणपती काढून ठेवायला ते विसरले. विसर्जन करून चौपाटीवरून घरी येत असताना त्यांच्या लक्षात आले की छोटा सोन्याचा गणपती आपण काढून ठेवला नव्हता. बहुधा तोही विसर्जित झाला. ते घाबरले. त्यांनी पाणबुडे वगैरे लावून तीन चार तास शोधाशोध केली. पण व्यर्थ. विमनस्क मनःस्थितीत ते घरी परतले.

कृष्णराव अगदी हवालदिल झाले. चंपूताई गावाहून परत आल्यावर तिला काय सांगायचे? त्यांना चैन पडेना. त्यांनी सायकल घेतली व पुन्हा ते चौपाटीवर आले. बरीच शोधाशोध केल्यानंतर उद्विग्न मनःस्थितीत ते सायकलला पाठ टेकवून उभे राहिले. आणि सहज त्यांची दृष्टी सायकलच्या पुढच्या चाकाकडे गेली. तिथे काहीतरी चमकल्यासारखे वाटले म्हणून ते काय आहे हे पहायला वाकले. तर काय आश्चर्य! दोन फुलांच्या झाकणाखाली गणरायांची सुवर्णमूर्ती बसलेली. काय आनंद झाला असेल!

ती मूर्ती त्यांनी झटदिशी उचलून उराशी कवटाळली. घरी आले. हार पेढे आणले.

इतक्यात चंपूताई गावाहून आल्या. म्हणाल्या, “आज हार पेढे कशासाठी?” तेव्हा त्यांना घडलेली हकीकत सांगितली. गणपतीची महापूजा वगैरे सर्व पुन्हा झाले.

थकलेल्या बाई रात्री निवांत झोपल्या. स्वप्नामध्ये गणपतीची स्वारी हजर. या वेळी भव्य उत्सवमूर्ती दिसली. आपली मोठी सोंड फिस्कारून ते म्हणाले, “काय हा तुझा निष्काळजीपणा! आम्हाला घरी

पोहोचविण्यापूर्वी तूच बाहेरगावी जातेस होय? पुन्हा असला निष्काळजीपणा करू नकोस. एकवीस चातुर्थ्या कर व पूजेतील मूर्तील अभिषेक कर.”

पुढे बाईंनी एकवीस चतुर्थ्या व अभिषेक यथासांग पार पाडला.

१९१७-१८ च्या सुमारास कमळाबाईंना चाळीस दिवसांचा विषमज्वर झाला होता. सर्व आशा सुटल्या होत्या. तोंडात घेतलेले पाणीसुद्धा परत येत होते. कुणी तरी ताराबाईंना सल्ला दिला की शिरडीला घेऊन जा. त्याप्रमाणे सर्वजण शिरडीला पोहोचले. त्या दिवशी रामनवमीचा उत्सव होता. कुठे भजन, कुठे कीर्तन, कुठे प्रवचन चालू होते. साईबाबा द्वारकामाईत बसले होते. जवळच धुनी होती. ताराबाईंना साईबाबांनी जवळ बोलावले. धुनीतील अंगारा कमळाबाईंच्या कपाळाला लावला व म्हणाले, “जा. तुझी मुलगी काही मरत नाही.” त्या वेळी प्रथम हिराबाईंनी साईबाबांना पाहिले. सध्या शिरडीला जे मंदिर आहे ते त्या वेळी बांधलेले नव्हते.

१९५० साली बाईंना स्वप्न पडले. स्वप्नांत त्या सुरेशबाबू एका मोठ्या दिवाणखान्यात गेले. त्यांच्या समोर तीन माणसे उभी होती. तिथे एक चबुतरा होता. त्यावर एक साधू महाराज डोळे झाकून ध्यानस्थ बसले होते. त्यांना पाहून हिराबाई एकदम म्हणाल्या, “अरे, हे तर शिर्डीचे साईबाबा! हे इथे कसे आले?”

बाईंच्या समोर उभी असलेली तिन्ही माणसे हात जोडून उभी होती. म्हणत होती की, “बाबा, आम्ही दर्शनाला आलो आहोत. डोळे उघडून एकदा आमच्याकडे पहा ना.” तिघांनीही एकापाठोपाठ प्रार्थना केली. पण बाबांनी डोळे उघडले नाहीत. मग ती तिन्ही माणसे बाईंना म्हणू लागली, “आता तुम्ही विनंती करून बघा. आमच्या विनंतीचा काहीच परिणाम झाला नाही.”

बाई म्हणाल्या, “तुम्ही इतके सांगून काही परिणाम झाला नाही. मग मी तर लहानच आहे.”

इतक्यात सुरेशबाबू म्हणाले, “मी प्रार्थना करून पाहतो.”

सुरेशबाबूंनी तशीच प्रार्थना केली. तीही वाया गेली. नंतर पुन्हा सर्व जण बाईंकडे वळले. म्हणाले, “आता तरी तुम्ही प्रार्थना करा.”

मग बाईंनी साईबाबांना नमस्कार केला व म्हणाल्या, “बाबा, आम्ही इतक्या लांबून आलो आहोत. आमच्यावर एकवार कृपादृष्टी टाका ना. आम्हाला बाकी काही नको. फक्त आपलं दर्शन पाहिजे.”

असे म्हटल्याबरोबर बाबांनी डोळे उघडून बाईंकडे पाहिले व म्हणाले, “तू आली आहेस होय! जा जा. आणखी दोन महिन्यांनी तू माझ्याकडे येणार आहेस.” असे म्हणून पुन्हा डोळे मिटले.

बरोबरीच्या लोकांनी बाईंना विचारले, “हेच ना साईबाबा?”बाई म्हणाल्या, “होय!”

आणि बाईंची झोप उडाली. बाबांचे शब्द त्यांच्या कानात घोळत राहिले, “तू दोन महिन्यांनी माझ्याकडे येणार आहेस.” बाईंना वाटले, झाले, आता आपले आयुष्य संपले. त्या काळजीत बुडून गेल्या.

अनुक्रमणिका

उजाडल्यावर सुरेशबाबू आले. त्यांना हिराबाईंनी स्वप्न सांगितले. म्हणाल्या, “आता संपलं सगळं.” सुरेशबाबू म्हणाले, “तसं नसेल ग.” मग पापा (कृष्णराव) उठून आले. सर्व हकीकत ऐकून म्हणाले, “चंपूताई, तुझी कुंडली आण. मी दाखवून आणतो.”

त्याप्रमाणे कुंडली दाखविली. ज्योतिषीबुवा म्हणाले, “हिराबाईंना सध्या फारच चांगला काळ आहे. गंडांतर वगैरे कुठलेही दुष्ट ग्रह नाहीत.”

हे ऐकून हिराबाईंना हायसे वाटले. या स्वप्नाची नोंद त्यांनी आपल्या रोजनिशीत करून ठेवली. बरेच दिवस गेले. सर्व जण ही गोष्ट विसरून गेले.

त्यानंतर मालेगावच्या कलेक्टरांकडून हिराबाईंना पत्र आले. त्यात त्यांनी पोलिसांच्या मदतीसाठी तीन कार्यक्रम देण्याची विनंती केली होती.

ठरल्याप्रमाणे कार्यक्रमाला जाण्यासाठी बाई निघाल्या आगगाडीने जाताना बाई कोपरगावला उतरल्या. नेहमीचे साथीदार बरोबर होते. कार्यक्रमाच्या संयोजकांनी बाईंसाठी कोपरगावला मोटरगाडी पाठवली होती. त्यात साथीदारांसह बाई बसल्या व मालेगावला निघाल्या. जाताना वाटेत शिरडी लागली. ड्रायव्हर म्हणाला, “कोणाला बाबांचं दर्शन घ्यायचं आहे का?”

शमसुद्दीनखाँ म्हणाले, “बाई, आपण एक तासभर हजेरी लावून मग पुढे जाऊ या का?”

बाई म्हणाल्या, “अवश्य.”

त्याप्रमाणे सर्व जण देवळात आले. त्याबरोबर बाई म्हणाल्या, “अरे, हा दिवाणखाना मी स्वप्नांत पाहिला आहे. हे सर्व असंच मी स्वप्नात पाहिलं आहे”

त्यांनी रोजनिशी काढली व स्वप्नाची तारीख पडताळून पाहिली. दोन महिने पूर्ण व्हायला दोन तीन दिवसांचा अवधी होता. बाईंनी हजेरी लावली. सर्वांना एक एक रुपया प्रसाद म्हणून वाटला

१९५५ साली एका गुरुवारी हिराबाईंना स्वप्न पडले की त्या एका मोठ्या जुन्या वाड्यात गेल्या आहेत. कोणी तरी त्यांना सांगत आहे की हा मोठ्या महाराजांचा वाडा आहे. पण हे मोठे महाराज म्हणजे कोण हे समजले नाही.

बाई पुढे होऊन आतील दालने पाहू लागल्या. तिथे अनेक प्रकारची शस्त्रे प्रदर्शनात मांडतात त्याप्रमाणे मांडून ठेवलेली होती. अनेकविध कपडे लत्तेही मांडून ठेवले होते. हे सर्व पाहून त्या परत जायला निघाल्या. परत जायला मोठा रस्ता होता. परंतु त्यतील एक चौकोनी फळी काढून ठेवलेली होती. आत काय आहे, असे कुतूहल वाटले म्हणून बाईंनी आत वाकून पाहिले. आत त्यांना तीन पुरुष उभे असलेले दिसले. एकाने जटा बांधल्या होत्या. एकाने दाढी वाढवलेली होती. तिसरा साधाच होता. हिराबाई त्यांना पाहायला वाकल्याबरोबर तिघांनी डोळे उघडून वरती त्यांच्याकडे पाहिले. बाई घाबरल्या आणि घाईघाईने जायला निघाल्या. इतक्यात त्यांच्या मनात विचार आला की, कदाचित् हे कुणी साधूबिधू असतील, आपण

अनुक्रमणिका

त्यांना नमस्कार केलाच नाही. म्हणून त्या परत आल्या. पाहतात तर तिन्ही पुरुषांनी डोळे मिटून घेतले होते. बाईंनी त्यांना नमस्कार केला व त्या परतल्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रभा अत्रे शिकायला आली. बाईंनी तिला आदल्या रात्रीचे स्वप्न सांगितले. अशा प्रकारच्या जुन्या वाड्यात दत्ताचे स्थान असलेले तुझ्या पाहण्यात आहे का? असे तिला विचारले. वाड्याचे वर्णन ऐकून प्रभा म्हणाली, "अशा वर्णनाचं जुन्या वाड्यातलं एक दत्ताचं देऊळ रास्तेवाड्यात आहे."

बाई तिच्याबरोबर दर्शनाला तेथे गेल्या तर तेथे तेच वातावरण होते. व दत्ताच्या पादुका आत होत्या.

अगदी अलिकडील काळापर्यंत बाई श्रावणातल्या एका गुरुवारी तेथे हजेरी लावायला जात असत.

बनारसला बाईंचा कार्यक्रम ठरला होता. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जायचे असेल तर बाई नेहेमी आपल्या कुटुंबियांपैकी अथवा ओळखीच्यापैकी कोणाला तरी घेऊन जात असत. या वेळी त्यांच्या ओळखीच्या गुप्ते नावाच्या बाईंना त्यांनी बरोबर घेतले. या वेळीही त्या संढ नावाच्या गृहस्थांकडे उतरल्या होत्या.

रात्री झोपताना हिराबाई गुप्ते बाईंना म्हणाल्या, "आपण उद्या सकाळी लवकर विश्वेश्वराच्या दर्शनाला जाऊ. कारण प्रत्येक वेळी मी दर्शनाला जाते तेव्हा पिंडी फुलाखाली झाकलेली असते. त्यामुळे प्रत्यक्ष दर्शन असे मी अजूनपर्यंत घेतलेलं नाही. उद्या सकाळी सात वाजताच आपण जाऊ."

रात्री स्वप्नात त्या विश्वेश्वराच्या मंदिरात गेल्या. त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांना उघड्या पिंडीचे दर्शन झाले. पिंडीच्या भोवती फक्त एक पांढऱ्या फुलांचा हार घातलेला होता. पुजारी पिंडीला स्नान घालत होता. दोन्ही बाजूंना दोन समया तेवत होत्या. बाई पुढे झाल्या व त्यांनीही पिंडीवर पाणी घातले. तेव्हा त्यांना पुजारी म्हणाला, "या. तुम्हाला दर्शन घ्यायचं आहे ना?"

दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता हिराबाईंनी सर्वांना स्वप्न सांगितले. सात वाजता गुप्ते मावशी व हिराबाई दोघी जणी मंदिरात दर्शनाला गेल्या. पाहतात तर पुजारी पिंडीला स्नान घालत होते. बाई म्हणाल्या, "अगदी हेच दृश्य मी स्वप्नात पाहिलं."

एकदा बाईंना स्वप्न पडले की त्या मिरजेला अब्दुल करीमखाँच्या घरातच झोपलेल्या होत्या. स्वप्नात पहाटे चारची वेळ होती. मिरजेला ख्वाजा शमसुद्दीन व मीरा साहेब यांचा प्रसिद्ध दर्गा आहे. त्याच्या परिसरात बाई उभ्या आहेत असे दिसले. अचानक तंबोऱ्याचा आवाज ऐकू येऊ लागला. तशा बाई त्या आवाजाच्या अनुरोधाने जाऊ लागल्या. आवाज दर्ग्याच्या खोलीतून येत होता. बाई जसजशा पुढे जाऊ लागल्या तसतशी त्यांना पुढे पुढे वाट दिसत गेली.

आणखी पुढे गेल्यावर एक मोठे दार होते. ते दार लोटलेले होते. तंबोऱ्याचा आवाज त्या लोटलेल्या दाराच्या पलिकडून येत आहे अशी बाईंची खात्री झाली. बाईंनी ते दार हळूच ढकलले व आत पाऊल

ठेवले. आत त्यांना विलक्षण दृश्य दिसले. एका उंच चौथऱ्यावर एक गोरेपान साधू डोळे मिटून व मांडी घालून बसले होते. त्यांची पांढरी शुभ्र दाढी छातीवर रुळत होती. त्यांचा चेहेरा अत्यंत तेजस्वी होता. एक मंद निळसर प्रकाश भोवती पसरला होता.

अशा गूढ वातावरणात त्या चबुतऱ्याच्या खाली अब्दुल करीमखाँ तंबोरा घेऊन गात बसले होते. बाईंचे व त्यांचे तोंड एकाच दिशेने असल्याने त्यांना खाँसाहेब पाठमोरेच दिसले. ते जोगिया रागातील एक भजन आळवीत होते. शब्द होते 'हरीका भेद न पायो.' त्यांचे स्वर अंगावर काटा आणणारे होते. ते चौथऱ्यावरचे साधू चित्रांतील गुरु नानकजींप्रमाणे दिसत होते.

बाई जाग्या झाल्या. आपल्या आईला स्वप्न सांगितले. आई म्हणाल्या, "तुला ख्वाजा शमसुद्दीनने दर्शन दिले. तू फार भाग्यवान आहेस, पोरी."

## श्री सत्यसाइबाबांचा आशीर्वाद

हिराबाईंच्या आयुष्यात शिरडीच्या साईबाबांचे स्थान अनन्यसाधारण आहे. लहानपणी त्यांना साईबाबांच्या दर्शनाचा योग आला. त्यानंतर त्या अनेक वेळा शिरडीला सेवेसाठी गेल्या.

अलिकडे त्यांना त्यांच्या चाहत्यांपैकी एकाने शिरडीच्या साईबाबांचे एक दुर्मिळ छायाचित्र दिले. त्या चित्राने आल्या आल्याच शकुन दाखविला. त्याच दिवशी बाईंना दहा हजारांचे पारितोषिक मिळाले व बाईंच्या नातवाला राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळाली.

शिरडीच्या साईबाबांचाच अवतार समजले जाणारे श्री सत्यसाईबाबा यांचाही आशीर्वाद बाईंना मिळाला आहे.

श्री सत्यसाईबाबांशी बाईंची पहिली भेट १९६५ साली पी. के. सावंतांकडे झाली. बाबांपुढे हिराबाईंचे गाणे झाले. बाबांनी त्यांना कमळाबाईंसाठी उदी काढून दिली.

त्यानंतरच्या एका भेटींत बाबांनी हिराबाईंना हस्तसंचलनाने एक स्फटिकाची माळ काढून दिली. ती माळ तेथे जमलेल्या समुदायासमोर धरून बाबा म्हणाले, "हिराबाई अशा आहेत." आजही ती माळ हिराबाई जपमाळ म्हणून वापरतात.

१९७० च्या फेब्रुवारी महिन्यात बाई, त्यांच्या सूनबाई व नातवंडांना घेऊन, पुट्टपत्तीला बाबांच्या दर्शनाला गेल्या होत्या. परत यायच्या दिवशी बाई बाबांना म्हणाल्या, "मी आज तुमच्या पायाला हात लावून नमस्कार करणार आहे." बाबांनी तसे करायला परवानगी दिली.

बाबा म्हणाले, "हिराबाई, दोन महिन्यांनी तुम्हाला राजयोग आहे."
बाई म्हणाल्या, "बाबा, आता राजेरजवाडे तर गेले. आता कुठला राजयोग?"
बाबा म्हणाले, "तरीपण मी सांगतो तसं होईल."
बाई म्हणाल्या, "म्हणजे काय होईल?"

अनुक्रमणिका

"झालं म्हणजे कळेल," बाबा म्हणाले.

बाईंनी घरी येऊन ही गोष्ट रोजनिशीत लिहून ठेवली. एप्रिल महिना उजाडला. वरील घटनेला दोन महिने पूर्ण व्हायला तीन दिवस अवकाश होता. आणि अचानक 'पद्मभूषण' किताब मिळाल्याची सरकारकडून तार आली.

बाबांचे शब्द खरे ठरले.

अशीच एक घटना बालगंधर्व रंगमंदिराच्या उद्घाटन प्रसंगी घडली. त्या समारंभाला जाताना बाईंनी मोत्याचा कंठा घातला होता. त्याच्यात मधे सोन्याचे पदक होते. समारंभ संपला. बाई घरी यायला निघाल्या. घराशी गाडीतून उतरताना त्यांच्या लक्षात आले की गळ्यातील कंठ्याचे मोती ओगळून पडत आहेत. पडत असलेले मोती सावरले. पडलेले गोळा केले. परंतु मधले सोन्याचे पदक दिसेना. खूप शोध शोध शोधले. पत्ता लागेना. बाई हताश झाल्या.

रात्रीबाई श्री सत्यसाईबाबांच्या चित्रासमोर हात जोडून उभ्या राहिल्या. मनःपूर्वक त्या बाबांना म्हणाल्या, "बाबा, मी इतक्या कष्टानं हा पैसा मिळविला आहे. हे माझं कष्टाचं सोनं जावं म्हणजे काय? बाबा, तुम्ही मला म्हणाला होतात ना की कठीण प्रसंगात मी तुमच्या पाठीशी उभा राहीन म्हणून? मला माझं लॉकेट मिलालं पाहिजे."

असे बोलून त्या झोपल्या. त्यांना सकाळी साडेपाचलाच जाग आली. आणि त्यांना सतत आतून वाटू लागले की आपले पदक थिएटरच्या आवारामधेच कुठे तरी पडलेले आहे. त्या सुनेला म्हणाल्या, "शोभा, तू एकदा रिक्षानं जाऊन पहा ग. जिथे नारायणरावांचा फोटो लावला आहे त्याच्या आजूबाजूला बघ. तिथेच असेल कुठे तरी."

शोभा बालगंधर्व रंगमंदिरात गेली तेव्हा तिथे काही माणसे बोलत उभी होती. एक झाडूवाली झाडत होती. शोभा इकडे तिकडे शोधू लागली. शोधता शोधता ती तिथल्या पायऱ्यांपाशी आली आणि काय आश्चर्य! तेथे ते सोन्याचे पदक मांडून ठेवल्यासारखे होते. दोनच मिनिटांपूर्वी झाडूवाली तेथून झाडून गेली होती शोभाने ते तेथून उचलले.

### मायेची पाखर

हिराबाईंचा परिवार तसा फार मोठा. त्यांना मुलगा जरी एकच असला तरीही त्यांनी मुलाप्रमाणेच लालन पालन केलेल्यांमध्ये त्यांची भाचरे, भावंडे, शिष्या, काकाकुवा व कुत्री-मांजरी यांचा समावेश होतो. हिराबाईंचा 'स्वर—विलास' बंगला संगीतपंढरीच्या वारकऱ्यांचे तीर्थस्थान झालेला आहे. पुण्यात आलेला कोणीही मोठा कलाकार, मग तो तालशास्त्रातील लयभास्कर असो अथवा स्वर उमजलेला स्वरसम्राट असो, स्वर विलासांतील या सावळ्या दैवतासमोर मस्तक झुकविल्याशिवाय जात नाही

हिराबाईंच्या आईचे निधन झाल्यानंतर कुटुंबाची सर्व जबाबदारी हिराबाईंवर येऊन पडली त्यांनी ती तितक्याच समर्थपणे पार पाडली. १९५३ साली सुरेशबाबू कालवश झाले. त्यांच्या पाचही कन्या व तिघे

अनुक्रमणिका

मुलगे यांचीही जबाबदारी हिराबाईंवर येऊन पडली. परंतु कर्तव्यपूर्तीत कमी पडल्या तर त्या हिराबाई कसल्या? सर्व मुलांचे शिक्षण, मुलींची लग्ने, माहेरपण, सर्व त्यांनी आईच्या मायेने केले. सुरेशबाबूंच्या मुलांना त्यांच्या मोठ्या आत्याबाईंच्या रूपाने मातृप्रेम व पितृप्रेम दोहोंचा लाभ झाला.

हिराबाई आपल्या सहवासात आलेल्या प्रत्येकावर प्रेमाचा वर्षाव करतात याची साक्ष त्यांच्या घरातील मांजरी व कुत्रीही देतील. काकाकुवा तर बाईंनी आपल्याला काही तरी खाऊ घालावे यासाठी हटून बसत असे बाईंकडे पूर्वी असलेले काळू व ल्युसी अथवा अलीकडे असलेली सनी ही कुत्री त्यांच्या प्रेमळ स्पर्शासाठी आतुर असतात. एकदा नागपुरला गेलेल्या असताना हिराबाई पुण्याला परत जाण्यासाठी घाई करू लागल्या. कारण विचारले असताना त्या म्हणाल्या, "आग, घरी पोप्या आजारी आहे. त्याला पातळ परसाकडे होत आहे आणि खातही नाही. काळजी वाटते." हे बोलणे जर त्रयस्थाने ऐकले असते तर त्याला नक्कीच वाटले असते की पोप्या हे हिराबाईंच्या नातवंडांपैकी एकाचे नाव असावे. परंतु पोप्या हा हिराबाईंनी आफ्रिकेतून आणलेला काकाकुवा होता.

हिराबाईंच्या स्वरविलासांतील वृक्षवेली कुठल्याही खताशिवाय बहरत असतात. तेथे भारद्वाज पक्षी स्वयंपाकघराच्या खिडकींत बसून हक्काने पोळी मागून खातो.

हिराबाई आपल्या शिष्यांना आईच्या ममतेने वागतात. १९६९ साली एक शिष्य मुंबईला एम. ए. संगीताची परीक्षा देण्यासाठी अहमदाबादहून आली होती. बाईंची व तिची भेट झाली त्या वेळी बाईंच्या लक्षात आले की ती लवकरच आई होणार आहे. अशा अवघडलेल्या परिस्थितीत ही एम. ए. ची परीक्षा देणार! मनात त्या हेलावल्या. वरून सहजपणे म्हणाल्या, "काय, कशी काय झाली आहे तयारी?"

शिष्या म्हणाली, "बाई, चांगली मेहेनत केली आहे, चार-चार पाच-पाच तास."

हे ऐकून त्या कणवेने म्हणाल्या, "अग, अशा अवस्थेत ही इतकी धडपड कशासाठी? तुला सांगते, माझी पहिली मुलगी जन्माला आली ती बिचारी पाठीचा कणा मोडलेल्या अवस्थेत. दोन तीन दिवसानंतर ती गेली. कां, माहीत आहे? तिच्या वेळी शेवटपर्यंत मी गात होते. कार्यक्रमांसाठी हिंडत होते. प्रवासाची दगदग अतोनात आणि पाच—पाच सहा—सहा तासांचे जलसे. जलशात तर एकाच आसनात बसावं लागतं. त्याचा तो परिणाम. मी हे भोगलं, म्हणून असं वाटतं, इतर कुणाच्या वाट्याला हे दुःख यायला नको. म्हणून म्हणते, इतकं आवश्यक होतं का आता एम. ए. ला बसणं?"

इतकी वर्षे बाईंच्या सहवासात घालवूनही बाईंचे हे दुःख आपल्याला माहीत नसावे याचे त्या शिष्येला आश्चर्य वाटले. शिष्येला मार्गदर्शन म्हणूनच ते बाईंच्या ओठावर आले. एरव्ही लोकांच्या जीवनांत आपल्या सुरेल संगीताने आनंदाचे वसंत फुलविणारी ही कलावती आपल्या जीवनांतील शल्ये मौनाच्या पडद्याआड झाकून ठेवते.

एकदा बाई मुंबईहून दिल्लीला राष्ट्रीय कार्यक्रमासाठी जात होत्या. त्यांच्याबरोबर त्यांचे धाकटे बंधू कृष्णरावही होते.

अनुक्रमणिका

त्यांच्या डब्यात एक नुकतेच लग्न झालेले जोडपे होते. दोघांनाही गाण्याचा शौक होता. बाईंजवळ तंबोरा पाहताच त्यांनी चौकशी केली. या हिराबाई आहेत हे समजल्यावर त्यांना फार आनंद झाला. हे जोडपे दिल्लीला फिरायला चालले होते. पण दिल्लीची त्यांना काही माहिती नव्हती. म्हणून त्यांनी दिल्लीला कुठे उतरावे वगैरे बाईंचा सल्ला घेतला.

संध्याकाळची जेवणे झाली व त्या नवराबायकोत काही तरी बाचाबाची सुरू झाली. बायको म्हणत होती, "अजी, मुझे क्या मालूम? आपनेही तो रख्खी थी."

"ठीक तरहसे देखो. होगी वहीपें कहीं."
"मै सच कहती हूँ, नही है."
"देखोजी, ऐसीभी क्या मजाक होती है?"

बघता बघता तो मुलगा रडकुंडीला आला. म्हणाला, "भगवान कसम, मैं मजाक नही कर रहा हूँ"

न राहवून बाईंनी विचारले; "क्या बात है?"

ती मुलगी रडत रडत म्हणाली, "देखो ना, इन्होंने हमारी टिकटें कहाँ रख्खी मिलतीही नहीं."

दोघांनाही काय करावे सुचेना. त्यांना वाटले, विनातिकीट म्हणून आपल्याला आता पकडतील.

बाई म्हणाल्या, "अभी तो सो जाओ. सबेरे देखेंगे. कुछ ना कुछ इन्तजाम होही जाएगा."

सकाळी सात वाजता नवी दिल्ली स्टेशन आले. बाईंनी पापांना (कृष्णरावांना) दोन प्लॅटफॉर्म तिकीटे काढून आणायला सांगितले. बाई स्वतःत्या जोडप्याचे सामान बरोबर घेऊन खाली उतरल्या. मग ती दोन्ही प्लॅटफॉर्म तिकिटे त्यांना देत म्हणाल्या, "आप ये टिकट देकर बाहर आइये. मै आपका सामान लेकर बाहर इन्तजार करूंगी"

ही युक्ती लागू पडली. दोघेही सहीसलामत बाहेर पडले.

दिल्लीला बाई गोळवलकरांकडे उतरल्या होत्या. तेथे जाऊन त्या दोघांनी त्यांना मुद्दाम धन्यवाद दिले. व आपली तिकिटे नंतर सूटकेसमध्ये मिळाल्याचेही सांगितले.

**बंध रेशमाचे**

फार पूर्वीची गोष्ट. साठ वर्षांपूर्वीची. हिराबाईंना शिकवणी चालू होती. दरबारी कानडासारखा धीर गंभीर राग वहीदखाँ शिकवीत होते. वातावरण दरबारीच्या आलापीने भारले होते. हिराबाईही या अनोख्या रागाच्या दर्शनाने उत्साहित झाल्या होत्या. मन्द्र सप्तकातील धैवतावरची मनोहारी आंदोलने त्या आपल्या गळ्यांतून काढण्याचा प्रयत्न करीत होत्या. बाजूलाच घातलेल्या गादीवर ताराबाई बसल्या होत्या. मागल्या दारातून खाँसाहेबांची गुडगुडी घेऊन हिराबाईंची धाकटी बहीण आली. गुडगुडी खाँसाहेबांसमोर ठेवून

तिथेच बाजूला बसली. हिराबाई दरबारीत हरवल्या होत्या. त्यांचा शुद्ध रिषभ इतका सुंदर लागला की वहीदखाँच्या तोंडून न कळत वाहवाची दाद भरली गेली. त्यांच्या डोळ्यांतून कौतुक ओसंडू लागले.

इतक्यात बैठकीचे लोटलेले दार किलकिले झाले. जरीचे चढाव घातलेले एक रुबाबदार पाऊल आत पडले. एक उमद्या व्यक्तिमत्वाचे तरुण गृहस्थ, बरोबर दोन मित्र घेऊन, हळूच आत आले. गाण्यात रसभंग होऊ नये म्हणून मुकाट्याने ताराबाईंच्या बाजूला बसले.

दरबारीची बढत आता गंधारापर्यंत आली होती. हिराबाईंच्या गळ्यातून गंधार रिषभाची व मध्यमाची आस बरोबर घेऊन प्रकट झाला. आपला गंधार बरोबर लागला की नाही याचा अंदाज घेण्यासाठी हिराबाईंने डोळे उघडून खाँसाहेबांकडे पाहिले. त्या आलापींत मग्न असताना येऊन बसलेले शौकीन पाहुणेही त्यांच्या नजरेस पडले. हिराबाईंच्या चेहऱ्यावर आनंद व आश्चर्य उमटले.

हिराबाई पुन्हा गंधाराचा शोध घेऊ लागल्या. परंतु पुन्हा पुन्हा शोध करूनही त्यांना तो सापडेना. शेवटी वहीदखाँ अस्वस्थ होऊन उद्गारले, “नही नही, बेटी, ऐसे नही. ऐसे....” असे म्हणून त्यांनी स्वतः गंधाराची आंदोलने घेऊन दाखविली. त्यांना थोडे आश्चर्यच वाटले की एकदा दोनदा एखादी जागा सांगितल्यावर टिपकागदाप्रमाणे चटकन उचलणारी चंपा आज या गंधाराच्या आंदोलनात कां अडकली?

वातावरणातला दरबारीचा गंभीरपणा काहीसा विचलित झाला होता. त्यात कुठे तरी अस्थिरता डोकावली होती. खाँसाहेबांसारख्या मुरलेल्या उस्तादाला ही गोष्ट जाणवली. त्यांना वाटले की पाहुण्यांच्या आगमनाने त्यांची चंपू घाबरली. मोठ्या मायेने ते म्हणाले, “क्या हुआ बेटी? ये लोग आये तो क्या हुवा? अपने घरकेही तो लोग है. संगीतमे समझदारी भी अच्छी है. अच्छा, अभी मन नही लगता तो छोड दो. शामको इसीसे शुरू हो जायेंगे.” असे म्हणून ते आलेल्या पाहुण्यांकडे वळले. “क्यूं जी, बहुत दिनोंबाद आना हुवा?”अशा प्रकारची वास्तपुस्त करू लागले. मधेच गुलुताईला मेहमानांची खातीर करायलाही सांगितले.

हिराबाई तंबोरा ठेवून आत गेल्या. आलेल्या पाहुण्यांची उत्तम सरबराई झाली. क्षेमकुशलाच्या गोष्टी झाल्या. पाहुणे जाण्यासाठी उठले. त्यांना निरोप देण्यासाठी चंपूताई काही बाहेर आली नाही. ती एका खिडकीतून एकटक त्यांच्याकडे पाहत होती. त्यांना आपण दिसू नये अशा बेताने. त्या ऐटबाज, रुबाबदार सौंदर्याने तिच्या हृदयाची तार छेडली होती. दरबारींतला गंधार कोणी चोरून नेला याचे उत्तर तिचे तिलाच मिळाले. ती स्वतःशीच हसली. दरबारी गात असताना उडालेला गोंधळ तिला आठवला. त्या आठवणीने आपण मनात कुठेतरी सुखावत आहोत याची जाणीव झाली. आणि अबोध हुरहूर मनांत निर्माण झाली.

त्या तरुण गृहस्थांचे जाणेयेणेही पुढे वाढत गेले. ते तरुण गृहस्थ म्हणजे माणिकचंद गांधी. सोलापुरात हे नाव सर्वपरिचित होते. या लक्ष्मीपुत्रापाशी दिलदार वृत्ती व गुणग्राहकता होती. दोन वर्षांच्या भेटीगाठीनंतर १९२४ साली माणिकचंद व हिराबाईंनी रीतसर विवाह केला.

माणिकचंदच्या वागण्यात खानदाणीपणा असे. हिराबाईंना त्यांनी कधीही एकेरी हाक मारली नाही. बाईंना त्यांच्या कलेमुळे प्राप्त झालेला मान व प्रतिष्ठा त्यांनी कधीही कमी लेखली नाही. १९२८ साली हिराबाईंना मुलगा झाला. त्याचे नांव गुरुनाथ.

अनुक्रमणिका

शांत आणि समजदार असलेला हा जोडीदार एकदा मात्र फार हेकट बनला. १९२९ साली जेव्हा हिराबाईंनी 'नूतन संगीतविद्यालय—नाट्यशाखा' या नावाची नाटक कंपनी काढली तेव्हा त्यांच्या या व्यवसायाला सर्वप्रथम कडाडून विरोध माणिचंदनीच केला. त्या काळाला अनुसरून त्यांत गैर नव्हते. त्या काळी बायकांनी उंबऱ्याबाहेर येणे, परपुरुषाशी बोलणे, हेच गैर समजले जात असे. फार कशाला, संध्याकाळी बायकांनी आरशात पहाणेही निषिद्ध मानले जाई. "गाणं गाणं भिकार लक्षणं" असे घरोघरच्या लेकीसुनांना ऐकावे लागण्याचे ते दिवस होते. चूल आणि मूल हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र, असे मानणाऱ्या समाजांत माणिकचंदनी हिराबाईंना गाण्याचे जलसे करायला परवानगी दिली, परंतु नाटकाचा विषय निघाला त्या वेळी ते नाराज झाले. "नाटकात खोटं खोटंच का होईना, तुम्ही परपुरुषांच्या हातात हात देणार आणि प्रेमाची भाषा बोलणार. हे मला बिलकुल पसंत नाही," असे त्यांनी हिराबाईंना निक्षून सांगितले.

हिराबाईंही मनस्वी कलावती होत्या. आपल्या संगीत कलेला रंगभूमीच्या कसोटीवर पारखून घेण्याची त्यांची जिद्द होती. त्यांच्या भोवतीचा परिवारही या बाबतीत पाठिंबा देत होता. रंगभूमीवर कामे केल्याने आपल्या संगीताला नाट्यसंगीताचा एक वेगळा पैलू पडेल असेही त्यांना वाटले असावे. त्याही या मुद्द्यावर हटून बसल्या परिणाम व्हायचा तोच झाला. माणिकचंद व हिराबाई यांच्यात दुरावा निर्माण झाला. नूतन संगीत विद्यालय—नाट्यशाखा अस्ताला जाईपर्यंत तो कायम होता. त्यानंतर मात्र मतभेदाचे कारण नष्ट झाल्याने पुन्हा दिलजमाई झाली.

पुढे एका अनपेक्षित आर्थिक धक्क्याने माणिकचंदांचा संसार डळमळला. परंतु हिराबाईंनी तो लक्ष्मीच्या हातांनी सावरला. व तीच भूमिका कायम ठेवली.

हळूहळू कालचक्र पुढे सरकत होते. समाजामधे सर्वच क्षेत्रांत वैचारिक परिवर्तन होत होते. कलाकारांना प्रतिष्ठा व मानसन्मान मिळू लागले. प्रतिष्ठित स्त्रियांनी संगीत शिकणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण मानले जाऊ लागले. मराठी स्त्री नऊवारी लुगड्याऐवजी पाचवारी साड्या नेसू लागली. क्वचित एखादी मुग्धा स्कर्टब्लाऊजही घालू लागली. सर्वच आघाडींवर स्त्रिया प्रगती करू लागल्या. "आमची यमी हिराबाईंकडे गाणे शिकते हो" असे यमीला पाहायला आलेल्यांना यमीची आई अभिमानाने सांगू लागली.

हा काळ उजाडेपर्यंत हिराबाई अत्युच्च शिखरावर पोहोचल्या होत्या. हिराबाईंच्या गायनाने सबंध महाराष्ट्राच्या हवेत संगीत पसरवले होते. महाराष्ट्रांतील मुलींची लग्ने 'उपवनी गात कोकिळा' गायला येत असल्याने ठरू लागली. तिकडे उत्तर हिंदुस्थानांत हिराबाईंच्या 'राधेकृष्ण बोल'ने लोकांना वेड लावले.

१९५१ साली गुरुनाथचे लग्न मीनाक्षी पैंगणकर नावाच्या मुलीबरोबर झाले. ती शोभा बडोदेकर झाली. १९५३ मध्ये त्यांना मुलगी झाली.

या सुमारास या कुटुंबावर एक सावट पसरले. माणिकचंदजींची दृष्टी अचानक गेली. नातू पाहायची त्यांची इच्छा अतृप्त राहिली. त्यांना नैराश्याने घेरले. माणिकचंद हे भगवान महावीराचे उपासक. संमेद शिखरजींची यात्रा ते परमपवित्र मानीत. ती तीर्थयात्रा आपण करावी अशी त्यांना इच्छा झाली. परंतु अशा परावलंबी स्थितीत ते कितपत शक्य होईल ही शंकाही भेडसावत होती. हिराबाईंनी त्यांना आश्वासन दिले

की “मी ही तुमची इच्छा पूर्ण करीन.” पतीच्या उणीवा जी भरून काढते तिलाच अर्धांगिनी म्हणतात. हिराबाई माणिकचंदचे नेत्र बनल्या.

संमेद शिखरजीच्या यात्रेला हिराबाई, माणिकचंद आणि त्यांची प्रथमपत्नी आवलाबाई निघाले. भारतांतील प्रथम श्रेणीची ही गायिका ते सर्व चोवीस टूक (टेकड्या) पायी फिरली. आपल्या पतीसाठी.

१९७९ साली माणिकचंदजी पंचत्वात विलीन झाले. हिरा–माणिक युतींतले माणिक निखळून पडले. हिराबाईंवर वज्राघात झाला. आपल्या सर्व कुटुंबियांना आधारस्तंभ वाटणाऱ्या हिराबाई स्वतः निराधार झाल्या. अजोड कर्तृत्वाच्या या बाई, सामान्य स्त्रीप्रमाणे दुःखाने खचल्या. दुःखाचे अवडंबर करण्याचा त्यांचा स्वभाव नाही. परंतु हे दुःख मात्र त्या पचवू शकल्या नाहीत. याची साक्ष त्यांचे शरीर देऊ लागले. माणिकचंद गेले आणि हिराबाईंची प्रकृती खालावली. वरकरणी न दिसणाऱ्या दुःखाने शरीर पोखरले. आणि हिराबाईंच्या आयुष्यात संध्याछाया पसरल्या.

## अवघाची संसार सुखाचा

आता हिराबाई पार थकल्या आहेत. पण त्या मनाने तृप्त आहेत. कारण त्यांचे जीवन सर्वांगांनी सफल झाले आहे. त्यांनी निष्ठेने खतपाणी घातलेली रोपे तरारलेली, बहराला आलेली, त्यांनी पाहिली आहेत. त्यांचा विस्तार भोवती पसरला आहे.

कमळाबाई बडोदेकर हे एके काळी रंगभूमीवर गाजलेले नाव. बडोदेकर भगिनींमध्ये त्या रूपाने उजव्या. अभिनयाची निसर्गदत्त देणगी लाभल्यामुळे रंगभूमी व रुपेरी पडद्यावर झळकलेली ही त्या काळची नायिका आपल्या खऱ्या आयुष्यात मात्र हिराबाईंची सावली बनून राहिली. हिराबाईंची शिकवणी चालू असताना वहीदखाँना वारा घालणारी, त्यांना गुडगुडी शिलगावून देणारी, ही गुलूताई रंगभूमीवरही हिराबाई ना पूरक भूमिका करीत असे. मनुष्याची सावली नाही का कधी कधी मनुष्यापेक्षा मोठी होत? तशी हिराबाईंची ही सावली रंगभूमीवरील अभिनयात त्यांच्यापेक्षा मोठी झाली. हिराबाईंना खाँसाहेबांनी शिकविलेल्या जवळ जवळ सर्व चिजा त्यांना पाठ येतात. परंतु त्याचा त्यांना अभिमान मुळीच नाही. या चिजांच्या बाबतीत अधिकारवाणीने काही सांगायचे झाले तर त्या हिराबाईंकडेच बोट दाखवितात. एक काळ त्यांनीही भरपूर पैसा मिळविला. पण आज त्यांना स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव राहिलेली नाही. त्यांनी आपले व्यक्तिमत्त्व हिराबाईंच्या व्यक्तिमत्त्वात मिसळून टाकले आहे.

हिराबाईंनी स्वतः शिकत असताना आपली धाकटी बहीण सरस्वती हिलाही आपल्याप्रमाणे तयार केले. पुष्कळशा हिराबाईंसारख्या, परंतु थोड्याफार वेगळ्या, गायनशैलीने सरस्वती राण्यांनीही एक काळ गाजवला. पार्श्वगायनात त्यांना बरीच लोकप्रियता मिळाली. पुढे पुढे शास्त्रीय संगीतातही त्यांनी आपला एक श्रोतृवर्ग तयार केला. हिराबाई व सरस्वतीबाई यांची जुगलबंदी ही रसिक श्रोत्यांना पर्वणीच वाटत असे. जुगलबंदी म्हणजे एकमेकांवर मात करण्याच्या ईर्षेने गाणे अथवा नाचणे, असा जो एक गैरसमज सगळीकडे दिसतो तो या भगिनींनी पुसून टाकला. एकमेकीच्या गाण्याला पूरक असेच दोघी गात असत. त्यांचे गाणे इतके एकजीव होत असे की हिराबाईंचा आलाप कुठे संपला व सरस्वतीबाईंचा कुठे सुरू झाला हे सांगणे मुश्किल असे.

अनुक्रमणिका

हिराबाईंचा शिष्यपरिवारही मोठा आहे. त्यांच्या शिष्यांपैकी पंधरा वीस जणींनी नाव कमावले आहे. मालती पांडे, प्रभा अत्रे, जानकी अय्यर, सीता कागल, या त्यात प्रमुख. सर्व शिष्या त्यांच्या विषयी आदर, भक्ती, श्रद्धा व कृतज्ञता मनात बाळगून आहेत.

रियाजाला त्या अनन्य महत्त्व देतात. अलीकडे उदयोन्मुख कलाकार जेव्हा त्यांचा आशीर्वाद मागायला येतात तेव्हा त्या स्पष्टपणे म्हणतात, "अरे, नुसत्या आशीर्वादाने काय होणार? भरपूर मेहेनत करा. तीच कामाला येईल." तथापि त्यांच्या शिष्यांपैकी कुणाच्या हातून व्हावी तशी मेहनत जर झाली नाही तर त्या चिडत नाहीत, रागावत नाहीत. आपल्या या संसारी शिष्यांसाठी हिराबाईंच्या पोटी अपार माया आहे. त्या म्हणतात, "मुलींच्या मागे हल्ली बरेच व्याप असतात. संसार सांभाळून त्या एवढे करताहेत हेच खूप झाले." शिष्यांनी काही चांगले केले तर त्याचे त्यांना कौतुक आहे, त्यांच्याबद्दल काळजी आहे.

हिराबाई जलशासाठी जेव्हा गावोगावी हिंडत तेव्हा तंबोऱ्यातीलसाठी कोणी तरी शिष्या त्यांच्या बरोबर असेच. तिच्या जेवणाखाणाची व्यवस्था त्या जातीने पाहत असत. उत्तर हिंदुस्थानच्या एका दौऱ्यावर, त्यांची शिष्या मांसाहार घेत नाही म्हणून हिराबाईंनी तिच्यासाठी तुपाची बरणी बरोबर घेतली होती. तसेच उदयपूरच्या दौऱ्यावर असताना शिष्येच्या बोटाला दुखापत झाली तेव्हा हिराबाईंनी तिची वेणीसुद्धा घालून दिली.

हिराबाईंनी आपल्या शिष्यांना केवळ संगीत शिकविले नाही तर आपुलकीने पाककलाही शिकविली. त्या उत्तम स्वयंपाक करतात. त्यांच्याकडे जाणाऱ्या सर्व विद्यार्थिनीनी गाण्याबरोबर पाकशास्त्रही त्यांच्याकडून आत्मसात केले आहे.

हिराबाईंनी आपल्या शिष्यांना यशस्वी जीवन जगण्याचा मंत्रही शिकविला. तो म्हणजे मानसिक समतोल राखणे. त्यांच्या जीवनात अनेक भल्याबुऱ्या प्रसंगांतून त्यांना जावे लागले. परंतु त्यांचा तोल कुठेही ढळला नाही. रागाने बेभान होऊन कुणावर शिरा ताणताना कुणीही त्यांना पाहिले नाही की परिस्थितीने खचून जाऊन मुळूमुळू रडतानाही त्या कधी दिसल्या नाहीत. हा तोल त्यांनी जन्मभर सांभाळला. जीवनाला एक शिस्त त्यांनी घालून दिली. ती त्यांच्या स्वतःच्या जीवनात त्यांच्या जलशापासून ते दैनंदिन कार्यक्रमातही दिसते.

एखाद्या समर्थ पुरुषालाही लाजवील असे हिराबाईंचे असामान्य कर्तृत्व आहे. तरीही आपल्या स्त्रीत्वाचे भान त्यांनी कायम राखले. स्त्रीत्वाच्या मर्यादा जपल्या, जोपासल्या. रंगमंचावर गाताना असो की घरात वावरताना असो, आपला पदर कायम शालीनतेने अंगभर लपेटलेलाच. आजही वयाच्या ऐंशीव्या वर्षी हे भान सुटले नाही. दृष्टी पैलतीराकडे लागली आहे. तिकडचा एक इशारा जरी झाला तरी बाई उठून जातील—

—पण ते सुद्धा पदर सावरीतच.

अनुक्रमणिका

# परिशिष्ट

अनुक्रमणिका

भारत सरकारतर्फे एक सांस्कृतिक शिष्टमंडळ १९५३ साली चीनला गेले होते. त्यात सतारवादक विलायतत खाँ, कथ्थक नर्तक गोपाळकृष्ण, नर्तकी दमयंती जोशी व चंद्रलेखा, मास्तर कृष्णराव, ज्योत्स्ना भोळे, हिराबाई बडोदेकर, मिळून वीस कलाकार होते. देशाच्या सर्व भागातून हे कलावंतांचे प्रतिनिधि निवडले गेले होते.

हिराबाईंनी या दौऱ्याचा रोजचा कार्यक्रम, आपल्या टिपणींसह, रोजनिशीत लिहून ठेवला आहे. त्यातील महत्त्वाचा भाग, बहुतेक त्यांच्याच शब्दात, पुढे दिला आहे.

हिराबाईंनी आयुष्यभर रोजनिशी लिहिली. त्यांच्या सबंध आयुष्याचा पट या रोजनिशीतून व्यक्त होतो. त्यांनी लिहिलेल्या एकूण २७ रोजनिशा त्यांच्या संग्रही आहेत.

अनुक्रमणिका

# चीनच्या दौऱ्याची रोजनिशी

**ता. ७-७-५३**

पुणे ते मुंबईला सकाळी आठच्या गाडीने मी, बबन व सौ. शोभा असे तिघे निघालो. सकाळी साडे अकराला पोहोचलो. घरी आल्यावर सौ. कुमुदिनी मेथा भेटायला आल्या होत्या. आणि श्री. देसाई.

**ता.८-७-५३**

आज कोलंबिया कंपनीत जाऊन चायनाला नेण्यासाठी बारा रेकॉर्डस माझ्या घेतल्या. त्या चायनातल्या मुख्य आर्टिस्टना देण्यासाठी घेतल्या दुपारी जपानचा विसा घेण्यासाठी तीन वाजता गेले होते. आणि साडेचारला स्टेशनवर पोहोचले. नंतर पावणेसहाला पंजाब मेलने मी व जोत्स्नाबाई दोघी निघालो. स्टेशनवर पोहोचवायला सुंदरराव, सरस्वतीबाई, पापा, निर्मला, बबन, रतन, नलू, भावोजी, मास्तर, मिसेस मास्तर, वामनराव देशपांडे, शंकरराव टिळे, नीला, कुमुदिनी मेथा, देसाई हे सर्व हजर होते.

**ता.९-७-५३**

नंतर मी, जोत्स्नाबाईं न्यु दिल्लीला रात्री नवाला पोहोचलो. न्यु दिल्लीला स्टेशनवर रमेशचंद्र व मिसेस पेरीन रमेशचंद्र, भीसे आणि भास्करराव गोळवलकर आम्हाला घ्यायला आले होते. जोत्स्नाबाईं भीसे यांच्याकडे गेल्या आणि मी जुन्या दिल्लीत गोळवलकरांच्याकडे राहायला गेले.

**ता.१०-७-५३**

आज सकाळी मुनशी निकेतन हाऊसमध्ये मिटींग होती. पीस कमेटीचे अध्यक्ष डॉ. किचलू यांच्या अक्ष्यक्षतेखाली मिटींग होती. त्यात चायनाला गेल्यावर त्यांनी आपले प्रोग्रॅम कसे ठेवायचे व चायनाला आम्हाला कशा प्रकारची ट्रीटमेंट मिळेल या बद्दल सांगण्यात आले व आमच्याबरोबर येणाऱ्या सर्व आर्टिस्टची ओळख करून दिली. आणि नंतर आमचे टुरचे लीडर सेनगुप्ता व सेक्रेटरी करीमऊल्ला यांची ओळख करून देण्यात आली. आज संध्याकाळी सहा वाजता चायना पीस कमेटी तर्फे श्री. डॉ. किचलू यांच्या अध्यक्षतेखाली सर्व आर्टिस्टचा सत्कार समारंभ केला. त्या वेळी श्री. डॉ. किचलू यांचे भाषण झाले. त्या वेळी निरनिराळ्या संस्थेमार्फत हारतुरे आर्टिस्टना घालण्यात आले. किचलुनी आपल्या भाषणात चायनीज लोकांना आपल्या कलेचे महत्त्व दाखवून द्या असे सांगण्यात आले आणि आपल्या हिंदुस्थानात गायन कलेतले हे आर्टिस्टचे कल्चरल डेलीकेशन जात आहे याबद्दल आनंद व्यक्त केला. हा समारंभ टॉऊन हॉल न्यु दिल्लीत झाला. त्याच रात्री नऊ वाजल्यापासून कार्यक्रमाला सुरुवात न्यू दिल्ली स्टेडियम थीएटरांत करण्यात आली. देवोंद्रो विजय, दिलीपकुमार शर्मा, जोत्स्ना भोळे, गोपाळकृष्ण डान्स, मी, दमयंती जोशी, विलायतखां सतार, कार्यक्रम झाला.

**ता. ११-७-५३**

आज सकाळी मी व भास्करराव गोळवलकर मिळून थॉमस कुक कंपनीत जाऊन तीनशे रुपयांचे पौंड करून घेतले. दिल्ली हे हंकांगचा विमानाच्या प्रवासासाठी पन्नास हजाराचा विमा दहा रुपये देऊन काढला. आकरा वाजता मुन्शी नीकेतनमध्ये परत मिटींगला गेलो. मीटींगमध्ये चायनाला गाण्याचे कार्यक्रम कसे ठेवायचे ते मी विलायतखाँ व मास्तर कृष्णराव या तिघांची योजना करण्यात आली. संध्याकाळी चायनीज अंबेसीत पार्टी देण्यात आली. त्या वेळी अंबेसीत दमयंती जोशी व विलायतखांची सतार असे

अनुक्रमणिका

दोन्ही कार्यक्रम पंधरा पंधरा मिनिटे ठेवण्यात आले. रात्री नऊ वाजता स्टेडियम थीएटरात परत कार्यक्रमाला श्री. कृष्णराव मास्तर पासून सुरुवात झाली. पहिल्याने वंदे मातरम् झाले. त्यात मी, मास्तर, जोत्स्नाबाई व दमयंती जोशी इतक्यांनी भाग घेतला. नंतर चंद्रलेखा, देवोंद्रो विजय, दिलीपसींग व मल्याळी आर्टिस्टचा ऑपेरा झाला.

**ता. १२-७-५३**

आज दुपारी जायचे ठरले होते. परंतू विमान आले नाही.

**ता.१४-७-५३**

विमान आले. दुपारी दीड वाजता न्यु दिल्ली इंपीरीयल हॉटेलात सर्वांना नेण्यात आले. तिथून पॉन एअरवाइजची मोटार येऊन सर्वांना पालमवरती नेले. कस्टमची तपासणी होऊन सवा पाचला पॉनवर्ड एअरवाइज विमानांतून दिल्लीहून रवाना झालो. त्या वेळी पालमवर चायना पीस कमेटीचे मुख्य अधिकारी, हरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, भीसे, गोळवलकर, पेरीन रमेशचंद्र व आणखीन बरीच मंडळी होती. नंतर सर्वांचा ग्रुप फोटो काढून आमचे विमान सुटले. एकंदर वीस आर्टिस्ट व एक लीडर आणि एक सेक्रेटरी अशी बावीस जण एकंदर होतो. रात्री साडे आठाला कलकत्त्याला पोहोचलो. परत सवा नऊला निघून रात्री दोनला ब्यँकांगला आलो. तिथून आडीचला निघून सकाळी सातला हंकांगला आलो.

**ता.१५-७-५३**

परंतु आम्ही तिथे उतरल्यावर हंकांगच्या घड्याळात पाहिले त्या वेळी दहा वाजले होते. म्हणजे तीन तासांचा फरक पडला. कस्टम तपासणी होऊन ११॥ वाजता आम्ही कोवलुन हॉटेलात गेलो. कोवलून हे गाव हंकांगच्या समोरच आहे. फक्त मध्ये एक लहानशी तर आहे. त्या दिवशी तिथेच मुक्काम होता.

**१६-७-५३**

कोवलुनहून साडे दहाला क्यानटनला जाण्यासाठी सर्व जणं स्टेशनवर आलो. रेल्वे प्रवास सुरू झाला. १२॥ ला लोबूला आलो. लोबुपर्यंत ब्रिटिश हद्द आहे. तिथून गाडी बदलावी लागली. तिथे आमच्यासाठी स्पेशल डबे ट्रेनला ठेवण्यात आले होते. आम्हाला घ्यायला त्यांच्या कमेटीतर्फे दोन पुरुष व तीन मुली आल्या होत्या. आम्ही दीडला लोबुहून निघून ४॥ ला कँटनला पोहोचलो. कँटनला आमच्या स्वागताची तयारी होतीच. कँटन पीस कमेटीतर्फे त्यांचे मुख्य अधिकारी व मुली मिळून जवळ जवळ पन्नास साठ माणसे स्टेशनवर तुरे घेऊन हजर होते. नंतर सर्व आर्टिस्टना फुलांचे तुरे देऊन स्वागत करण्यात आले. रात्री पीस कमेटीतर्फे डीनर पार्टी दिली. त्या वेळी पीस कमेटीचे चेअरमन व आमचे लीडर व वल्लाथावल यांची भाषणे झाली. त्यात एकमेकांचे आभार मानले. स्टेशनवर फोटो काढण्यात आले.

**१७-७-५३**

सकाळी ब्रेकफस्ट झाल्यावर पेकींगला प्रोग्राम कसे ठेवावेत व तीन तासात कसा प्रोग्राम सर्वांचा बसवता येईल याबद्दल मीटींग झाली. त्यात चंद्रलेखा, सुरेंद्रकौर, देवेन्द्र विजय आणि दोन तीन आर्टिस्ट वंदेमातरम् म्हणण्याबद्दल विरुद्ध होते. परंतु आमच्या बाजूने मते जास्त पडल्यामुळे त्यांना गप्प बसावे लागले. आज दुपारी तीन वाजता कँटन गाव दाखविण्यासाठी सर्वांना नेले. आज रात्री आठला क्यानटनचे लोकल आर्टिस्टनी गाण्याचे व वाद्ये वाजवण्याचे कार्यक्रम ऐकवले. चायनीज लोक मात्र प्रेमळ आहेत.

अनुक्रमणिका

आम्ही कँटन स्टेशनवर उतरल्यावर सर्व मुलींनी आम्हाला चायनीज राष्ट्रगीत म्हणून दाखविले. आम्ही तिघांनी म्हणजे मास्तर, मी व जोत्स्नाबाई यांनीही आमचे वंदेमातरम् गावून दाखविले. क्यानटनला नदी आहे. त्याचे नाव चुंकीया आहे.

**१८-७-५३**

कँटनहून सकाळी आठला निघून पेकींगला जायला स्टेशनवर आलो. आमची गाडी साडेआठला सुटली. आज संबध दिवस गाडीत होतो.

**२०-७-५३**

रात्री आकरा वाजता पेकिंगला पोहोचलोत. नंतर गाडी थांबल्यावर पाच मिनिटे थांबून आम्हाला उतरायला सांगितले. आमचे तिथे स्टेषनवर स्वागत करायला दोनशे मंडळींचा समुदाय होता. नंतर मुलींकडून तुरे देण्यात आले. आणि स्वागत करून पीस हॉटेलात आणले. स्टेशनवर पीस कमेटीचा मुख्य चेअरमन आले होते. फोटो घेण्यात आले.

**२१-७-५३**

आज सकाळी साडेनऊ वाजतां पेकींगच्या चेअरमन बरोबर पेकींग व इतर गावी कसे कसे कार्यक्रम ठेवले आहेत ते पीस कमेटीच्या चेअरमनने सांगितले. मीटींगला चेअरमन, त्यांच्या इंटरप्रीडर व मी, विलायतखा. मास्तर व करीमऊल्ला इतके जण होतो. एकंदर ता. २६-८ आगस्ट पर्यंतचा सर्व कार्यक्रम आटोपून आम्ही दिल्लीला साधारण ता. २८-८ ला पोहोचु असे सांगण्यात आले.

दुपारी एक वाजता लंच झाल्यावर दुपारी साडेतीन वाजता टेंपल ऑफ हेवन पाहायला गेलो. पहिल्याने म्युझीयम पाहिले. त्या नंतर टेंपल ऑफ हेवन पाहिले. त्यानंतर टेंपलच्या समोर शेजारी दुसरे टेंपल आहे, त्याच्या बाहेर बाजुने गोल भींत बांधलेली आहे. त्या भींतीच्या कोणत्याहि भागाने बोलले म्हणजे त्या भींतीच्या दुसऱ्या समोरच्या बाजूने बोललेले ऐकायला येते. आगदी हळू बोललेले ऐकायला येते. त्यानंतर त्याच देवळासमोर टेंपल ऑफ सन पाहिले. टेंपल ऑफ सन मधे एक दगड आहे. तीथे उभे राहून टाळी वाजवल्यास दोनदा टाळी वाजवल्याचा भास होतो. रात्री आठ वाजतां चायना पीस कमेटी तर्फे पीस हॉटेलात डीनर पार्टी देण्यात आली. त्यावेळी आमचे लीडर सेनगुप्ता आणि वल्लाथावल यांनी भाषणे केली. पहिल्याने पीस कमेटीचे मुख्य अध्यक्ष यांचे भाषण झाले. त्यानंतर आमचे लीडर बोलले. आमच्या टेबलांवर माझ्याबरोबर त्यांचा एक प्रोफेसर, एक डॉन्सरबाई एक डॉक्टर व एक वर्तमानपत्राचा एडिटर व इंटरप्रीडर चायनीज बाई होती. त्या नंतर दहाला सर्व कार्यक्रम आटोपला.

**२२-७-५३**

पेकींग. सकाळी दहा वाजता आज ब्रेकफस्ट झाल्यावर दाखविण्यासाठी व नवीन पेकींग चायना वस्ती बसवीली ती दाखविण्यात आली आणि जुने पेकींग चायना शहर दाखविले. त्यात जुने चायना अतीशय सुंदर आहे. जुने वाडे, देवळे, वगैरे अप्रतीम पाहाण्यासारखे आहे. आम्हा सर्वांना मोटारने नेण्यात आले. आमच्या मोटारचा नंबर तीन होता. त्यात फक्त मी व मास्तर व विलायतखां इतकी जणे बसण्याची परवानगी होती व आमच्या बरोबर इंटरप्रीडर एक चायनीज गर्ल असायची. बारा वाजता परत पीस हॉटेलात आलोत.

अनुक्रमणिका

आज मीस्टर सहस्त्रभोजने आणि त्यांच्या मिसेस भेटायला आल्या होत्या. आज आम्हाला दोनशे रुपये पॉकीट मनी म्हणून देण्यात आले. चायना पीस कमेटी तर्फे दिले. आज संध्याकाळी ७॥ वाजता ल्युथ पॅलेस—थीएटरचे नांव—तिथे रात्री आठ वाजल्यापासून साडे आकरा पर्यंत एकंदर सर्व कार्यक्रम तीन तासांत व्हावा एवढ्यासाठी रीहलसल झाली. आज चंद्रा आणि सुरेन्द्र कौर या दोघी जणींची पडश्यामुळे प्रकृती बिघडली होती. त्यामुळे त्या दोघींनी रीहलसलमधे भाग घेतला नाही.

**२३-७-५३**

पेकींग. आज १० सकाळी फुगीड पॅलेस पहायला गेलो होतो. तीथे लहानसे प्रदर्शन ठेवले आहे ते पाहिले. दुपारी कौन्सीलर गोवर्धनकडे आम्हाला जेवायला बोलावले होते. ते स्वतः आम्हाला न्यायला आले होते. मी, जोस्नाबाई, दमयंती जोशी, कृष्णराव मास्तर, मधुकर गोळवलकर, माधव इंदुरकर इतक्या महाराष्ट्रीय मंडळींनाच जेवायला बोलावले होते. तीथे त्यांच्याकडे श्री. सहस्त्रभोजने व त्यांच्या मिसेस, एक चायनीज बाई आणि श्री. गोवर्धन व त्यांच्या मिसेस व सप्रानी इतकी मंडळी जेवायला होती. त्यानंतर आमचे फोटो काढून घेण्यात आले. दुपारी तीन वाजता परत आलो.

परत चार वाजता पीस कमेटीच्या मोटारींतून आम्ही महाराष्ट्रीय सहा जणं व मिसेस सहस्त्रभोजने असे मिळून मार्केटींग पहायला गेलो. मनीबॅग वगैरे खरेदी केली. यांच्या इकडे आपले तीन आणे म्हणजे एक हजारची नोट देतात. तेव्हा कुठली साधी वस्तु जरी घेतली— ऊदाहरणार्थ एक रुमाल जरी घेतला— तरी त्याची किंमत इथे दोन हजार, तीन हजार अशी आहे. दहा हजार म्हणजे एक रुपया. तेव्हा हिशोब करतांना फारच गंमत वाटली. इथे नाणे आजीबात नाही. तीथून संध्याकाळी पांच वाजता परत आलो.

सात वाजता आज आमच्या कार्यक्रमाला सुरवात आहे. त्याप्रमाणे रात्री आठ वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. पहिल्याने पीस कमेटीचे अध्यक्षांचे भाषण झाले. नंतर आमचे लीडर सेनगुप्ता यांनी भाषण केले. त्यानंतर वंदेमातरम्ला सुरवात झाली. मी, मास्तर, जोत्स्नाबाई, दमयंती, इतक्यांनी वंदेमातरम् म्हंटले. नंतर तबला वादक व त्यानंतर मास्तरांचा कार्यक्रम. त्या नंतर नकला. नंतर माझा कार्यक्रम, दमयंती जोशी, विलायतखां, फोक सॉंग, दिलीपसींग, फोकसॉंग, जोत्स्नाबाई, गोपालकृष्ण, देवेंद्रबाबु, चंद्रलेखा, कथकली डान्स, मलबारी. प्रोग्रॅम बाराला बंद झाला.

**२४-७-५३**

आज सकाळी ब्रेकफस्ट झाल्यावर इंपीरिअल पॅलेस पाहायला गेलोत. दोन हजार वर्षांपुर्वीच्या वस्तुंचे प्रदर्शन मात्र अप्रतीम बघण्यासारखे आहे. पॅलेसला सात चौक आहेत. व प्रत्येक चौक ओलांडल्यावर पहिल्या महाल इतकेच दुसरा महाल मोठा आहे. एक वाजता परत आलो. दुपारी काचेचे पक्षी व कापसाचे पक्षी घेतले. रात्री नऊ वाजता सीनेमा दाखविला. त्यात मागल्या वर्षी डेलीकेशन गेले होते ते दाखविले.

**२५-७-५३**

आज सकाळी ब्रेकफस्टनंतर पेकींगमधले डॉन्सर व गाणारे भेटायला आले होते व आमच्या गाण्याविषी माहिती घ्यायला आले होते. त्यांना मी, विलायतखां, मास्तर, जोत्स्नाबाई, माहिती दिली. आणि दमयंतीने नाचाची माहिती दिली. परंतु आपल्या हिंदूस्थानी गायन कलेपेक्षा त्यांची कला अतीशयच मागे आहे. परंतु प्रयत्न मात्र करताहेत. आम्ही त्यांना काही रागांची माहिती दिल्यावर थोडेसे गळ्यानाही

अनुक्रमणिका

म्हणून दाखविली. त्या नंतर तुम्ही आम्हाला तुमच्या गाण्याची माहिती द्या असे सांगितले. तेव्हा त्यांनी उत्तर दिले की मी आता त्या तय्यारीने आलो नाही. परंतु संध्याकाळी ऐकवीन. नंतर ती मंडळी गेली. आज दुपारी चार वाजता नॅशनल क्लब मध्ये इथल्या सर्व म्युझीक असोशियन तर्फे पार्टी देण्यात आली. पहिल्याने आभार मानण्यात आले. नंतर सर्व म्युझिशीयन बरोबर एकमेकांच्या संगीताविषयी विचारण्यात आले. त्यानंतर दोन तीन गाणी त्यांनी म्हणून दाखविली. त्यांच्या गाण्यात दोन तीन राग आहेत. भूप, दुर्गा, जीवनपुरी, हे तीन आपल्या रागाशी त्यांचे राग जमतात त्यानंतर डीनरपार्टी झाली. त्यानंतर तिथेच चायनीज लोकांनी शक्तीचे प्रयोग करून दाखविले. मात्र प्रयोग फारच आप्रतीम करून दाखविले. त्यानंतर प्रोग्रॅम संपला.

**२६-७-५३**

पेकींग. आज सकाळी ब्रेकफस्ट नंतर लामा टेंपल सकाळी दहा वाजता पाहून आले. आज दुपारी एक वाजता श्री. सप्रानी–एंबेसीमध्ये असलेले ऑफीसर–यांच्याकडे जेवायला गेलो. आम्ही सर्व महाराष्ट्रीय आणि विलायतखां, सुरेंद्रकौर, सेनगुप्ता, इतके नऊ मंडळी जेवायला गेलो होतो.

आज आठ ते दहा दोन तासांचा कार्यक्रम पीस कमेटीच्या मुख्य आफिसरना दाखविण्यात आले. संध्याकाळी सात वाजता गुप्ता, वल्लाथावल, मी व विलायतखां, करीमऊल्ला येवढ्यांना मावासा टुंम कडे आम्हाला भेटायला बोलावले. दहा मिनीटे आम्ही तीथे होतो. त्यानंतर बरोबर आठला कार्यक्रमाला सुरवात झाली. दहाला भावसाटुं बरोबर फोटो काढला आहे. कार्यक्रम संपला. मावसा टुंम हजर होते. नंतर फुलांचे सर्व आर्टिस्टना तुरे देण्यात आले. चंद्रलेखा, कौर आणि मास्तर यांना फार वाईट वाटले. कारण मावसा टुंम कडे त्यांना जाता आले नाही म्हणून.

रात्री साडे दहाला चाऊ एन् लाय प्रायमीनीस्टरकडे डीनर पार्टी झाली. त्यावेळी स्वतः प्रायमीनीस्टर यांचे भाषण झाले आणि त्यानंतर आमच्या लीडर गुप्ताचे भाषण झाले. व नंतर कांग्रेसचे आपले मुख्य ॲबेंसर (ॲम्बॅसिडर) राघवन यांचे भाषण झाले. व त्यात त्यांनी कोरीया आणि चायनाची लढाई संपून उद्या दहा वाजता करारनाम्यावर सह्या होणार याबद्दल आनंद व्यक्त केला. व त्यात आमचे हिंदुस्तानचे डेलीकेशनचा आजच सर्व अधीकारीसाठी कार्यक्रम इथे होता व त्याच दिवशी आनंदाची बातमी आली, याबद्दल आनंद व्यक्त केला. त्या नंतर पार्टी समारंभ संपला. डीनरच्या वेळी फील्म घेतली आहे.

**२७-७-५३**

आज ब्रेकफस्टनंतर पेकींगची युनर्व्हसीटी पाहायला नेले होते. कॉलेजातल्या मुलामुलीने आमचे स्वागत फारच छान केले. आम्ही मोटारींतून उतरल्यावर सर्वांनी त्यांचे राष्ट्रगीत गावून दाखविले. नंतर प्रोफेसर प्रींसीपॉल यांनी युनर्व्हसीटी दाखवून चहा पार्टी देण्यात आली. व नंतर कॉलेजच्या चेअरमनचे भाषण झाले. नंतर गुप्ता बोलले व त्या नंतर सर्व आर्टिस्टना आप आपल्या भाषेत आभार मानावे म्हणजे आम्हाला निरनिराळ्या भाषा ऐकायला मिळतील. नंतर प्रथम मी सुरवात केली व सर्वांचे आभार मानले. त्या प्रमाणे सर्व आर्टिस्टनी आपआपल्या मातृभाषेत भाषण केले. चायनीज लोकांना ते ऐकून फारच गंमत वाटली. नंतर तिथे एक प्रोफेसर वर्मा युपीचा आहे. त्यांनी सांगितले की चाळीस विद्यार्थी सध्या हिंदी शिकत आहेत. त्यानंतर आम्ही दोनला घरी आलो. त्या नंतर श्री. खडसे यांच्याकडे फक्त महाराष्ट्रीयांना जेवणाची पार्टी देण्यात आली. त्या नंतर फोटो काढून घेतले. साडेचारला परतलो. सात वाजता आज तीसरा

कार्यक्रम पॅलेस थिएटरात होता. तो रात्री आठाला सुरवात होऊन आकराला संपला. नंतर जेवण झाले. आज कार्यक्रमाच्या वेळी फील्म घेतली.

**ता. २८-७-५३**

ब्रेकफस्टनंतर समर पॅलेस पाहायाला दहा वाजता, ७०० वर्षांपूर्वीचा पॅलेस, सर्व जण गेलो. समर पॅलेस हा पहिल्या जमान्यात राजे लोक उन्हाळ्यात त्या पॅलेसमधे राहायला जात असत. पॅलेस फारच मोठा आहे. आणि डोंगरावर तिथेच एक महाल व बुद्धाचे मंदिर आहे. आणि वाड्याच्या एका बाजूला मोठा तलाव आहे. तिथे बोटिंग करतात. आम्हाला समर पॅलेस मध्येच जेवणाची पार्टी दिली. चायनीज पद्धतीचे जेवण केले होते. त्यानंतर तीन वाजता बोटिंगला सर्वजण गेलो. त्यानंतर चार वाजता सर्व जण परत फिरलो.

संध्याकाळी सात वाजता पीस कमेटीतर्फे सर्वांना बक्षिसे देण्यात आली. मला नऊवार सील्क चायनीज दिले व पेकींगची सीनसीनरी व काही पेंटिंग फोटो देण्यात आले. रात्री आठ वाजल्यापासून पेकींगच्या सर्व ऐक्टर लोकांनी ऑपेरा करून दाखविला. साडेअकरा वाजता कार्यक्रम संपला. कार्यक्रमाच्या वेळी आजही फील्म घेतली.

**ता. २९-७-५३**

आज ब्रेकफस्ट नंतर इथल्या मुख्य ऐक्टरनी आपल्या घरी सर्वांना चहा पार्टी दिली. त्या वेळी पहिल्याने ऐक्टर लोकांची परिस्थिती कीती वाईट होती ती हकीकत सांगितली व आता परीस्थिती सुधारल्यावरचीही हकीगत सांगितली. नंतर सर्वांचे आभार मानण्यात आले. व आम्ही लंचसाठी परत आलो. माझी एक्टरला एक रेकार्ड दिली. दुपारी थोडेसे शॉपींग केले. आज रात्री कार्यक्रम झाला. त्या वेळी पेकींगच्या आर्टिस्टकडून बक्षीसे वाटली गेली. ज्यांच्या घरी सकाळी गेलो होतो त्याचे नाव युव्हॅन शूंहाय व ऐक्ट्रेसचे नाव टुंचीन कां.

**३०-७-५३**

आठला चायनीज गाण्याचे, नाचाचे व आर्केस्ट्राचे कार्यक्रम साडेदहा पर्येत झाले. त्यांचा नाच आपल्याकडील कथ्थकी डान्स बरोबर बराच जमतो. आज त्यांच्या गाण्यात व वाजवण्यात मालकंस, धानी, जीवनपुरीचे स्वर व रागही जमत होते. परंतु जास्त प्रचारात भूप व दुर्गा येतो.

**ता.३१-७-५३**

आज सर्व लोकं ग्रेट वॉल पाहायला गेली. मी व जोत्स्नाबाई व आणखीन चार पाच जण गेलो नाहीत. जेवण झाल्यावर पाच दहा मिनिटाने सौ. जोत्स्नाबाईच्या पोटात अतीशय दुखून एकाएकी तबेत बिघडली. त्यानंतर त्यांना हॉस्पीटलात दाखल केले. त्या वेळी मी व परांजपे बरोबर गेलो होतो. दुपारी २॥ वाजल्यापासून सात वाजेपर्यंत पोटात दुखले. त्या नंतर कमी झाले. मी रात्री आठ वाजता हॉस्पीटलांतून परत आले.

**१-८-५३**

आज ब्रेकफस्ट झाल्यावर मीटींग झाली. त्यात रंगुनला व हंकांगला बोलावणे आले असल्याचे सांगितले व प्रत्येकानी तिथे जायल तयार असल्याचे कळविले.

अनुक्रमणिका

त्यानंतर जोत्स्नाबाईंना हॉस्पिटलात भेटून आम्ही मिसेस गोवर्धन बरोबर मिसेस राघवनकडे इंडियन अंबेसीत भेटायला गेलो. त्यांची भेट झाली. त्यांना माझी व जोत्स्नाबाईंची अशा दोन रेकॉर्ड बक्षीस दिल्या. त्यानंतर परत पीस हाटेलात येऊन साडेबाराला टेन्सींगला जायला स्टेशन वर आलोत. स्टेशनवर ज्योत्सनाबाई व दमयंती जोशी मागे राहिल्या. आमचे मोठे स्वागत करण्यात आले. पोहोचवायला पीस कमेटीची सर्व अधिकारी मंडळी होती व आर्टिस्ट हजर होते.

सव्वाला गाडी सुटली व साडेतीनला गाडी टेन्सींगला पोहोचली. स्टेशनवर स्वागत करायला टेन्सींग पीस कमेटीचे सेक्रेटरी व बाकीचे काही मेंबर तय्यार होते. नंतर तिथे परत फुलांचे गुच्छ देऊन टेन्सींग हॉटेलात रवानगी केली. हॉटेलात चहापाणी होऊन आपल्या आपल्या नंबराप्रमाणे रूम दाखविण्यात आल्या. संध्याकाळी साडेसातला टेन्सींग क्लबमध्ये पीस कमेटी तर्फे डीनर पार्टी झाली. त्यावेळी पीस कमेटीतर्फे आज पेकींग आर्टिस्टांच्या कडून आम्हा सर्व आर्टिस्टना बक्षिसे वाटली. त्यात मला फोटोचे एक पुस्तक नाटकातल्या मेकअप मधले मिळाले.

पेकींग पासून आमच्या जाण्या येण्याची व्यवस्था पहिल्या नंबरच्या मोटारीत वल्लाथावल व त्यांचे चिरंजीव, दुसऱ्या नंबरच्या मोटारीत लीडर व सेक्रेटरी, तीसऱ्या नंबरच्या मोटारीत मी व विलायतखाँ, व चौथ्या नंबरच्या मोटारीत कृष्णामास्तर आणि चायनीज गर्ल व त्यानंतर बाकीच्या आर्टिस्टना एक मोठी बस ठेवली होती. मोटारी नंबरवारी सोडत असत. आज टेन्सींगलाही तीच व्यवस्था होती.

**२-८-५३**

आज दुपारी साडेतीन वाजता जेंइन्ली कईल मील वुलनची पाहायला गेलो होतो. फारच छान फॅक्टरी होती. रात्री आठ वाजता आज चुंको थिएटरात आमचा कार्यक्रम झाला. अकराला संपला.

**ता. ३-८-५३**

आज ब्रेकफस्टनंतर म्युझीक अकेडमी पाहायला सकाळी दहा वाजता गेलो. तीथल्या आर्टिस्टनी आम्हाला गावून व वाद्ये वाजवून दाखविली. त्यातल्यात्यात चाँग म्हणून एक मोठे वाद्य होते ते सरोदप्रमाणे वाटते. ते तिथल्या म्युझिकच्या प्रोफेसरनी वाजवून दाखविले. त्यांत इकडील श्याम कल्याण राग होता. त्यांच्याकडील काय राग आहे ती कल्पना नाही. त्यांच्याकडे रागाला नावे नाहीत. त्या म्युझीक स्कूलला मी एक माझी रेकार्ड दिली.

टेन्सींग हे शहर अगदी लंडन सारखे आहे. रात्री आठ वाजता सर्व टेन्सींग शहर दाखवून नऊ वाजता ऑपेरा दाखवायला आम्हाला नेले. टेन्सींगच्या सर्व आर्टिस्टनी तीन नाटिका करून दाखविल्या. ‘बुद्धाज क्वाईन’ नाटक करून दाखविले.

**ता. ४-८-५३**

आज रात्री आठ वाजता परत चुंको थिएटरात आमचा कार्यक्रम झाला. आज दुपारी पाच वाजता पेकींगला रेडियोत माझे व मास्तरांचे रेकार्डिंग केलेले वाजलेले ऐकले.

**ता. ५-८-५३**

म्युझीक अकेडमीतर्फे टेन्सींग हॉटेलात सकाळी साडे दहा ते साडे अकरापर्यंत डीनर पार्टी दिली. त्या वेळी अकेडमीच्या काही आर्टिस्टनी वाजवून व गाऊन दाखविले. त्यानंतर त्यांनी आम्हांला विनंती केली की आपण काहीतरी आम्हाला ऐकवा. त्यानंतर आमच्या आर्टीस्टपैकी सुरेंद्रकौर आणि देवेन्द्रो विजयने दोघांनी मिळून एक फोक साँग, श्री. हरेंद्रनाथ चटोपाध्यायनी तैयार केलेले, 'हिंदी चीनी भाई भाई' हे गाणे म्हणुन दाखविले व त्यानंतर मी त्यांना भीमपलासी मधली एक हिंदुस्तानी चीज म्हणून दाखविली. त्यानंतर समारंभ संपला व आम्ही नॅकींनला जाण्यासाठी १२॥ ला सर्व जणं स्टेषनवर गेलो. तिथे सर्व आर्टिस्ट व पीस कमेटीचे अधिकारी मंडळी आम्हाला निरोप द्यायला स्टेषनवर आले होते. तिथे परत सर्वांना तुरे देऊन आमचे आभार मानले व एक वाजता आमची ट्रेन सुटली. ट्रेन स्पेशल होती.

**ता. ६-८-५३**

दुपारी साडेबाराला यांगसी नदी आली. त्या नदीतून त्यानंतर आमची ट्रेन आगबोटीवरून नँकीनला आणून सोडली. या गोष्टीला दीड तास लागला. बरोबर दोनला नँकीगला आलोत. नँकीनला परत पीस कमेटी तर्फे स्टेशनवर तुरे देऊन स्वागत करण्यात आले आणि नँकीन हॉटेलात उतरण्याची व्यवस्था केली. रात्री आठाला पीस कमेटीतर्फे डीनर पार्टी देण्यात आली. पार्टी नँकीन हॉटेलातच देण्यात आली. त्यावेळी नँकीन पीस कमेटीचे व्हाइस प्रेसीडेंड यांनी डेलीकेशनचे आभार मानले व त्यानंतर आमचे लीडर व वल्लाथावल यांची भाषणे झाली. भाषणानंतर चायनीज कवीने आपण एक काव्य केलेले म्हणून दाखविले व काही चायनीज आर्टिस्टनी एक एक गाणे म्हणून दाखविले व त्या नंतर आम्हा गाणाऱ्या आन्टिस्टना गाणे ऐकवण्याची विनंती केली. त्या प्रमाणे सुरेंद्रकुवर, मास्तर कृष्णराव, मी, देवेद्रआप्पा, दिलीपकुमार, चीदाबरम या सर्वानी एक एक गाणे म्हणून दाखविले.

**ता. ७-८-५३**

आज सकाळी डॉ. संम्यात शॅन यांचे स्मारक पाहिले. आज रात्री आमचा कार्यक्रम झाला.

**ता. ८-८-५३**

सकाळी डॉ. सन्यातसेनचे स्मारक पाहिले. आकरा वाजता. स्वातंत्र्ययुद्धात लाखो लोक च्यांक्याशेकच्या राज्यात मारले गेले. त्यांचे युथाय फाय नावाचे स्मारक पहायला गेलो व नंतर म्युझीयम पाहिले. त्यात पेंटींग फार चांगले होते. आज इथल्या आर्टिस्टचा ऑपेरा पाहिला. हा प्रयोग सामाजिक होता. परंतु फारच छान करून दाखविला.

**ता. ९-८-५३**

आज रात्री आठ वाजता आमचा कार्यक्रम झाला. आम्हा सर्वाना प्रत्येकाला एक एक डबी बक्षीस दिली. त्यात तीन फोटो व युद्धात वारले त्या ठिकाणचे बारीक बारीक दगड रंगीबेरंगी आठवण म्हणून दिले.

**ता. १०-८-५३**

आज सकाळी साडेसातला शांघायला जाण्यासाठी स्टेषनवर गेलोत. स्टेषनवर पीस कमेटीचे अधिकारी व नँकींगचे आर्टिस्ट स्टेशनवर पोहोचवायला आले होते. सर्वांना तुरे देऊन निरोप देण्यात आला. आठला आमची गाडी सुटली आणि दुपारी दीडला आम्ही शांघायला येऊन पोहोचलो. आमचे स्टेशनवर

मोठे स्वागत करण्यात आले व च्यांगचींग हॉटेलात आम्हाला ऊतरवले. हे हॉटेल सोळा मजल्याचे आहे. मला, जोत्स्नाबाईंना व दमयंतीला मिळून एक रूम दिली. आम्ही आठव्या मजल्यावर राहात होतो.

९०८ खोली नंबर होता. आणि आकराव्या मजल्यावर जेवायला डायनींग रूममध्ये जात असे. आज संध्याकाळी पांच ते सात वाजेपर्यंत शांघाय शहर दाखविले. आणि रात्री शांघाय पीस कमेटी मार्फत डीनर पार्टी दिली. त्या वेळी तिथल्या चेअरमननी आमचे सर्वाचे आभार मानले व त्यानंतर आमच्या लीडरनी छोटेसे भाषण केले व समारंभ संपला.

**ता. ११-८-५३**

आज बबन व पापाला पत्र लिहिले. सकाळी शांघायच्या एका मोठ्या आथरचे लूसींग त्यांचे स्मारक पहिल्याने दाखविले व नंतर त्याचे राहायचे घर व नंतर त्याची लायब्री दाखविली. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची लायब्री होती. लायब्री फारच मोठी होती. दोन हजार पुस्तके लिहिलेली व ठिकठिकाणी ज्या गावी गेले तिथले त्यांचे फोटो होते. एका फोटोत ते स्वतः व बर्नाड शॉचा फोटो आहे. नंतर आम्हा सर्वांचा त्यांच्याच घरासमोर फोटो काढून घेण्यात आला. आज रात्री इथे मॅजीस्टीक थीएटरात कार्यक्रम झाला. त्यात इथल्या व्हाइस प्रेसीडेंट स्युनीयात सॅन आल्या होत्या. त्या चांकाय शेकच्या मेव्हणी आहेत. त्यांनी आपल्याला कार्यक्रम फारच आवडल्याचे सांगून पाठविले. आज लायब्ररी पाहिली. तीथे लुसींग आथरचा फोटो आम्हाला देण्यात आला व प्रोग्रॅम आठ ते बारा पर्यंत झाला. शांघायला एक चोवीस मजली घर पाहिले. तिथे हॉटेल आहे.

**ता. १३-८-५३**

आज तीन वाजता इथल्या म्युझीकल अकडेमीचे सर्व प्रोफेसर भेटायला आले होते. त्या सर्व आर्टिस्टची व आम्हा सर्व आर्टिस्टची ओळख करून दिली. नंतर सर्व त्यांच्या आर्टिस्टनी आपआपले निरनिराळे, म्हणजे गाणारे, आर्टिस्ट, नाचणारे व वाद्ये वाजविणारे आणि नाट्य याबद्दल प्रत्येकानी आपआपल्या व्यवसायाच्या आर्टिस्ट बरोबर चर्चा केली. त्या वेळी तिथल्या प्रोफेसर यांनी आम्हाला पहिल्याने माहिती दिली. त्यांनी सांगितले की मुळचे आमच्यात संगीत नव्हते, ते जपान, इंग्लीश राज्यातून आमच्याकडे चालत आले. त्यामुळे संगीतावर पुष्कळशी त्या गाण्याची छाप आहे. दुसरे आम्हाला संगीत जास्त वाढविता आले नाही. याला कारण आमचा देश त्या वेळी लढाईत तोंड देण्यात असायचा. त्या कारणाने संगीताबद्दल काळजी घ्यायला वेळच मिळत नसे. दुसरे आम्ही कुठेतरी लांब जंगलात जाऊन प्रॅक्टीस करायची. कारण गावात प्रॅक्टीस करायची सोयच नव्हती. लढाईमुळे सर्व लोक नेहमी काळजीत असत व आमच्या सारख्यांनी प्रॅक्टीस केलीली कुणाच्या कानावर पडले की त्यांना वाटायचे, या घरात लग्न समारंभ असावा. आश्या परिस्थितीने आमचे संगीत मागासलेले आहे.

नंतर त्यांनी आपल्या गाण्याची काही माहिती दिली. आता इथे मुझीकल अकेडमी नावाची संस्था स्थापन केली आहे. त्यात सकाळी नऊ ते बारा पर्यंत व दुपारी तीन ते पाच पर्यंत मुलांना गाणे, वाद्ये वाजवीणे, पियानो, डान्स इतक्या गोष्टी शीकवण्याची व्यवस्था केली आहे. ह्याला पाच वर्षाचा कोर्स त्यांनी ठेवलेला आहे. शाळेत सहा प्रोफेसर आहेत. नंतर आम्हीही त्यांना आमच्या संगीताची माहिती दिली व थोडीशी तालांची माहिति करून दाखविली व गावून रागांचीही माहिती दिली. त्या वेळी मी, विलायतखां, जोत्स्नाबाई, मास्तर कृष्णा, गोळवलकर, सुरेंद्रकुवर, मूर्ती, दिलीपकुमार शर्मा, देवेंद्रो विजय, माधव इंदुरकर इतके होतो

अनुक्रमणिका

**ता. १४-८-५३**

शांघाय : आज मीलांन फॉन कडे सर्व जण गेलो. त्याच्याबरोबर फोटो काढला. आज सकाळी ब्रेकफस्ट नंतर व्हाइट हेअर गल चायनीज सीनेमा दाखविला. नंतर दुपारी तीन वाजता रेडीओ स्टेशनवर मी एकटीच गेले व बाकीची मंडळी फील्म स्टुडीयोत गेले. रेडीओत मोठ्या सील्कचा फलक आणून त्यावर माझी सही घेतली. रेडीओत गाणारे आर्टिस्टने गावून दाखविले व त्यानंतर मला त्यांनी एक गाणे म्हणायला सांगितले. तेव्हा मीही त्यांना एक चीज म्हणून दाखविली. त्यानंतर त्यांचेही चायनीज गाणे म्हणून दाखविले. आज कार्यक्रम झाला. मॅजीस्टीक थीएटरात माझे कार्यक्रमाचे वेळी रेडिओने रेकार्डिग करून घेतलेली ठुंबरी मला ऐकवली.

**ता. १५-८-५३**

आज ब्रेकफस्ट नंतर दहा वाजता डॉ. सन्यात सोंन यांचे राहाते घर पहायला गेलो होतो. सकाळी तिथे एक त्यांच्या घरात सर्व आर्टिस्टचा मिळून फोटो त्यांनी घेतला आहे. नंतर आम्ही सर्व जण शॉपिंगला गेलो. त्या नंतर हंचावला जाण्यासाठी सामानाचे पॅकिंग करून सामान तय्यार ठेवले. नंतर दुपारी चार वाजता शांघाय आर्टिस्टनी चहा पार्टी दिली. त्यावेळी आमचे फार मोठे स्वागत केले. बॅन्ड वगैरे वाजवून आम्हाला लग्नाच्या वरातीत नेतात त्याप्रमाणे फाटकापासून हॉलपर्यंत नेले. तिथले जवळ जवळ ५० एक आर्टिस्ट होते. त्यांच्या आर्टिस्टनी काही गाण्याचे, काही डान्स व नकलांचा प्रोग्राम करून दाखविला. त्यात डांसच्या आवाजाची नक्कल अप्रतीम केली. त्यानंतर आमच्या डेलीकेशन मधल्या काही आर्टिस्टनी गावून व डान्स करून दाखविले. त्या नंतर हिंदी चीनी भाई भाई हे चटोपाध्यायनी केलेले गाणे देवोंद्रो वीजयनी म्हणून दाखविले. त्यावेळी त्या सर्वांना इतका आनंद झाली की ते आम्हा सर्वांचा हात धरून हिंदी चीनी भाई भाई म्हणून नाचू लागले व आमच्या लीडरला त्या लोकांनी खांद्यावर घेतले व नाचू लागले. खूप गंमत वाटली. नंतर सात वाजता समारंभ संपला. रात्री नऊच्या गाडीने हंचावला जायला निघालो. हँचावला रात्री एक वाजता पोहोचलो.

**ता. १६-८-५३**

ग्रँट हॉटेलमध्ये ऊतरलो. हँचाव. सकाळी ब्रेकफस्टनंतर चायनीज गार्डन व तिथले बुद्धाचे देऊळ त्याचे नाव आहे ते पाहिले. चायनीज गार्डनमधे गुहेसारखे दगड रचून त्यांतून लहान लहान झरे ठेवले आहेत. फारच नवीन तऱ्हेचे वाटले. दुपारी शॉपींगला गेलोत. बबनसाठी कापड व सीन, छत्री वगैरे घेतले. रात्री हँचावला आमचा कार्यक्रम झाला. कौंनसील हॉलमध्ये.

**ता. १७-८-५३**

आज दुपारी जेवण झाल्यावर हंचाव पीस कमेटी तर्फे सर्व आर्टिस्टना बक्षीसे देण्यात आली. बक्षीसे एक छत्री, एक चंदनी पंखा, एक मोठा सीन, दोन लहान सीन आणि एक फाऊंटन पेन व मेलानफॉनचा फोटो शांघाय पीस कमेटीतर्फे देण्यात आला. दुपारी हँचावला तिथल्या आर्टिस्टनी ऑपेरा करून दाखविला. सामाजिक स्टोरी होती. रात्री पीस कमेटीतर्फे ग्रँट हॉटेलात डीनर पार्टी देण्यात आली व नंतर रात्री साडेनवाला कँटनला जाण्यासाठी आम्हाला हँचावच्या पीस कमेटीने निरोप दिला.

रात्रभर गाडीत सर्वांच्या झोपा झाल्या व पाहतात तो गाडी उभी असल्याचे कळले. नंतर सांगण्यात आले की अजून तीन तास गाडी जाणार नाही. कारण पुढे पावसाने व वादळाने वीस पंचवीस मैलांवर रूळ वाहून गेले आहेत. नंतर त्या दिवशी १८-३-५३ ला दिवसभर गाडीतच आम्ही होतो. आज मला फारच सर्दी

अनुक्रमणिका

झाली आणि थोडासा तापही आला. नंतर रात्री १२॥ ला परत हँचावला जाण्यासाठी गाडी निघाली. कारण रस्ता क्लियर व्हायला एक दिवस तरी लागेल असे कळले.

**१९-८-५३**

ग्रँड हॉटेलात आज सकाळी सातला हँचावला परत पोहोचलो. आज चेतांव नदी आहे त्यात बोटींगला सर्वांना दहा वाजता नेले. तिथून लहान लहान दोन पार्क दाखविले व नंतर बोटींग करून एक वाजता परत आलो. रात्री आठ वाजता आज ऑपेरा करून दाखविला. सामाजिक स्टोरी होती.

**२०-८-५३**

हंचावहून सकाळी दहाच्या गाडीने व्हाया नँकींग, शांघायवरून कँटनला जायला निघालो. आज रात्री आठ वाजता आमची सगळी गाडी यांगसी नदीवरून बोटीने नेली.

**२२-८-५३**

श्वेंकु हॉटेलात उतरलो. आज हँकाव गांव व तिथला पार्क पाहून दोनला आम्ही परत स्टेशनवर जाण्यासाठी परत तीन वाजता पुन्हा प्रवासाला सुरुवात झाली.

**२३-८-६३**

आज दुपारी पाचला कँटनला पोहोचलो. त्या दिवशी विश्रांती घेतली. स्टेशनवर पीस कमेटीतर्फे घ्यायला मंडळी आली होती.

रात्री पीस कमेटीतर्फे गाण्याचा व नाचाचा कार्यक्रम दाखविण्यात आला. कार्यक्रम चायनीज लोकांचा होता. त्यानंतर रात्री पीस कमेटीतर्फे डीनर पार्टी झाली व भाषणे वगैरे संपवून आमच्या पार्टीतले बारा जण, मलबारची पार्टी, त्याच रात्री हंकांगला यायला निघालो. रात्री सर्वांचा फोटो घेण्यात आला.

**२५-८-५३**

कँटनहून सकाळी सातला स्टेशनवर हंकांगला जायला निघालो. साडेसातला गाडी सुटली. दुपारी शेषेंन स्टेशनवर एक वाजता उतरलो. तिथपर्यंतच चायनाची बार्डर आहे. तिथून एक फर्लांगावर ब्रिटीशची बार्डर लागते. ब्रिटीशांच्या स्टेशनवर, स्टेशनचे नांव लोबुला, आम्ही कस्टम तपासणी होऊन दोन वाजता गाडीत चढलो. वार्डरवर पीस कमेटीचे सर्व आमच्याबरोबर असलेली मंडळी मीस्टर हुं कानसीन व आणखीन सहा सात जण आणि चायनीज सहा मुली या सर्वांना आम्ही निरोप देताना त्यांच्या डोळ्यांत पाणी आले व आमच्या डोळ्यांतही पाणी आले. इतका जिव्हाळा एकमेकांत उत्पन्न झाला. नंतर साडे पांचला हंकांगला आलोत. तिथे परत कानुलु हॉटेलात उतरलो. लोबो स्टेषनवर माझे मंगळसूत्र हारवले.

**२६-८-५३**

आकराला आम्ही कावलुहून हंकांगला वाफरबोटीत बसून गेलो. फक्त दहा मीनीटांचा रस्ता आहे. हंकांग शहर अगदी सुंदर वसविले आहे. तिथे आम्ही जाऊन मार्केटींग केले. मी, जोत्स्नाबाई, दमयंती, चंद्रलेखा, सुरेंद्रकुवर व देवेंद्र विजय इतकीजणं संध्याकाळी पाच वाजेपर्यंत बाजारात हिंडत होतो. परत साडेपाचला कावलुला पोहोचलो.

अनुक्रमणिका

२७-८-५३

सकाळी आकराला परत हिंदुस्तानांत जाण्यासाठी पान अमेरीकनच्या बसमध्ये बसून एरोड्रॅमवर गेलोत. तीथून एक वाजता विमानाने निघालो. पांच वाजता ब्यंकांगला आलो. रात्री नऊला कलकत्ता व साडेआकराला दिल्ली. मात्र आमच्या घड्याळात दोन वाजले होते. कस्टम तपासणी होऊन घरी जाईपर्यंत आपल्याकडील अडीच वाजले. पीस कमेटी तर्फे हारतुरे देण्यात आले. व फोटो काढून घेतला गेला.

युव्हॅन शुहाय यांनी आपल्या घरी आम्हाला टी पार्टी दिली, त्यावेळी आर्टिस्टचे पहिले जीवन व हल्लीचे जीवन कसे आहे हे आम्ही त्यांना विचारले. त्या वेळी त्यांनी आपल्या स्वतःची हकीकत सांगितली. नाटक ही कला चीनमध्ये फार पुरातन आहे. परंतु आम्ही ऑपेरात नाटके करतो. मी स्वतः तीस वर्षे नाटकात काम करीत आहे. माझे वय पंचेचाळीस वर्षाचे आहे. मी सर्व व्हीलनची कामे करतो. वयाच्या पंधराव्या वर्षापासून नाटकांत काम करतो. आमच्याकडे सिनेमाला महत्त्व नाही. सीनेमा येण्यापूर्वी नाटक धंदा अतिशय उत्तम तऱ्हेने चालत असे. परंतु सीनेमा सुरू झाल्यावर थोडासा धंद्यावर परिणाम झाला. तरी पण आम्ही उपाशी मेलो नाही. परंतु मधली दहा वर्षे अतिशय वाईट गेली. चँकेश्यॅकच्या जमान्यात तर फारच वाईट परिस्थिती आली. जीकडून तिकडून लढाया व्हायच्या. त्यामुळे नाटक कंपनीची परिस्थिती इतकी वाईट झाली की अजीबात कंपन्या बसल्या. शिवाय आम्हाला नाटकावर जबर ट्यॅक्स बसविलेला. कुणीतरी कंपनी काढायची आणि त्यात आम्ही नोकरी करायची. परंतु आधीच उत्पन्न साधारण. त्यात टॅक्स काढून राहिलेले पैसे असायचे ते मॅनेजरनी मध्ये खायचे व चालकाच्या हाती काही थोडीबहोत रक्कम यायची. ते ते स्वतः घेऊन बसायचे. त्यामुळे वर्षन्‌वर्ष पगार मिळायचा नाही. मधूनच केव्हातरी पगारातले थोडेसे पैसे द्यायचे व त्याच्यावर आम्ही जगायचे, अशी परिस्थिती आली. असे होता होता आमच्यावर शेवटी इतका जुलूम झाला की लढाईत तुम्ही मिलटरीत जा असे सांगण्यात आले. त्यावेळी, आम्हाला ते कसे जमणार, शिवाय मी चाळीस वर्षांचा झालो, यापुढे मी शिक्षण घेऊन कधी तय्यार होणार, तरी ते मला जमणार नाही. तेव्हा मला त्यांनी सांगितले. की मग तुम्ही सरकारला दरमहा चाळीस ते पंचेचाळीस रुपये द्या. पाठविलेच पाहिजे. आणि हे जर जमत नसेल तर तुम्हाला तुरुंगात बसावे लागेल. अर्थात मला स्वतः खाण्याची पंचाईत. मी कुठून पैसे देणार? तरी मला त्यांनी तुरुंगात बसविले.

नंतर राजवट बदलल्यावर आम्हाला मोकळे करण्यात आले व काही दिवसांनी नव्या राज्यव्यवस्थेची घडी बसल्यावर आम्हाला परत कंपन्या काढण्याची परवानगी मिळाली. आम्हाला हल्लीच्या सरकारनी फारच मदत केली व नाटकावरील टॅक्स वगैरे काढून टाकला. आहे. आता आमची परिस्थिती सुधारली.

## चिनी गाणी

[चीनच्या दौऱ्यात हिराबाईंनी काही चिनी गाणी शिकून घेतली. त्यांची भारतीय पद्धतीने स्वरलिपीही तयार केली. दौऱ्याहून परत आल्यावर दिल्लीला झालेल्या काही स्वागत समारंभांमध्ये त्यांनी व ज्योत्स्नाबाईंनी ती गाणी गाऊन वाहवा मिळवली. त्यांपैकी दोन गाणी, हिराबाईंनी केलेल्या स्वरलिपीसह, खाली दिली आहेत—]

अनुक्रमणिका

## चिनी गाणे – १ राग भूप

### चिनी गाणे– १ राग भूप

सा ध प ध ध सा ध प ध
है ल ल ल ला है ल ल ला।

सा ध प ध ध सा ध प ग
है ल ल ल ला है ल ल ला॥

सा सा सा प ध सा ध प ग
येन खुम चुंग छाय शा ऽ ऽ ऽ या

प प प सा रे ग रे सा ध
टींग शाय स्तय होम व्हा ऽ ऽ ऽ या

सा सा सारे ग रे ग
चुंग छाव रे मी ली ल्यां ता॥

ध ध ध सा प ध प ग
ता ख्वाल्या मी को पी ऽ या

सा सासा सा सा सा प ध प ग
छयान शीज रे नी फे शो शा ऽऽ य

अनुक्रमणिका

प प प प प सा रे सा ध
टी को चो यी हॅ ल्या फा ऽ या॥

सा ध प ध ध सा ध प ध
है ल ल ल ला है ल ल ला।

सा ध प ध ध सा ध प ग
है ल ल ल ला है ल ल ला॥

सा सा सा सा प ध
च्यान ग्रू ज रे मी ठवान

प ग प | ध प ग
चीं चींग पा | फ्या तुंग शुर्ली

सा ध प ध प ध सा ध प ध
ले क ड पा ना क ले क ड पा

## चिनी गाणे–२

ग ग प ग रे सा | रे ग सा ध प
मी मी सो मी रा दो | रे मी दो ला सो

सा सा प प ध ध
दो दो मी सो ला ला

रे सा ध | प प ध ग प प सा | ग रे
रे दो ला | सो सो ला मी सो ब दो | मा ले

| प प ग प रे ग सा | प ग प सा सा सा
| सो सी मी स रे लो सो | स मी सो सो तो तो

| प ग प सा रे | ग सा रे |
| स मी स दो रे | मी दो रे |

ग ग ग रे सा ध | प प प म ग रे |
मी मी मी रे तो ला | सो सो सो का मी रे |


ध ध ध प ग प | रे रे सा
सो मी सो सो मी सो | रे रे तो

अनुक्रमणिका



सवाई गंधर्व खासाहेब अब्दुल करीम खाँसाहेब शंकरराव सरनाईक


अनुक्रमणिका



सुरेशबाबू माने




खाँसाहेब वहिद खाँसाहेब



माणिकचंद गांधी

अनुक्रमणिका



गुरूनीथ व हिराबाई




राधे कृष्ण बोल...

अनुक्रमणिका



ज्योस्ना भोळे हिराबाई माणिक वर्मा





वद जाऊ कुणाला...



"प्रतिभा" प्रभात चित्र

बालगंधर्व व हिराबाई

अनुक्रमणिका




बेगम अख्तर व हिराबाई




पं. रविशंकर आणि हिराबाई

[अनुक्रमणिका](#)



यशवंतराव चव्हाण, सुधीर फडके व हिराबाई




वसंतराव देशपांडे व हिराबाई

अनुक्रमणिका



डावीकडून : कमलाबाई बडोदेकर, पु. ल. देशपांडे, हिराबाई बडोदेकर, सरस्वती राणे



डावीकडून : राजाभाऊ कोसके, शमसुद्दीन खाँसाहेब, हिराबाई बडोदेकर, बाबुराव कुमठेकर

अनुक्रमणिका

## हिराबाईंचा अल्प परिचय

श्रीमती हिराबाई बडोदेकर म्हणजे संगीतातील एक अजोड कर्तृत्व. गेली दहा बारा वर्षे त्यांनी अति वार्धक्यामुळे गाणे सोडले आहे. पण त्याआधी तब्बल ५०—५५ वर्षे त्या गात होत्या. सबंध देशभर त्यांचे नाव दुमदुमत होते. देशात अधी एकही संगीत परिषद नसेल की जिथे हिराबाई गायल्या नाहीत. ज्या काळात गायकाला सामाजिक प्रतिष्ठा नव्हती आणि स्त्रीचे गाणे फक्त हीन चारित्र्याच्या स्त्रियांचाच धंदा समजला जात असे त्या काळात त्यांनी संगीत क्षेत्रात पाऊल टाकले आणि ज्या काळात संगीत व्यवसायाला प्रतिष्ठा लाभली व राजमान्यता मिळाली त्या काळात सामाजिक व शासकीय सर्व प्रकारचे अत्युच्च मान-सन्मान मिळवून त्या निवृत्त झाल्या. संगीताला ही जी प्रतिष्ठा लाभली ती मिळवून देण्यात हिराबाईंचा मोठा वाटा आहे. त्यांची कला जितकी थोर होती तितकेच त्यांचे चारित्र्यही आदर्श होते.

सुमारे १९४० ते १९६० ह्या वीस वर्षांच्या काळात हिराबाई लोकप्रियतेच्या शिखरावर होत्या. त्यांच्या तोडीची गायिका दुसरी नव्हती. त्यांचे गाणे ऐकणे हे परिष्कृत सदभिरुचीचे व प्रतिष्ठेचे लक्षण समजले जात असे.

हिराबाईंनी हे जे असामान्य कर्तृत्व गाजवले त्याच्यामागे त्यांचे निरलस कष्ट, अपार सहनशीलता, स्थिर बुद्धी, नितांत समंजसपणा व शालीन बाणेदारपणा हे गुण आहेत. अडचणी आल्या, संकटे कोसळली; पण त्या कधी गांगरल्या नाही, रागावल्या नाही. त्यांच्या जीवनाची वाट मनोमन त्यांना स्वच्छ दिसत होती. समजू लागले तेव्हाच त्यांनी ती आखून ठेवली होती. त्या वाटेवर त्या धैर्याने व निश्चल श्रद्धेने चालत राहिल्या. या वाटचालीची थोडीफार कल्पना येण्यासाठी त्यांच्या जीवनातील काही ठळक गोष्टी येथे नमूद करत आहोत.

हिराबाईंचा जन्म मिरज येथे २९ मे १९०५ रोजी झाला. त्यांची जन्मकथा हाच एक चमत्कार आहे.

त्यांच्या आई ताराबाई तेव्हा फार आजारी होत्या. ताराबाईंच्या प्रकृतीची घरात सर्वांना काळजी लागून राहिली होती. त्यातच त्या बाळंत झाल्या. दिवस भरले नव्हते. अपुऱ्या दिवसांचे मूल किरटेच असणार. त्यातून त्याच्या अंगात काही हालचाल दिसेना, मग रडणे दूरच. मेलेले उपजले असे समजून सुइणीने फडक्यात गुंडाळून दूर कोपऱ्यात ठेवून दिले आणि बाळंतिणीची शुश्रुषा सुरू केली.

थोड्या वेळाने डॉक्टर आले. त्यांनी बाळंतिणीला तपासले; औषधपाणी दिले. मग विचारले, “बाळ कुठे आहे?”मेलेलेच जन्मास आले हे ऐकल्यावर डॉक्टर म्हणाले, “पाहू दे.”

डॉक्टरांनी फडके उलगडून बाळ पाहिले. ते मेलेले नव्हते. अजून त्याच्यात धुगधुगी होती. डॉक्टरांनी तडक उपाय केले. काही वेळाने बाळाने ट्यॅहॅ केले. बाळ-बाळंतीण दोघेही यथावकाश सुधारले.

हे बाळ म्हणजेच हिराबाई. पाळण्यातले नाव चंपू. घरगुती नात्यात याच नावाने त्या ओळखल्या जातात.

अनुक्रमणिका

पाच भावंडांत चंपूताई दुसरी. पहिले सुरेशबाबू माने. दुसरी चंपूताई ऊर्फ हिराबाई. तिसरी गुलुताई ऊर्फ कमलाबाई बडोदेकर. चवथा पापा ऊर्फ कृष्णराव आणि पाचवी छोटी ऊर्फ सरस्वतीबाई राणे. आणखी दोन धाकटी भावंडे बाळपणीच दगावली.

ही पाचही भावंडे संगीताचा वारसा घेऊन जन्माला आली. आणि पुढे संगीतावरच जगली. त्यांची आजी हिराबाई माने गायिका म्हणून बडोदे सरकारच्या सेवेत होती. तिचेच नाव पुढे चंपूताईने घेतले व तिचे आडनाव सुरेशबाबूने लावले. तिची मुलगी ताराबाई ही, गायिका म्हणून फारशी गाजली नसली तरी, संगीतात तयार होती. तिला लहानपणापासून बडोद्यात अब्दुल करीम खां सारख्या अभिजात गवयाची तालीम लाभली होती. ही प्रियशिष्या पुढे थोरल्या हिराबाईंच्या मृत्यूनंतर अब्दुल करीमखांची प्रियसखी, भार्या व सचिव झाली. हे जोडपे बडोदे सोडून मिरजेस येऊन राहिले.

अशा रीतीने आई व वडील अशा दोन्ही परंपरांतून घरंदाज संगीताचे रक्त या मुलांच्या अंगात खेळत होते. घरात रात्रंदिवस संगीताचे सत्र चालत होते. त्याचे संस्कार अबोधतः मुलांवर होत होते. त्यातून अब्दुल करीम खांनी सुरेशबाबूला लहानपणीच कायदेशीर तालीम सुरू केली. वयाच्या सोळाव्या वर्षी सुरेशबाबूची तयारी स्वतंत्रपणे गाण्याइतकी झाली होती. धाकटा कृष्णराव तर इतका उपजत गुण घेऊन आला होता की वयाच्या चवथ्या वर्षी तो बिकट तानांची लीलया सरगम करत असे. अब्दुल करीम खां आपल्या जाहीर जलशात अभिमानाने छोट्या कृष्णरावचा सरगमचा कार्यक्रम ठेवत असत.

चंपूताईला सुद्धा लहानपणापासून गाण्याचेच ध्यान लागले होते. गाणे ऐकले की त्याची ती नक्कल करत असे. हाती येईल ते ओंडके घेऊन तंबोऱ्यासारखे वाजवत असे. पण तिला कोणी गाणे शिकवी ना, शिकू देई ना.

मुलींनी गाणे कुलीनांचा रिवाज नसल्यामुळे ताराबाई चंपूताईला गाणे शिकू देत नव्हत्या. आपल्या मुलीने खूप शिकावे, डॉक्टर व्हावे, समाजात प्रतिष्ठितपणे जगावे, अशी त्यांची आकांक्षा होती म्हणून त्यांनी चंपूताईला शाळेत घातले. मुलींनी गाणे शिकणे अब्दुल करीम खांनाही पसंत नव्हते. म्हणून त्यांनी मुलांना शिकवले तसे मुलींना कधी शिकवले नाही. मारून मुटकून चंपूताई पुण्याच्या हुजुरपागा शाळेत सातवीपर्यंत शिकली.

त्या सुमारास ताराबाईंचा अब्दुल करीम खांशी बेबनाव झाला व त्यांनी पाचही मुलांना घेऊन १९१८ साली मुंबईस स्वतंत्र बिऱ्हाड थाटले. ताराबाईंनी खांसाहेबांना सोडून वेगळे राहणे बरोबर असो की चूक असो, हिराबाईंना व धाकट्या दोन बहिणींना ते फार उपकारक झाले. त्या खांसाहेबांजवळ राहिल्या असत्या तर मुलींना गाणे शिकता आले नसते. वेगळे झाल्यावरही ताराबाई चंपूला गाणे शिकवण्यास मुळीच उत्सुक नव्हत्या. पण ही मुलगी गाण्यात मोठे नाव कमावील असे भागवत ज्योतिषी बुवांनी सांगितल्यावरून चंपूताईला गाणे शिकवण्याकडे ताराबाईंचा कल झुकला.

आरंभी घरच्या घरी सुरेशबाबूकडून तालीम सुरू झाली. चंपूला गाण्यात गती आहे हे मग ताराबाईंच्या लक्षात आले व बहीण-भावाच्या नात्यात शिकण्यापेक्षा खेळणे भांडणे अधिक म्हणून बाहेरच्या गुरूचा शोध सुरू झाला. प्रथम काही महिने महंमद खांची शिकवणी लावली. पण लहानपणापासून जे अभिजात गायन चंपूताईच्या मनात भरले होते ते महंमहखांकडून मिळेना. म्हणून ती शिकवणी बंद झाली.

अनुक्रमणिका

लवकरच त्यांना वहीदखांसारखा मातब्बर गायक गुरू म्हणून लाभला. १९१८ ते १९२२ अशी चार वर्षे त्यांना वहीदखांकडून कसून तालीम मिळाली. त्यात हिराबाईंच्या गाण्याचा पाया पक्का झाला. अविश्रांत रियाज करून त्यांनी गळ्यात सूर कमावला. आणि मग त्यांनी गाण्याचा व्यवसाय सुरू केला. व्यवसायाला लागल्यावरही वहीद खां मुंबईत असतील तेव्हा त्यांच्याकडून शिकणे बरीच वर्षे चालू होते.

हिराबाईंचे पहिले जाहीर गाणे त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी मुंबईत झाले. तेही गांधर्व महाविद्यालयाच्या सुप्रतिष्ठित गान-मंचावर. १९२१ सालच्या डिसेंबर महिन्यात पंडित विष्णु दिगंबर पलुसकरांनी एक संगीत परिषद भरवली होती. या उदयोन्मुख गायिकेचे नाव त्यांनी ऐकले होते आणि ही गुणी मुलगी रसिकांच्या पुढे यावी अशी त्यांची इच्छा होती. म्हणून त्यांनी ताराबाईला गळ घालून हिराबाईंला गायला नेले. पटदीप हा अनोखा राग मोठ्या तयारीने व सुरेल माधुर्याने गाऊन हिराबाईंनी सभा गाजवली. पण त्या वेळी त्या बहीदखांच्या गंडाबंद शिष्या होत्या आणि तयारी पूर्ण झाल्याशिवाय बाहेर गायचे नाही अशी बहीदखांची ताकीद होती. या कार्यक्रमाने ती मोडली म्हणून ते नाराज झाले.

१९२२ साली शिकवणीचा करार पुरा झाल्यावर हिराबाई जाहीर कार्यक्रम करण्यास मोकळ्या झाल्या. तशा त्या वयाच्या तेराव्या वर्षापासून सुरेशबाबूंबरोबर बाहेर गाऊ लागल्या होत्या. पण ते कधी मधी व बरेचसे खाजगी बैठकीत. या भावंडांनी व्यवसायात उतरणे त्यांच्या कलागुणांमुळे जितके स्वाभाविक होते तितकेच आर्थिक अडचणींमुळे आवश्यक झाले होते. मुंबईसारख्या महाग शहरात सहा माणसांचा संसार चालवायचा होता आणि उपजीविकेचे दुसरे काहीही साधन हाती नव्हते. मुख्यतः याच हेतूने ताराबाईंनी १९२१ साली 'नूतन संगीत विद्यालय' सुरू केले होते. त्यात स्वतः ताराबाई व सुरेशबाबूंच्या मागोमाग हिराबाईंही मुलांना शिकवू लागल्या होत्या. त्यात जेमतेम पोटापुरती बेगमी होत होती.

थोड्याच अवधीत नवोदित गायिका म्हणून हिराबाईंचा चांगला जम बसला. ठिकठिकाणची बोलावणी येऊ लागली. वयाच्या सतराव्या वर्षी आकारू लागलेली यशाची चढती कमान पुढे पन्नास वर्षे टिकून राहिली.

१९२४ साली हिराबाईंनी एक ऐतिहासिक महत्त्वाचा विक्रम केला. त्यांनी तिकिटे लावून आपल्या गायनाचा जलसा केला. तोपर्यंत कोणी धनिकाने व संस्थेने सुपारी द्यायची व मिळेल ती बिदागी घेऊन कलावंताने गायचे अशी प्रथा होती. अब्दुल करीम खाँ सारख्या काही नामवंत पुरुष कलाकारांनी ही प्रथा मागे टाकून, तिकिटावर सार्वजनिक कार्यक्रम करण्याचा उपक्रम केला होता. परंतु एका स्त्रीने असा जाहीर कार्यक्रम करण्याचा हा पहिलाच विक्रम होता. हा जलसा पुण्यातील आर्यभूषण थिएटरात झाला.

याआधी १९२३ साली हिज मास्टर्स व्हॉइस कंपनीने हिराबाईंच्या गाण्याची पहिली ध्वनिमुद्रिका काढली होती. तिच्यात 'जया अंतरी भगवंत' हे भजन होते. पाठोपाठ 'सखी मोरी रुमझुम' चीजेची ध्वनिमुद्रिका निघाली. ह्या ध्वनिमुद्रिका इतक्या लोकप्रिय झाल्या की पुढे हिज मास्टर्स व्हॉइस, ओडियन व कोलंबिया या ग्रामोफोन कंपन्यांनी त्यांच्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका काढण्याचा घोशा लावला. रागदारी बंदिशी, नाट्यगीते, ठुमऱ्या, भजने, सुगम गीते, वगैरे मिळून त्यांच्या सुमारे पावणे दोनशे ध्वनिमुद्रिका निघाल्या आहेत.

अनुक्रमणिका

१९२८ साली मुंबईत आकाशवाणी केंद्र सुरू झाले. तेव्हापासून आकाशवाणीवर हिराबाईंच्या कार्यक्रमांची रीघ लागली. मुंबई, कलकत्ता, लखनौ, दिल्ली, वगैरे देशातील सर्व प्रमुख आकाशवाणी केंद्रावर हिराबाईंचे कार्यक्रम पुढील चाळीस वर्षे होत राहिले. आणि आता त्यांनी गाणे सोडले असले तरी अजूनही ठिकठिकाणच्या आकाशवाणी केंद्रांवरून त्यांची गाणी ऐकू येतात.

कार्यक्रमांच्या निमित्ताने देशभर हिराबाईंचा संचार झाला. लाखो रसिकांनी त्यांचे गाणे समक्ष ऐकले. तथापि ध्वनिमुद्रिका व आकाशवाणी यांनी त्यांचे गाणे घरोघर पोचवले. उपवनी गात कोकिळा, राधेकृष्ण बोल, जमुना के तीर, ब्रिजलाला गडे, असाचि धावत येई मोहना, सखे मी मुरारी वनी पाहिला, अशी त्यांची किती तरी लडिवाळ गाणी जनमानसात ठाण देऊन बसली. त्यांची दोन चार गाणी कधी गुणगुणली नाहीत असे माणूस सबंध महाराष्ट्रात मागल्या पिढीत तरी सापडले नसते.

महाष्ट्राच्या बाहेर हिराबाईंची कीर्ती पसरली ती मुख्यतः १९३७ नंतर. त्या वर्षी कलकत्त्याला भूपेन्द्र बाबू घोषांनी एक अखिल भारतीय संगीत परिषद भरवली होती. परिषदेत गाण्यासाठी केसरबाई केरकरांच्या शिफारसीने हिराबाईंच्या गाण्याचे अमाप कौतुक झाले आणि पुढच्याही वर्षी तेथील परिषदेत गाण्याचे त्यांना आमंत्रण आले. या दोन परिषदांनी हिराबाईंना अखिल भारतीय कलावंताचा दर्जा मिळवून दिला. तेथून देशभराच्या संगीत सभांची आमंत्रणे त्यांना येत गेली. १९४१ साली पडदा नशीन पंजाबी मुलुखात जालंदरच्या वार्षिक संगीत संमेलनात गाणाऱ्या त्या पहिल्या स्त्री कलाकार होत्या.

हिराबाईंनी १९२२ साली संगीत व्यवसायात पाऊल टाकले तेव्हा फैय्याजखाँ, अब्दुल करीम खाँ, रामकृष्णबुवा वझे, भास्करबुवा बखले, अशा बुजुर्गांचा जमाना होता. ओंकारनाथ, विनायकबुवा, पटवर्धन, नारायणराव व्यास, बालगंधर्व, सवाई गंधर्व, असे तरुण तेजस्वी तारे चमकत होते. स्त्री-कलाकारांमध्ये केसरभाई केरकर, लक्ष्मी बाई जाधव, ताराबाई शिरोडकर, इंदिरा वाडकर ह्या महाराष्ट्रातील आणि सिद्धेश्वरी देवी, रसूलन बाई, गोहरजान, आदि उत्तरेतील ज्येष्ठ गायिका आघाडीवर होत्या. शिवाय अख्तरीबाई फैजाबादी, रोशन आरा, गंगूबाई हनगल, आदि गायिकांची वाटचाल हिराबाईंच्या आगेमागे होती. हिराबाईंनी व्यवसायांत इतक्या झपाट्याने प्रगती केली की लवकरच त्यांनी बहुतेक गायिकांना मागे टाकले. मध्ये सबंध एका पिढीचा काळ असा येऊन गेला की त्यांच्या तोलाची दुसरी गायिका देशात नव्हती.

पन्नास वर्षे सबंध देशभर हिराबाईंना जितकी लोकप्रियता लाभली तितकी दुसऱ्या कोणा गायकाला लाभली नसेल. महाराष्ट्रात अशीच लोकप्रियता लाभली होती ती त्यांच्या आधी त्यांचे वडील अब्दुल करीम खां यांना. ह्या लोकप्रियतेचे अनेक पदर होते. तिच्यात जसे त्यांच्या कलेचे कौतुक होते तसे त्यांच्या शालीन व्यक्तिमत्वाविषयीचा आदर व प्रेमही होते. समाजाच्या सर्व थरात त्या प्रिय होत्या. त्यांच्या चाहत्यात राजे महाराजे होते तसे सामान्य जनही होते. बुद्धिवंत होते तसे अडाणी खेडुतही होते. भिन्न अभिरुचीच्या आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचा त्यांच्यावर लोभ जडला होता. हजारो रसिकांची त्यांच्यावर भाबडी श्रद्धा होती. एरव्ही देवदर्शन नाकारणाऱ्या बद्रीनाथच्या पुजाऱ्याने त्यांचे नाव ऐकताच त्यांना गाभाऱ्याचे दार उघडून देणे, कोणी खेडवळाने मालकाला मुलगा व्हावा म्हणून देवाला हिराबाईंचे गाणे ऐकवण्याचा नवस करणे, ही त्यांच्या अफाट लोकप्रियतेची हृद्य उदाहरणे आहेत.

मधला काही काळ हिराबाई रंगभूमीच्या नादी लागल्या होत्या. मराठी रंगभूमीच्या सुवर्ण युगाचा तो उत्तरार्ध होता. बालगंधर्वांच्या गाण्यांची हिराबाईंवर मोहिनी पडली होती. त्यांची नाटके पाहून हिराबाईंना

रंगभूमीचे आकर्षण वाटणे स्वाभाविक होते. त्यातच मुंबईला बरीच वर्षे गंधर्व कंपनीच्या बिऱ्हाडाचा शेजार लाभला; त्याचाही मनावर संस्कार झाला. भास्करबुवा बखले. गोविंदराव टेंबे, गणपतराव बोडस, आदि श्रेष्ठ कलावंतांचे घरी येणे-जाणे होते. मुलींना नाटकात घालण्याबद्दल कोणी ताराबाईंना आग्रह करत होते. टेंबे व बोडस तर 'सम्राट संगीत मंडळी' नावाची नवी नाटक मंडळी काढण्याचा प्रस्ताव ताराबाईंपुढे मांडू लागले. तो प्रस्ताव फिसकटला पण ती कल्पना ताराबाईंच्या मनात रुजली. नाटक मंडळ्यांना तेव्हा उत्पन्नही चांगले होत असे. त्यावर नजर ठेवून ताराबाईंनी स्वतःची नाटक मंडळी काढण्याचा घाट घातला. त्यांच्या 'नूतन संगीत विद्यालया'ची 'नाट्यशाखा' म्हणून नवी नाटक मंडळी सुरू केली. आपल्या पाच मुलांवर नट म्हणून ताराबाईंचा भर होता. पहिले नाटक घेतले ते 'संशय कल्लोळ.' त्याचा पहिला प्रयोग पुण्यातील किर्लोस्कर थिएटरात १९२९ साली झाला. त्यात आश्विनशेट व रेवती ह्या मुख्य भूमिका सुरेशबाबू व कमलाबाई यांनी केल्या होत्या. आपल्या गाण्यात कदाचित व्यत्यय येईल या भीतीने हिराबाईंनी त्यात भूमिका केली नाही. तथापि रेवतीकडील गाण्याच्या जलशात त्या गायल्या.

पण हिराबाई नाटकापासून फार काळ दूर राहू शकल्या नाहीत. त्याच वर्षी नाट्यशाखेने 'सौभद्र' घेतले. पहिला प्रयोग ५ सप्टेंबर १९२९ रोजी मुंबईला बॉंबे थिएटरात झाला. हिराबाई सुभद्रा झाल्या. 'सौभद्रा'तील ही सहावी नामवंत सुभद्रा. मग हिराबाईंनी स्वतःला नाटकात झोकून दिले. पुढील चार वर्षात आठ नऊ नाटके नाट्यशाखेने केली. त्या सर्वात नायिकेची भूमिका हिराबाईकडे. शिवाय सुरेशबाबू, कमलाबाई व सरस्वतीबाईही भूमिका करत. इतर भूमिकांसाठी त्या वेळचे नावाजलेले नट घेतले जात. या नाटकांमध्ये संशयकल्लोळ, सौभद्र, पुण्यप्रभाव व विद्याहरण ही जुनी नाटके होती तशी स. अ. शुक्लांचे 'साध्वी मीराबाई,' ना. सी. फडक्यांचे 'युगांतर', मामा वरेरकरांचे 'जागती ज्योत', कमतनूरकरांचे 'स्त्री पुरुष' ही नवी नाटके प्रथमच रंगभूमीवर येत होती.

पण रंगभूमी हिराबाईंना मानवली नाही. डाव अंगावर आला. गाण्यात त्यांनी कितीही 'वन्स मोअर' घेतले तरी अभिनयात त्या कमी पडत होत्या. इतर नाटक मंडळ्यातील बालगंधर्व, दीनानाथ, नानासाहेब फाटक, केशवराव दाते, या रथी-महारथींच्या तोडीचे नट हिराबाईंच्या नाट्य-शाखेत नव्हते. त्यामुळे लोकप्रियतेचा भर लवकर ओसरला. त्यातच जुन्या नाटकांनी उत्पन्न बरे दिले, पण नवी नाटके तोट्यात आली. 'जागती ज्योत' व 'स्त्री-पुरुष' या नाटकांनी तर कर्जाचा डोंगर डोक्यावर लादला. १९३३ मध्ये 'नाट्यशाखा' बंद करावी लागली. नव्वद माणसांचा खर्च चालवणे अशक्य झाले होते.

कर्जापोटी एक मोठे संकट हिराबाईंपुढे उभे झाले. कोटकर व वागळे या भागीदारांनी, व्यवस्थापक सावंतांच्या सल्लामसलतीने, 'नाट्य-शाखे'च्या व्यवहारात हिराबाईंशी लबाडी केली. तिकिटांचे सगळे उत्पन्न परस्पर खिशात घालून, चाळीस हजारांचे कर्ज दाखवले. त्यापैकी अर्ध्या रकमेच्या वसुलीनिमित्त नाट्यशाखेची सर्व मालमत्ता जप्त केली. उरलेल्या रकमेसाठी न्यायालयात दावा लावला. हिराबाईंची पुरती नाचक्की करण्यासाठी त्यांनी नादारी घ्यावी असाही अर्ज केला.

हिराबाई डगमगल्या नाहीत. त्यांचे मनोधैर्य व बाणेदारपणा या प्रसंगी कसाला लागले. नादा री घेता का?' म्हणून न्यायाधीशाने विचारले तेव्हा त्यांनी स्पष्ट नकार दिला 'कर्ज कसे फेडणार?' या प्रश्नाला त्यांनी सडेतोड उत्तर दिले, "नाटक कंपनी बंद झाली असली तरी माझ्या गळ्यातलं गाणं तर गेलं नाही. गावोगाव हिंडून जलसे करीन व कर्ज फेडीन."

अनुक्रमणिका

आणि हिराबाईंनी तंबोरा हाती घेतला. गावोगाव जलसे करून त्यांनी चार दोन वर्षात कर्ज फेडले.

पुन्हा तोंडाला रंग फासायचा नाही, असा हिराबाईंनी निश्चय केला होता. परंतु १९४३ साली मुंबई साहित्य संघाने मराठी रंगभूमीचा शताब्दी महोत्सव केला तेव्हा डॉ. भालेरावानी मिनतवारीने तो मोडायला लावला. २२ एप्रिल १९४४ रोजी साहित्य संघाच्या 'सौभद्र'मध्ये बालगंधर्वांबरोबर (अर्जुन) हिराबाईंनी सुभद्रेची भूमिका केली. पुढे तर हिराबाईंचा भाऊ कृष्णराव याने कंत्राटदारी पद्धतीवर नटसंच उभा केला व 'सौभद्र', 'विद्याहरण', 'एकच प्याला' वगैरे जुनी नाटके घेऊन १९४७ ते १९५३ या सहा वर्षात दौरे काढले. त्यात हिराबाईंनी नायिकांच्या भूमिका केल्या. पुढे १९६५ पर्यंत त्या नाटकात तुरळक भूमिका करत होत्या.

'नाट्यशाखा' बंद झाल्यावर १९३४ ते १९३८ या चार वर्षात हिराबाईंनी चित्रपटातही भूमिका केल्या. प्रथम मो. ग. रांगणेकर हटून बसल्यामुळे त्यांच्या 'सुवर्णमंदिर' या चित्रपटात, नंतर बाबूराव पेंटरांच्या 'प्रतिभा' मध्ये, नंतर रवीन्द्र चित्रच्या 'संत जनाबाई' मध्ये. या व्यवसायात द्रव्यप्राप्ती बरी झाली; पण कमलाबांईना जसे चित्रपटात यश लाभले तसे हिराबाईना मिळाले नाही. त्याचे तिन्ही चित्रपट पडले. शेवटी पु. रा. भिडे यांनी हिराबाईंच्या ललत रागावर एक अडीच तासांचा गीतपट काढला. त्यात हिराबाईंची काही इतर पदेही होती. पण तो प्रकाशात कधी आलाच नाही.

रंगभूमीच्या व चित्रपटाच्या व्यवसायात गुंतलेल्या असतानाही हिराबाईंचे गाणे बंद झाले नाही. त्यात थोडी ढिलाई आली असली तरी कार्यक्रम करणे सुरूच राहिले. १९७३ पर्यंत त्या गात होत्या. १९४९ साली त्या गाण्यांच्या जलशांसाठी आफ्रिकेचा दौरा करून आल्या. त्यांनी बरोबर नेलेल्या संचात नर्तक व जादूगारही होते. दौऱ्यात तोटा सोसला पण पैसे कमावण्यासाठी संगीताचा दर्जा घसरू दिला नाही.

हिराबाईंच्या जन्मापासून त्यांच्या आयुष्याला वळण लावले ते ताराबाईंनी. त्यांनीच हिराबाईंना घडवले असे म्हणता येईल. ताराबाई फार कर्तबगार होत्या. अब्दुल करीम खाँचा सर्व व्यवहार त्याच सांभाळत असत. त्यांच्यापासून वेगळे झाल्यावर त्यांनी हिंमतीने पाचही मुलांना वाढवले, शिकविले, व्यवसायाला लावले. मुलांचे सर्व व्यवसाय व्यवहार त्या दक्षतेने सांभाळत असत. आयुष्यभर त्यांची मुलांसाठी धडपड चालली होती. हिराबाईंना त्यांनी गाणे शिकविले नाही; पण गुरू त्यांनीच शोधले. हिराबाईंकडून त्यांनी मानेवर खडा ठेवून रियाज करून घेतला. गाण्यात जरा कुठे चुकले तर त्या लगेच चूक दाखवून देत. कार्यक्रमांसाठी होणाऱ्या प्रवासात त्या हिराबाईंची पाठ राखण करत असत. अब्दुल करीम खाँपासून वेगळे झाल्यावर तीन वर्षांच्या आत त्यांनी मुलांना उपजीविकेला लावण्यासाठी मुंबईत नूतन संगीत विद्यालय काढले. पुढे नाट्यशाळा त्यांनीच उभी केली व नाटकांच्या व्यवहारात त्या जातीने लक्ष घालत. २० ऑक्टोबर १९४६ रोजी त्या वारल्या.

हिराबाईंना घडविण्यात ताराबाईंनंतर क्रम लागतो सुरेशबाबूंचा. तेच हिराबाईंचे संगीतातील पहिले गुरू. अब्दुल करीम खाँच्या गायकीचा हिराबाईंवर संस्कार झाला तो सुरेशबाबूंकडून. या दोघा बहीण-भावांच्या वयात फक्त तीन वर्षांचे अंतर होते. बाळपणापासूनचा हा सवंगडी पुढे संगीत, रंगभूमी व चित्रपट या व्यवसायातही सोबत करत राहिला. आरंभीच्या काळात ही भावंडे मिळून जलसे करत असत. या दोघांनी कमलाबाई व सरस्वतीबाई या धाकट्या बहिणींनाही संगीतात तयार केले व आपल्या बरोबर रंगभूमी व चित्रपट व्यवसायातही पुढे आणले. १५ फेब्रुवारी १९५३ रोजी सुरेशबाबूंचे निधन झाले.

अनुक्रमणिका

अब्दुल करीम खां वडील असूनही त्यांचा हिराबाईंच्या आयुष्याला काही उपयोग झाला नाही. मुलींना गाणे शिकवायचे नाही असा त्यांचा दंडक होता. त्यामुळे सुरेशबाबूंना जसे त्यांच्याकडून गाणे मिळाले तसे हिराबाईंना मिळाले नाही. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत, म्हणजे गाणे शिकायला लागण्यापूर्वी, त्यांच्या कोवळ्या मनावर खांसाहेबांच्या गाण्याचा अबोध संस्कार झाला असेल तेवढाच. पुढे ताराबाईंनी मुंबईला वेगळे बिऱ्हाड थाटल्यावर, १९३७ साली खांसाहेबांना, तामीळनाडूतील एका लहानशा रेल्वे स्टेशनवर, एकाकी अवस्थेत मरण येईपर्यंत मुलांशी त्यांची भेट होऊ शकली नाही. तथापि खांसाहेबांकडे हिराबाईंचे हृदय ओढ घेत होते आणि आजतागायत हिराबाईंच्या मनात खांसाहेबांविषयी आदर आहे. गुरुजनांविषयी आदर हा हिराबाईंचा स्वभाव आहे. म्हणून त्यांच्या मनात वहीद खांनाही मानाचे स्थान आहे.


हिराबाईंच्या जीवनात नितांत प्रेमाचे व आदराचे स्थान होऊन बसलेली आणखी एक व्यक्ती म्हणजे मणिकचंद गांधी. सोलापूरच्या या उमद्या व्यक्तित्वाच्या रसिक धनिकाशी हिराबाईंचा १९२४ साली गांधर्व विवाह झाला. दोन वर्षांनी हिराबाईंना मुलगी झाली; पण ती दोन तीन दिवसातच मेली. १९२८ साली त्यांना मुलगा झाला. तो गुरुनाथ ऊर्फ बाबा. माणिकचंदांनी हिराबाईंचा कलेतील गौरव व प्रतिष्ठा लक्षात घेऊन त्यांना सन्मानाने वागवले. कधीही त्यांना एकेरी हाक मारली नाही पण १९२९ साली नाटकात काम करण्यावरून त्यांचे तीव्र मतभेद झाले. माणिकचंदांचा विरोध डावलून हिराबाई रंगभूमीवर आल्या. त्यामुळे काही काळ पति-पत्नीमध्ये दुरावा उत्पन्न झाला. पण हिराबाईंची नाटके बंद झाल्यावर पुन्हा दिलजमाई झाली. माणिकचंदांच्या उतार वयात हिराबाई त्यांची काठी झाल्या. त्यांची दृष्टी गेली. त्यामुळे जैनांच्या तीर्थस्थानांची यात्रा करण्याची त्यांची इच्छा अपुरी राहिली. त्यांच्या त्या अपंग अवस्थेत हिराबाई, आपल्या वडील सवतीसह, त्यांना या यात्रेला घेऊन गेल्या. १९७९ साली त्यांच्या देहावसानापर्यंत हिराबाईंनी पतिव्रता धर्माने त्यांची साथ केली.

ताराबाई, सुरेशबाबू यांच्या निधनानंतर सर्व कुटुंबाची जबाबदारी हिराबाईंवर पडली आणि ती त्यांनी आईच्या ममतेने व समर्थपणे पार पाडली. स्वतःची व भावंडांची मिळून २०—२५ माणसे कुटुंबात आहेत. त्यांची शिक्षणे, लग्ने, वगैरे सर्व सोपस्कार हिराबाईंनी व्यवस्थित केले.

आता हिराबाई कृतकृत्य आहेत. वयाची ८० वर्षे पुरी होताहेत. सर्व शक्ती क्षीण झाल्या आहेत. पण सार्थ जीवन जगल्याचे समाधान त्यांच्या मुद्रेवर दिसते. मनाने त्या शांत व तृप्त आहेत. त्यांच्या ‘स्वरविलास’ बंगल्यात दोनच पिकली पाने. त्या स्वतः व कमलाबाई. बाकी घर, मुलगा, सून, भाचरे, नातवंडे या हिरव्या पानांनी गजबजलेले. या फुलत्या प्रपंचाकडे परतीरी लागलेल्या डोळ्यांनी निर्लेप कौतुकाने पाहत काळ कंठत आहेत.

पद मध्यमग्राम    ताल—दादरा [मात्रा—३]    **कवि : वसंत देसाई**


उपवनी गात कोकिला । ऋतुराजा जीवाचा दिसला तिज ॥
रसिकराज तिज दिसला । जीव जीवा सापडला ।
खुलत चंद्र पाहुनीया । कमला जणु ॥१॥



॥अंतरा॥



राधेकृष्ण बोल मुखसे। राधेकृष्ण बोल तेरो क्या लगेगा मोल ॥ध्रु.॥
हाथ पाव नही हिलना। दसबीस कोस नही चलना। कुछ गिरे गाठ नही छुटना।
तेरे मनकी गुंडी खोल। तेरो क्या लगेगा मोल ॥१॥
कौल बचन दे आया। इस मायाने मन लुभाया। उस मायाने घेर गिराया।
उस ठगनीका पल्ला छोड। तेरो क्या लगेगा मोल ॥२॥





अनुक्रमणिका

॥अंतरा २॥




| नाट्यगीत | ताल : आध्धा त्रिताल |
|---|---|

मित भाषिणी तीच कुलकामिनी गृहिणी । रुचिर वच वदुनी भूषनी स्वकुल कुलाचार राखोनी ॥
केवि मिळे त्या जगी मान्यता । अवनिय त्या वरि ती वाक्पटुता ।
कुल–कलंकिनी ठरीती वनिता । मीरविती जरी सदाचार सांडोनी ॥१॥



॥अंतरा॥



अनुक्रमणिका

| पद मध्यमग्राम | ताल : केहरवा [मात्रा ४] |
|---|---|

विनवित शबरी रघुराया रे । तुज साठी वेचिली बोरे ॥
भागला भुकेला असशिल देवा । जमविला रानचा मेवा ॥
दीनेची दुबळी सेवा । ही गोड मानुनी घे रे ॥१॥
नच उष्टावली कुणी । मीच स्वये तोडिली ।
चिमणीचे लावुनी दात चवी घेतली । शिवली न दुजी पाखरे ।
मनी शंकर धरिसी का रे । तुज मधुर लागतिल ही शबरीची बोरे ॥२॥





**॥अंतरा १॥**




अनुक्रमणिका

॥अंतरा २॥




अनुक्रमणिका

| **पद मध्यमग्राम** | **ताल : केहरवा** |
|---|---|


नंदलाला नाचरे नाचरे ब्रिजलाला । नाद बन्सरीचा पायी बांधीते वाळा ॥ध्रृ॥
नयन मनोहर तू घननीळा थांबू नको चल नाचरे नाचरे । झाले वेडी मी बघ राधा ।
काय सांगू सखयाना । काय जादू केलीत शामा । एकदाच चल नाचरे नाचरे ॥१॥







अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

| नाट्यगीत | ताल : अर्धी धुमाळी [मात्रा ८] |
|---|---|

व्यर्थ मी जन्मले थोर कुळी । लागला सर्वदा फास गळी ग ॥धृ॥
नच ठावे स्वातंत्र्य कसे ग । बंदीत वास मुळी ग ॥१॥



॥अंतरा॥



| होरी ठुमरी (राग–मिश्र काफी) | ताल : अर्धी धुमाळी [मात्रा ८] |
|---|---|

होरी खेलो मोसे नंद । नंदलाला आवो आवो । वो तो संग लीये
सब ग्वाल बाल । आवो आवो ॥ अंतरा॥ केसर रंग मै डारूंगी तुमपर ।
और मलूंगी गुलाल लाल । आवो आवो आवो ॥१॥



॥अंतरा॥



अनुक्रमणिका

| पद (राग—पटदीप) | ताल : अध्धा त्रिताल [८ मात्रा] |
|---|---|

ही कोण मधुराननना । अंगना विमल लोचने दीपवी तारांगणा ॥ अंतरा ॥
संगीत लहरी निर्मोनी त्या । करिते विहारा ही हंसीका ।
हृदयीं भावनी मधुर संवेदना ॥ १॥




॥अंतरा॥




अनुक्रमणिका

| पद (राग–मिश्र मांड) | तैल : दादरा [३ मात्रा ] |
|---|---|

भवसागरी आधार शोधावयाते । भ्रमसी को रे बघुनी हे मोहजाल । भुलले तव मन का सुखास ॥ध्रु॥
जरी जन्मुनी होय नाश । भुलले मन का सुखास । सुखवी जीवा हा भास ।
भरली जगीं माया । भरली जगी माया मनुजा ॥१॥





॥अंतरा॥




अनुक्रमणिका

| (ठुमरी राग—भैरवी मध्यमग्राम) | ताल : धुमळी [मात्रा ४] |
|---|---|

अकेली मत जैयो राधे जमुना के तीर । राधे जमुना ते तीर ॥
जमुना के नीर तीर । गैया चरावे । बन्सीया बजायी कान्हा ॥१॥





॥अंतरा॥




अनुक्रमणिका

परिशिष्ट ४

काही निवडक जाहिराती


पुणें नूतन संगीत विद्यालयातर्फे
गुरुवार ता. १६-१०-२४ रोजीं
पुणें-नूतन आर्यभूषण थिएटरांत
गायन-वादनाचा जलसा

ग्रामोफोनमध्यें मुद्दाम्याच घेतलेल्या रेकार्डस्मुळें केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल हिंदुस्थानांत कंठमाधुर्य व गायन-शास्त्रनिपुणता याबद्दल प्रसिद्ध पावलेल्या नूतन संगीत विद्यालयांतील संशिक्षक मिसेस हिराबाई बडोदेकर व श्री. सुरेश बाबु यांचा गायन-वादनाचा जलसा पुणें नूतन आर्यभूषण थिएटरांत फारच थाटानें होणार आहे रसिकांनीं ही संधि दवडूं नये.

म्यानेजर नूतन संगीत विद्यालय, पुणें.


फक्त एकच जलसा.
सौ. हिराबाई बडोदेकर यांच्या
गायन-वादनाचा जलसा
शुक्रवार तारीख १५।१०।२६ रोजी रात्रौ ९॥ वाजतां
किर्लोस्कर थिएटरमध्यें होईल
म्यानेजर—व्ही. वाय. केळकर.

अनुक्रमणिका

शेवटचे खेळ ] ॥श्रीदत्तप्रसन्न॥ [ शेवटचे खेळ

(गायनहिरा) सौ. हिराबाई बडोदकर

—यां ची—

नाट्यशाखा) नूतन **संगीत** विद्यालय (नाट्यशाखा

—पुणें किर्लोस्कर थिएटरांत—

गुरुवार ता. ८-९-३२ रात्रौ ८॥ वाजतां

प्रसिद्ध कादंबरीकार प्रो. ना. सी. फडकेकृत

संगीत ] **युगांतर** [ नवा खेळ

शुक्रवार ता. ९।९।३२ रात्रौ ८॥ वाजतां

डायरेक्टर के.एम.हर्डीकर) **सौभद्र** (जनरल मॅनेजर व्ही.के. परचुरे

तिकिटें किर्लोस्कर थिएटरांत दररोज
सकाळीं ८ ते १० व दुपारीं २ ते ६ पर्यंत विकत मिळतील.

---

रेकार्डसूवर घेतलेलें



**पहिलेंच**

संगीत मराठी

**नाटक**



# शंभरावी मुलगी

या नाटिकेंत सौ. दुर्गाबाई खोटे, सौ. हिराबाई बडोदेकर, सौ. कमलाबाई बडोदेकर, श्री. लोंढे वगैरे सुप्रसिद्ध नट नटींनी कामें केलीं आहेत.

**रुबी रेकॉर्ड कंपनी, फोर्ट, मुंबई**

अनुक्रमणिका